म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ४५५५
REFBK-0006141

स्व. नि. ७५५

पुस्तकाचे नाव —
लघुनिबंध व निबंधकार —
परब, श्री० अ० (सं०पा०)
प्रका - मुंबई, के. भि० ढवळे०
कि० ८८५ पै० आ - १९६१

REFBK-0006141

# अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रस्तावना | ५ |
| लघुनिबंध कीं ललितनिबंध ? | १६ |
| प्रो. ना. सी. फडके | २१ |
| पहिला पांढरा केस | [illegible] |
| बाजार | ३६ |
| प्रो. वि. पां. दांडेकर | ४१ |
| पोरकटपणा | ४८ |
| ३१ डिसेंबर | ५३ |
| प्रो. अनंत काणेकर | ५७ |
| शाईनें लिहिणारे लेखक आणि रक्तानें लिहिणारे लेखक | ७३ |
| शत्रु करण्याची कला | ७६ |
| श्री. विष्णु सखाराम खांडेकर | ७९ |
| एक अपघात | ९२ |
| अकल्पित संदेश | ९७ |
| श्री. रघुनाथ गोविंद सरदेसाई | १०४ |
| वृत्तपत्र नसलेला देश | १०९ |
| अबला कीं प्रबला ? | ११५ |

# प्रस्तावना

या पुस्तकांत प्रो. फडके, श्री. खांडेकर, प्रो. काणेकर, प्रो. दांडेकर व श्री. सरदेसाई यांचे दोन दोन लघुनिबंध व त्यांच्या लघुनिबंधवाङ्मयाचा सम्यक्परिचय करून देणारे पांच लेख समाविष्ट केले आहेत. वाङ्मयीन महत्त्व व वैशिष्टय लक्षांत घेऊन मीं या पांच लेखकांची निवड केली आहे.

या पांच जणांप्रमाणें गेल्या चौदापंधरा वर्षांत अनेक मराठी लघुनिबंधकार उदय पावले. भावगीत, लघुकथा व नाटिका हे वाङ्मयप्रकार नांवारूपाला आले ते याच काळांत. लघुनिबंधालाहि प्रो. फडके, श्री. खांडेकर व प्रो. काणेकर यांनीं निःसंशय अभिमानाचें स्थान मिळवून दिलें आहे. दुसऱ्या अनेक लेखकांनींहि या वाङ्मयप्रकाराची निर्मिति केली आहे. पण एकंदर प्रसिद्ध लघुनिबंधसंग्रहांचें अवलोकन करतां एक गोष्ट स्पष्ट दिसून येते, ती म्हणजे पुष्कळांनीं प्रयत्न केला नि थोड्यांनाच यश मिळालें. मला वाटतें, मराठी लेखकांना ‘ लघुनिबंध ’ फारसा मानवलेला नाहीं.

‘ लघुनिबंध ’ हें इंग्रजी ‘ Short Essay ’ चें मराठीकरण आहे. इंग्रजी जाणणाऱ्या मराठी वाचकांना ‘ Short Story ’ व ‘ Short Play ’ हीं नांवें माहीत आहेतच. ‘ Short Story ’ ला मराठींत ‘ लघुकथा ’ म्हणतात, त्याप्रमाणेंच ‘ Short Essay ’ ला ‘ लघुनिबंध ’ असें नांव पडलें तें ठीक झालें. पण जे. बी. प्रिस्ट्ले, व्हर्जिनिआ वुल्फ, रॉबर्ट लिंड वगैरेंचे ‘Essay ’ वरील टीका-लेख पाहतां त्यांत मला ‘ Short Essay ’ या नांवाचा उल्लेख आढळला नाहीं. ‘ Short Essay ’ असें नांव असलेल्या निबंधांचा एकहि संग्रह मला शोध करून सांपडला नाहीं. Short Story प्रमाणें ‘ Short Essay ’ असा शब्दप्रयोग इंग्रजींत नाहीं. मीं पाहिलेले सर्व इंग्रजी निबंधसंग्रह Essay या नांवाच्या लेखांचेच आहेत. त्यांच्या प्रस्तावनांत Essay या वाङ्मयप्रकाराचें विवेचन केलेलें आहे. त्यावरून इंग्रजींत ‘ प्रबंध ’ व ‘ निबंध ’ असे निबंधलेखनाचे दोन प्रकार मानलेले दिसतात. ‘प्रबंधा’ला इंग्रजींत Treatise व Essay अशीं नांवें आहेत; ‘ निबंधा’ला Essay म्हणतात. चिपळूणकरांच्या ‘वक्तृत्वा’सारख्या लेखांना आम्ही निबंध म्हणतों, पण ते ‘ प्रबंध ’ होत. निबंध शब्दाचा रूढ अर्थ आतां बदलणें अशक्य आहे. ‘ प्रबंधा ’ला व ‘ प्रबंधवजा लेखा ’ला आम्ही निबंध म्हणतों.

वि. कृ. चिपळूणकर, गो. ग. आगरकर, बा. गं. टिळक, शि. म. परांजपे वगैरेंचे निबंध असे आहेत. पण 'नव्या गुजगोष्टी' किंवा 'पिकलीं पानें' यांतील निबंध तसे नाहींत, त्यांचा प्रकार निराळा आहे. निबंधलेखनाचे हे दोन प्रकार आकारमानावरून मात्र ठरविलेले नाहींत, ते त्यांच्या अंतःस्वरूपावरून ठरले आहेत. निबंधलेखनाच्या या दोन्ही प्रकारांना इंग्रजींत Essay हें एकच नांव असल्यामुळें उत्पन्न होणारा घोंटाळा टाळण्यासाठीं 'प्रबंधा'ला व 'प्रबंधसदृश लेखा'ला Impersonal Essay व 'निबंधा'ला Personal Essay असें म्हणतात. यांना मराठींत अनुक्रमें 'अनात्मनिष्ठ निबंध' व 'आत्मनिष्ठ निबंध' असें म्हणूं. 'अनात्मनिष्ठ निबंधां'त लेखक विषयाच्या अंगोपांगांची चर्चा करतो, पण तींत त्याच्या आवडीनावडींना जागा नसते, सर्वांना पटेल अशी निर्दोष चर्चा त्याला करायची असते. 'आत्मनिष्ठ निबंधां'त अगदीं याच्या उलट प्रकार असतो; लेखकाच्या सर्व लहरींना, आवडीनावडींना त्यांत वाव मिळूं शकतो, किंबहुना त्यांशिवाय असा निबंधच होणार नाहीं. निबंधाच्या या दोन प्रकारांतील फरक मूलतः विषयाचा, विवरणाचा, भाषेचा व वृत्तीचा असतो; तो फरक लांबीरुंदीवर मुळींच अवलंबून नसतो. या बाबतींत आचार्य अत्रे 'संगम' या लघुनिबंधसंग्रहाच्या प्रस्तावनेंत म्हणतात, "दोहोंमधील फरक हा निव्वळ लांबीरुंदीपुरताच नाहीं. 'शिशु' हा ज्याप्रमाणें 'चिमुकला वृद्ध' नव्हे, त्याप्रमाणें 'लघुनिबंध' हा 'छोटा निबंध' असें म्हणतां येणार नाहीं.... 'निबंध' व 'लघुनिबंध' यांत तत्त्वतः अंतर आहे. लघुनिबंधाचे विषय व लेखनपद्धति हीं निबंधापेक्षां भिन्न आहेत....किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं, ज्या विषयावर कोणीहि 'निबंध' लिहिणें शक्य नाहीं, तेच विषय 'लघुनिबंधा'साठीं योग्य असतात. दररोज डोळ्यांपुढें दिसणाऱ्या सामान्य गोष्टी, प्रत्येकाला पदोपदीं येणारे बारीकसारीक अनुभव किंवा सहज कुठेंहि घडतील असे प्रसंग निवडून त्यांची सोप्या धावत्या चटकदार भाषेंत रेखाचित्रें रंगविणें हेंच लघुनिबंधकाराचें कार्य असतें. एखाद्या सोंवळ्या आजीबाईला जसें कांद्याचें, तसेंच निबंधाला विनोदाचें वावडें असतें; तर लघुनिबंधांतून विनोदाची विलायची मिसळली म्हणजे त्याच्या रुचींत एक प्रकारचें फर्मास माधुर्य येतें. निबंधाला सोपी व सोज्वळ भाषा सहन होत नाहीं. 'औपनिषादिक मानसशास्त्राची विधात्री प्रेक्षा' असल्या मथळ्याचा

विषय जानपद्भाषेंत प्रतिपादन करणें म्हणजे धाबळी नेसून लावण्या गुणगुणण्यापैकीं किंवा बोटांत दर्भाचीं पवित्रें घालून विड्या फुंकण्यापैकीं आहे. शब्दबंबाळपणा हा लघुनिबंधाच्या प्रकृतीला मानवण्यासारखाच नाहीं. लघुनिबंध हा फोडणीच्या भाताप्रमाणें पचायला सोपा, पण रुचीला खमंग असा असावयास हवा."

'आत्मनिष्ठ निबंधा'ला Short Essay असें ( चुकीनें ) म्हटलेलें मीं पुष्कळांच्या तोंडून ऐकलें आहे. या निबंधप्रकारालाच मराठींत 'लघुनिबंध' अशी संज्ञा असून ती रूढ आहे. पण प्रो. फडके आपल्या गुजगोष्टींना 'लघुनिबंध' म्हणायला कबूल नसल्याचें त्यांच्या 'गुजगोष्टीं'च्या प्रस्तावनेवरून दिसतें. त्या ठिकाणीं त्यांनीं 'गुजगोष्टी'चीं लक्षणें दिलीं आहेत, तीं अशीं—

"गुजगोष्ट म्हणजे निबंधाचाच एक प्रकार खरा. परंतु निबंधाहून तिचें स्वरूप फार वेगळें कल्पून मीं ती प्रचारांत आणली आहे. मला नुसते लहान निबंध लिहावयाचे असते तर लघुनिबंध अशी संज्ञा मीं त्यांस दिली असती. 'गुजगोष्ट' हें नांवच मीं अशा हेतूनें योजिलें, कीं या लेखनप्रकाराचें स्वरूप, निबंधापेक्षां निकटवर्ती मित्राशीं केलेल्या गुजगोष्टीसारखें अधिक असावें हें दर्शवावें. या लेखनप्रकारांत मार्मिक विचारांस अवकाश असतो, पण एखाद्या विषयाचा सांगोपांग विचार करण्याची खटपट केली तर ती सौंदर्यविघातक ठरते. तसेंच या लेखनप्रकाराची खरी शोभा उपमालंकारांवांचून प्रगट होत नाहीं; पण काव्याचा अतिरेक त्यास यत्किंचितहि खपत नाहीं. सारांश मार्मिक आणि नवे विचार, आणि ते पुढें मांडण्याचें लालित्य ही गुजगोष्टी लिहिण्याची मुख्य सामग्री होय."

"अर्थात् गुजगोष्टीस विषय निवडावयाचा तो या धोरणानें निवडावा लागतो. जी वस्तु लोकांच्या सामान्य दृष्टीला क्षुद्र अगर उपेक्षणीय वाटत असेल तिच्या विषयींच बोलायला लागून तींत सौंदर्य असल्याचें पटवून द्यायचें असें तारतम्य ठेवलें म्हणजे विषय निवडण्याचें काम सोपें होईल."

"चमत्कृति हा गुजगोष्टीचा आत्मा होय. ही चमत्कृति विषयाच्या निवडींत असावी, किंवा त्यांत नसेल तर गोष्टीच्या ओघांत आणावी. म्हणजे असें, कीं अगदीं साध्यासुध्या गोष्टीविषयीं बोलतां बोलतां त्यांत अचानक एखाद्या मोठ्या तत्त्वावर प्रकाश पाडल्यासारखें करावें."

" पण गुजगोष्टींतील या चमत्कृतीपेक्षांहि अधिक महत्त्वाचें तंत्र म्हणजे तिच्यांत प्रगट होणारी वृत्ति आणि तिची भाषा. गुजगोष्ट लिहिणाऱ्यानें अशा वृत्तीनें लिहिलें पाहिजे, कीं जणूं आपण व वाचक यांमध्यें कांहीं परकेपणा नाहीं. आपल्या अनुभवाच्या बऱ्यावाईट गोष्टी, आपण केलेलीं सत्कृत्यें व आपल्या हातून घडलेल्या चुका, आपल्या आवडीनिवडी, खोडी, लहरी-सारें कांहीं निवेदनाच्या ओघांत येईल तसें येऊं द्यायचें अशी वृत्ति लेखकानें ठेवली पाहिजे. लेखक व वाचक यांजमधील अंतर जितकें नाहींसें झाल्यासारखें गुजगोष्टींत वाटेल तितकी ती सरस वठेल. वाचक म्हणजे आपल्या अंतरंगांतले मित्र अशा बुद्धीनें गुजगोष्ट लिहिली गेली पाहिजे."

" अर्थात् या वृत्तीला साजेशीच भाषा गुजगोष्टीच्या लेखकानें योजिली पाहिजे. काव्याचे अलंकार न टाकतां भाषा जितकी सुबोध, हलकी, मनमोकळी, गमतीनें बोलल्यासारखी ठेवतां येईल तितकी गुजगोष्ट अधिक रंगेल."

प्रो. फडके यांचें हें विवेचन अत्यंत महत्त्वाचें आहे. हीं सर्व लक्षणें विचारांत घेऊन, लघुनिबंधाच्या वाङ्मयप्रकारांत मोडणाऱ्या उत्तमोत्तम इंग्रजी लेखनाचे विषय, रचना व त्यांत प्रगट झालेली लेखकाची वृत्ति ( Mood ) हीं बारकाईनें पाहतां, प्रो. फडके यांच्या ' नव्या गुजगोष्टी ' व ' धूम्रवलयें ' हीं ' लघुनिबंधा ' हून निराळीं नाहींत असें निश्चित मत होतें. कारण, ज्याप्रमाणें ' लघुकथा ' याचा अर्थ ' लहान कथा ' असा करणें बरोबर नाहीं, त्याप्रमाणें ' लघुनिबंध ' हा शब्द ' लहान निबंध ' या दोन सुट्या शब्दांच्या अर्थानें योजतां येणार नाहीं. ' लघुनिबंध ' या नांवावरील प्रो. फडके यांचा आक्षेप तत्त्वतः चूक आहे. ' लघुनिबंधा ' च्या प्रकृतीचें निदान पुढें करण्यांत येईल त्यावरून हें म्हणणें स्पष्ट होईल.

' गुजगोष्टीं ' नींच मराठी ' लघुनिबंधा ' चें स्वरूप निश्चित केलें व या नवीन वाङ्मयप्रकाराविषयीं वाचकांच्या मनांत आवड उत्पन्न केली. ' निबंध ' हा गंभीर व रुक्ष असतो असा सार्वजनिक समज रूढ आहे. त्यामुळें निबंध-वाङ्मयाबद्दल उत्पन्न झालेली अप्रीति कमी करण्याचें थोडेंतरी वरकरणी सामर्थ्य ' लघुनिबंध ' या नांवांत आहे. लोकांना आज लहानसहानच लेख वाचायला आवडतात. लांबलचक कविता, दीर्घ कथा व प्रदीर्घ कादंबरी वाचण्याचा आजच्या वाचकांना कंटाळा आहे. त्यांना हसविणारें, रडविणारें, रिझविणारें आटोपशीर भावगीत वाचायला नि गुणगुणायला हवें; एखादीच

घटना, उत्कट भावना, मनोविश्लेषणाचा प्रश्न यांचा सुखकर विलास असलेली लघुकथा त्यांना आवडते; आणि जाडजूड कादंबऱ्यांचा त्यांस तिटकारा आहे. ही आवडनावड लक्षांत घेतां लघुनिबंध चांगलाच लोकप्रिय व्हायला पाहिजे. प्रो. फडके, श्री. खांडेकर व प्रो. काणेकर यांचे लघुनिबंध लोकप्रिय आहेत. परंतु दुसऱ्या अनेक लघुनिबंधकारांची म्हणण्यासारखी, किंवा मुळींसुद्धां, कदर झालेली नाहीं. वास्तविक लघुनिबंध हा उत्कृष्ट वाङ्मयप्रकार असल्यामुळें अशी दुरवस्था प्राप्त होऊं नये. पण केवळ सोनें चांगलें असून चालत नाहीं, तें चांगल्या सोनाराच्या हातीं पडावें लागतें; त्याशिवाय मनपसंत दागिना घडत नाहीं, हेंच खरें. वाचकाच्या मनांत प्रतिपाद्य विषयाविषयीं कुतूहल जागृत करून त्याचें मनोरंजन व उद्बोधन करणें ही लघुनिबंधाची प्रकृति असल्यामुळें चांगला किंवा खरा लघुनिबंध वाचकांना आवडल्याशिवाय राहत नाहीं.

'लघुनिबंधा'चा आद्य जनक मॉन्टेन (१५३३–९२) या फ्रेंच लेखकाचे 'निबंध' (Essays) प्रथम सतराव्या शतकांत इंग्रजींत भाषांतरित झाले; त्यांचें भाषांतर १६१५मध्यें प्रसिद्ध झालें. (पुढें १९०२सालीं चार खंडांत प्रसिद्ध झालेलें त्याच्या सबंध निबंधवाङ्मयाचें हॅझ्लिटकृत भाषांतर उत्तम समजलें जातें). तेव्हांपासून आजपावेतों सुमारें तीनशें वर्षें लघुनिबंध (म्हणजे इंग्रजी 'निबंध') इंग्रजी लेखकांना व वाचकांना प्रिय होऊन राहिला आहे. मॉन्टेनच्या वाङ्मयानेंच इंग्रजी 'निबंधा'ला जन्म दिला. ('निबंधा'ला आपण लघुनिबंधच म्हणूं). अनेक लघुनिबंधकार इंग्रजींत उदय पावले. स्टील, ॲडिसन, गोल्डस्मिथ, जॉनसन, स्विफ्ट असे लेखक लिहूं लागतांच लोकांचें लक्ष लघुनिबंधाकडे वेधलें गेलें. स्टील, ॲडिसन, गोल्डस्मिथ वगैरेंचे मानवी स्वभावाच्या विविध अंगांवर कुशलतेनें प्रकाश पाडणारे लघुनिबंध अजूनहि आपली लोकप्रियता टिकवून आहेत. सर रॉजर डी कॉव्हर्‌ले, बो टिब्स इत्यादि अद्वितीय व्यक्तींचीं इंग्रजी लघुनिबंधकारांनीं काढलेलीं स्वभावचित्रें आजहि कोणत्या रसिकाला मोहिनी घालीत नाहींत ? प्रो. काणेकरांचे 'गणूकाका' याच व्यक्तींच्या जातीचे आहेत, मीं त्यांच्या लघुनिबंधांच्या समीक्षणांत 'गणूकाकां'चें चित्र उभें केलें आहे. वरीलपैकीं पहिल्या तिन्ही इंग्रजी लघुनिबंधकारांची लेखनशैली चतुर व सहजसुंदर आहे. त्यांच्या नंतरचे लॅंब, हॅझ्लिट, बीरबोम, बिरेल, बेलॉक, लुकस, रॉबर्ट लिंड, चेस्टरटन, स्क्वायर, गार्डिनर असे किती तरी नामांकित इंग्रजी लघुनिबंधकार आहेत.

निरनिराळ्या संग्रहांत घेतलेल्या या लेखकांच्या सुंदर कृतींचा एकवार परिचय घडला तरी त्यांच्या विषयवैचित्र्याची, विविध रचनाचातुर्याची व बहुरूपी प्रभावी व्यक्तित्वाची बरीच कल्पना येते. चांगले चांगले लघुनिबंध वारंवार वाचतां, एक गोष्ट अधिकाधिक पटत जाते, ती ही कीं, लघुनिबंधांत विषयापेक्षां लेखकाच्या व्यक्तित्वालाच सगळें महत्त्व असतें. त्या व्यक्तित्वाच्या प्रमाणांत लघुनिबंधाची परिणामकारकता प्रगट होते. लेखकाचें व्यक्तित्व जितकें आकर्षक, आल्हादक व कुतूहलजनक असेल तितका त्याचा लघुनिबंध परिणामकारक ठरतो. लघुनिबंधकार हा गोष्टीवेल्हाळाचें सोंग घेऊन तें बेमालूम वठवितो व वाचकाचें मनोरंजन करतां करतां मानवी जीवनावर प्रकाश पाडतो ; आपल्या भोंवतालच्या जगांतील जीवनाच्या प्रश्नांवरहि त्यानें सहज टाकलेले शोधक किरण पडतात व वाचकाच्या ज्ञानांत भर पडते व त्याला विचार करणें भाग पडतें.

'Essay' (निबंध) वरील आपल्या टीकालेखांत जे. बी. प्रिस्ट्ले यांनीं 'निबंधा'च्या (म्हणजे 'लघुनिबंधा'च्या) प्रकृतीचें सुंदर निदान केलें आहे. त्यांचें म्हणणें मोलाचें असल्यामुळें लघुनिबंधाच्या वाचकांनीं व लेखकांनीं तें लक्षांत घेतलें पाहिजे. त्यांच्या विचारांचा आशय असा आहे—

"जातिवंत निबंधकाराला विषय लागत नाहीं, किंबहुना त्याला जगांतला वाटेल तो विषय चालतो. तो विषय वाकविण्यावळविण्याचें सामर्थ्य त्याच्या लेखणींत पुरेपूर असतें. कारण त्याला आपल्या निबंधांत स्वतःचें व्यक्तित्व प्रगट करावयाचें असतें. यामुळेंच, ज्या विषयाचें त्याला मुळींच ज्ञान नाहीं, त्यावरहि तो निबंध लिहूं शकतो, आणि तोहि आनंदानें ! तो त्या निबंधांत आपल्या निव्वळ अज्ञानाची चर्चा करणार. खरा निबंध हा गुजगोष्टीसारखा असतो आणि जातिवंत निबंधकाराचें वाचकाशीं होणारें हितगुज चतुरपणाचें, वाचकावर छाप बसविणारें असतें. तो शब्द न् शब्द मनापासून बोलत असतो—त्याचें लेखन हृदयाच्या तळमळीनें होत असतें. तो निबंधाचा विषयहि असाच निवडतो, कीं त्यावरील आपला निबंध हें घडीचें, दो घडींचें बोलणें व्हावें. एखादी आठवण, आत्मचरित्रांतील एखादा प्रसंग, अनुभव, एखादी कल्पना व कांहीं दाखले, एखाद्याचा स्वभाव अशा गोष्टींविषयींच बोलून चांगला बोलका माणूस ऐकणाऱ्याचें मन वेधतो आणि निबंधाला या गोष्टींखेरीज अन्य विषय नको असतात. कारण, चतुराईचें, कळकळीचें व मन

उघडें करणारें हितगुज वाचकांशीं करणें हाच त्याचा उद्देश असतो. निबंधकाराच्या लेखनाचें यश यास्तवच त्याचें रचनाचातुर्य व भाषाशैली यांवरच बव्हंशीं अवलंबून असतें. त्याला लिहितांना अशी ऐट आणावी लागते, कीं लिहिलेल्या शब्दांना संभाषणाचा नूर यावा. परंतु तसा नूर त्यानें कितीहि साधला, तरी बोलणाऱ्याच्या आवाजाचा चढउतार व मनोविकारांप्रमाणें उजळणारा अगर मलूल होणारा चेहरा या गोष्टींचा काळ्या जड मुद्रित शब्दांत अभावच राहाणार. प्रभावी निबंधकाराच्या लेखनांत त्याचें व्यक्तित्व पुरेपूर उतरलेलें दिसतें; फार काय पण एरवीं समोरासमोर बोलतांनाहि ज्याचें व्यक्तित्व अप्रगट राहतें, तो निबंधांत एरवींपेक्षां अधिक खुल्या व उदार मनानें वाचकाशीं गोष्टी करतांना दिसतो. "

वरील प्रतिपादन–लघुनिबंधाच्या प्रकृतीचें निदान–पूर्ण व्हावें म्हणून रॉबर्ट लिंड यांचे प्रस्तुत विषयावरील विचार मला येथें द्यायचे आहेत. रॉबर्ट लिंड हे 'निबंधकार' म्हणून मोठी कीर्ति पावलेले लेखक आहेत, तेव्हां त्यांच्या शब्दांना फार महत्त्व आहे. ते म्हणतात,

" सांप्रतच्या निबंधाचीं भिन्न भिन्न स्वरूपें दिसतात. कधीं तो प्रवचनवजा असतो, तर कधीं तो लघुकथेसारखा दिसतो. तो आत्मचरित्रपर असेल, किंवा त्यांत निव्वळ मूर्खपणा ( Nonsense ) असेल. तो उपहासपर, निंदापर, किंवा भावनावशतेनें भरलेला असेल. त्याला कोणताहि विषय चालतो–'जगाच्या प्रलयकाळा' पासून 'कात्री' पर्यंत वाटेल त्या विषयावर तो लिहिलेला असेल. निबंधाच्या बाबतींत आमची एवढीच अपेक्षा असते, कीं त्याच्या लेखनशैलीनें आम्हांला आनंद व्हावा आणि त्यानें आमच्या भोंवतालच्या जीवनावर चिकित्सक बुद्धीनें अल्पसा प्रकाश, अगदीं पेटत्या आगकाडीइतका तरी प्रकाश, पाडावा. रस्त्यांत पडलेल्या टांचणीवर का लिहिलेला निबंध असेना, तो अनपेक्षितपणें मानवी स्वभावाच्या एखाद्या अंगावर उद्बोधक प्रकाश पाडील. निबंधकारापासून आम्ही मुख्यत्वें एकाच गोष्टीची अपेक्षा करतों, ती म्हणजे करमणूक करणारें शहाणपण किंवा सत्यदर्शन, मग तें मानवी 'हृदया' चें असो कीं 'डोक्या' चें असो. वाचकाला हसवीत, रिझवीत सत्यदर्शन करणें, शहाणपण शिकविणें हेंच सर्व चांगल्या निबंधांच्या लेखकांचें उद्दिष्ट असतें. But woe be to the essayist if either the wisdom or the smile be affected ! "

वरील इंग्रजी वाक्यांत रॉबर्ट लिंड यांनीं निबंधकाराचें, म्हणजे मराठींत लघुनिबंधकाराचें, हास्य व सत्यदर्शन ( किंवा जीवितविषयक तत्त्वप्रतिपादन ) लटकें असूं नये, तें हठादाकृष्ट असूं नये असा कटाक्षानें इशारा दिला आहे. प्रिस्ट्ले व लिंड यांनीं केलेलें लघुनिबंधाच्या प्रकृतीचें निदान फडक्यांच्या 'गुजगोष्टी'च्या लक्षणांशीं तंतोतंत जुळणारें आहे. नाहीं का ?

प्रिस्ट्ले व लिंड यांच्या वर उतरलेल्या लघुनिबंधाच्या प्रकृतीच्या निदानांत सर्व कांहीं आलें आहे; लघुनिबंधाचे विषय, रचना, लेखकाचें व्यक्तित्व, त्याचा जीविताकडे पाहण्याचा दृष्टिकोन व त्यानें घ्यावयाची खबरदारी या गोष्टींचा त्यांनीं संपूर्ण विचार केला आहे. या पुस्तकांत घेतलेल्या पांचहि लेखकांच्या लघुनिबंधवाङ्मयाच्या समीक्षणांत मीं 'लघुनिबंधा'च्या विशेषांची प्रसंगोपात्त चर्चा केली आहे. प्रो. फडके यांजवरील लेखांत मीं विषय, रचना, उपकारक असंतोष, काव्य, विनोद उपहास, व्यक्तित्व, जीविततत्त्वज्ञान, स्वभावदर्शन वगैरे लघुनिबंधाच्या घटकांचा विचार केला आहे; बाकीच्या लेखांतहि या घटकांच्या गुणांचें, अभावाचें व अतिरेकाचें विवेचन केलें आहे. त्या लेखांत केलेल्या चर्चेची येथें पुनरुक्ति करीत नाहीं. पण एका गोष्टीचा मात्र मला येथें अधिक विचार करावयाचा आहे.

माझ्या टीकालेखांत त्या त्या निबंधकाराच्या जीवितविषयक तत्त्वज्ञानाचा मीं विचार केला आहे. येथें मराठी लघुनिबंधकारांच्या जीवितविषयक तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमि अवश्य स्पष्ट केली पाहिजे. मनोविश्लेषण, कम्यूनिझम व स्त्रीप्रेम यांविषयींच्या पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांच्या विचारांचे ठसे मराठी लघुनिबंध-वाङ्मयावर स्पष्ट उमटलेले दिसतात. याबाबत खोलांत शिरून मला संशोधन करायचें नाहीं, फक्त जरूर तेवढा विचार करायचा आहे. प्रो. फडके यांनीं 'पोरखेळा'ची, श्री. खांडेकर यांनीं 'खेळकरपणा'ची, प्रो. काणेकर व प्रो. दांडेकर यांनीं 'पोरकटपणा'ची जी जोरदार तरफदारी आपल्या निबंधांत केली आहे, तिला फार महत्त्व आहे. कुठें कुठें अनियमितपणा व अव्यवस्थितपणा यांचे महत्त्वदर्शक गोडवे गायलेले दिसतात. "पोटासाठीं कराव्या लागणाऱ्या रोजगारामुळें, आणखी दाखवाव्या लागणाऱ्या प्रतिष्ठितपणामुळें आपण सगळेच रंजीस आलेले असतों. क्षणभर पोरखेळ करायला मिळाला तर आपल्याला हवा असतो." असें प्रो. फडके म्हणतात तें Psychology of Relaxation प्रमाणें पूर्ण सत्य आहे. कारण,

"We humans have only recently developed the upper lobes of the brain, and cannot stand using them all the time; it is necessary occasionally to let them rest, and to live in the lower centres." तसेंच "अंतर्मनांत दबून राहिलेल्या इच्छा व आकांक्षा मनुष्य निरनिराळ्या उपायांनीं तृप्त करून घेत असतो," हें प्रो. काणेकरांनीं प्रतिपादन केलेलें मानसशास्त्राचें तत्त्व दुसऱ्याहि निबंधकारांनीं पुरस्कारलेलें आढळतें. मानसशास्त्रीय नवज्ञानाच्या जाणिवेमुळें कांहीं लघुनिबंधांत, विशेषतः श्री. खांडेकरांच्या लेखनांत, हसतां खेळतां मुलांचा मनोविकास करण्याचें तत्त्व प्रतिपादन करणाऱ्या नवशिक्षणपद्धतीस उचलून धरलें आहे. समाजांतील आर्थिक व जातीय विषमतेविषयीं, धर्म ही 'अफूची गोळी' असल्याबद्दलचीं, आणि प्रेमाच्या शास्त्रीय चिकित्सेचीं मतें पाश्चात्यांच्या 'काव्या'च्या व 'शास्त्रा'च्या वाढत्या परिचयाबरोबर या देशांतील लोकांच्या मनांत मुरत चाललीं आहेत; त्यांचें प्रतिबिंब आमच्या लघुनिबंध-वाङ्मयांत, विशेषतः प्रो. काणेकरांच्या निबंधांत, स्पष्ट पडलेलें दिसतें. या नवमतांचा संचार होत असतांना श्री. खांडेकर मात्र सहृदयता, सुजनता व उदारता यांवर विसंबून, 'अंतरींचा दिवा' लावल्यानें या देशांत, किंबहुना सर्व जगांत, विश्वकुटुंबाची स्थापना होईल, माणसामाणसांत, राष्ट्राराष्ट्रांत, प्रेम नांदेल व सर्वत्र आबादी-आबाद होईल अशी आशा बाळगून आहेत! स्त्रीचें जीवनांत महत्त्व, तिचा काडीमोड करण्याचा हक्क, तिचें स्वातंत्र्य वगैरे गोष्टींशींहि आमच्या लघुनिबंधकारांची बुद्धि संघर्ष पावलेली दिसते. सुशिक्षित स्त्रियांत झालेल्या जागृतीचा पुरस्कार व त्यांवर समाजाकडून होत असलेल्या अन्यायाचा प्रतिकार प्रो. काणेकरांनीं प्रमुखत्वें केला आहे आणि त्या जागृतीमुळें होणाऱ्या चळवळी व परिषदा लघुनिबंधकार कशा हास्यास्पद करूं शकतो तें 'प्रबला कीं अबला' या श्री. सरदेसाई यांच्या लघुनिबंधावरून चांगलेंच प्रत्ययास येतें.

या पुस्तकांत समाविष्ट न केलेले अनेक लघुनिबंधकार आहेत. त्यांपैकीं कांहींचा समावेश व्हायला पाहिजे होता, पण स्थल व मूल्य यांची पुस्तकाच्या आकाराला मर्यादा पाळणें भाग पडल्यामुळें तसें करतां आलें नाहीं. आजच्या काळीं मोठें पुस्तक काढणें कदाचित् शक्यहि होणार नाहीं या भीतीनें मीं पांचच लेखक निवडले. न निवडलेल्या लेखकांपैकीं कांहींच्या लघुनिबंधांचे

संग्रह निघाले आहेत आणि बाकीच्यांचे लघुनिबंध जेथें प्रकाशित झाले तेथेंच पडून आहेत. हे संग्रह वाचून पाहतां, फारच थोड्या लेखकांना लघुनिबंध-काराची मनोवृत्ति लाभलेली दिसते. श्री. बर्वे, श्री. पाठक, श्री. सामंत, श्री. पवार व श्री. निरंतर यांच्या पुस्तकांत जे लेखनगुण दिसून येतात, त्यांची योग्य जोपासना होऊन या लेखकांकडून लेखन झाल्यास मराठींत उत्तम लघुनिबंधांची भर पडल्याशिवाय राहणार नाहीं. श्री. वा. भा. पाठक यांचा ‘ नकोत त्या गोष्टी ’ हा संग्रह सुरेख आहे. पण तो प्रसिद्ध झाल्याचें किती जणांना माहीत आहे ! श्री. रघुवीर सामंतांच्या ‘ पणत्या ’ मधील ‘ रस्त्यांची निवड ’ व ‘ क्षुद्र त्याग ’ हे उत्तम लघुनिबंध आहेत. श्री. वि. ल. बर्वे पहिल्या लघुनिबंधकारांपैकीं होत. त्यांच्या लघुनिबंधांचा ‘ पिसारा ’ नांवाचा संग्रह निघाला आहे. त्यांत १९२८ सालापासूनचे निबंध दिले आहेत, आणखीन् दोनतीन संग्रह निघतील इतके त्यांचे निबंध प्रकाशित आहेत. ‘ पिसाऱ्या ’ मधील लेखनावर इंग्रजी निबंधवाङ्मयाची दाट छाया पसरलेली दिसते आणि इंग्रजी अवतरणें, संदर्भ वगैरेंचा लेखकानें केलेला उपयोग पाहतां तिच्याबद्दल खात्री होते. तें कांहीं असलें तरी, ‘ पिसाऱ्यां’त कांहीं चांगले लघुनिबंध आहेत हें कोणालाहि मान्य केलें पाहिजे. ‘ फसवे चेहरे ’, ‘ रोजचें संगीत ’, ‘ पावसाळी छत्र्या ’ व ‘ हें कां तें ? ’ या निबंधांत श्री. बर्वे यांचे चांगले लेखनगुण दिसून येतात. श्री. बर्वे यांना लघुनिबंधकाराची मनोवृत्ति (Mood) साधलेली दिसते, पण त्यांच्या लेखनांत रुक्षता केव्हां घुसेल याचा नेम नाहीं; पुष्कळदां रुक्षतेमुळें वाचकाला कंटाळा येतो. श्री. ग. खं. पवारकृत ‘ हवेंतील मनोरे ’ या संग्रहांतील ‘ सौन्दर्य आणि स्त्रीशिक्षण ’, ‘ जुन्याचा अभिमान ’ व ‘ दर्शनी मत ’ हे व श्री. गं. भा. निरंतरांच्या ‘ साखरझोंप ’ मधील ‘ स्मशानवैराग्य ’ व ‘ फुलांसाठीं देव ’ हे निबंध वाचनीय आहेत. प्रो. श्री. स. भावेकृत ‘ पहिली उडी ’ मधील ‘ रविवार ’ व श्री. बा. भ. बोरकरांच्या ‘ कागदी होड्यां ’तील ‘ गोल्ड फ्लेक ’ हे बऱ्यापैकीं निबंध आहेत. श्री. शंकर साठे यांचें ‘ काजवे ’ हें पुस्तक पाहतां. त्यांत लघुनिबंधकाराचे गुण बीजरूपानें असल्याचें ‘ माऊ ’, ‘ किल्ली ’, ‘ पाऊस ’, ‘ अकारण मैत्री ’ वगैरे लहानग्या निबंधांवरून दिसून येतें. यांशिवाय प्रो. वि. द. साळगांवकर यांचें ‘ किनाऱ्यावर ’ व श्री. रा. ग. कुंभोजकर यांचीं ‘ लघुनिबंध ’ व ‘ रस्ते आणि फिरस्ते ’ अशीं तीन पुस्तकें

प्रसिद्ध आहेत, तीं मीं बळेंच वाचून काढलीं. श्री. द. दा. पेंडसे व श्री. द. पा. पेंडसे यांच्या लघुनिबंधांचा 'संगम' हा संग्रह १९३५ मध्यें प्रसिद्ध झाला. यांत विषयाचें अनुकूल वैचित्र्य असूनहि वृत्ति मुळींच न साधल्यामुळें बहुतेक सर्व लघुनिबंध सामान्य आहेत. येथें नमूद केलेल्या पुस्तकांखेरीज आणखी कांहीं असतीलहि, पण मला तीं उपलब्ध झालीं नाहींत.¶

वर उल्लेखिलेल्या लघुनिबंधसंग्रहांत कांहीं कांहीं लेखकांनीं असलें लिखाण समाविष्ट केलें आहे कीं, तें लघुनिबंध या वाङ्मयप्रकारांत कदापि मोडणार नाहीं. तसें करून त्यांनीं लघुनिबंध म्हणजे काय हें आपल्याला माहीत नसल्याचें मात्र पर्यायानें दाखवून दिलें आहे.

ज्यांचे लघुनिबंधसंग्रह निघालेले नाहींत असे अनेक लघुनिबंधकार असल्याचें मागें सांगितलें आहे. त्यांपैकीं कांहींनीं चांगले लघुनिबंध लिहिले आहेत, पण बहुतांचें लेखन डोळ्यांत भरण्यासारखें नाहीं.

आजच्या मराठी लघुनिबंध-वाङ्मयाच्या सम्यक्परिचयाच्या योगें 'लघुनिबंध' या वाङ्मयप्रकाराची चर्चा करण्याच्या हेतूनें हें पुस्तक तयार केलें आहे; त्या चर्चेला पूर्णता यावी म्हणून दहा सुंदर निबंध दिले आहेत. माझा हा अल्प यत्न सुज्ञ व रसिक जनांस मान्य होईल अशी मी आशा करतों.

हें पुस्तक तयार करतांना मीं प्रो. फडके, श्री. खांडेकर व आचार्य अत्रे यांच्या व अनेक इंग्रजी लेखकांच्या प्रस्तुत विषयावरील विचारांचा उपयोग केला आहे, त्याबद्दल मी त्या सर्वांचा अत्यंत आभारी आहें.

भि. अ. परब

मुंबई, १ डिसेंबर, १९४१

¶ प्रा. मा. का. देशपांडे यांचा 'धूम्रतरंग' हा लघुनिबंधसंग्रह जून १९४२ त प्रसिद्ध झाला आहे. त्यानंतर 'मला नाहीं पटत!' हा प्रो. भावे यांचा नवा संग्रह प्रसिद्ध झाला आहे.

# लघुनिबंध कीं ललितनिबंध ?

**या** पुस्तकाचें हस्तलिखित तयार होऊन तें प्रकाशकाकडे पसंतीसाठीं पाठविल्यानंतर मीं बडोदें येथें निघालेलें ' नवं लेणं ' हें पुस्तक पाहिलें. सदर पुस्तक हा एक ' ललितनिबंधां 'चा संग्रह असल्याचें कटाक्षानें सांगण्यांत आलें आहे. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत प्रो. फडके यांनीं मोठ्या निश्चयानें जाहीर केलें आहे—" योग्य तो विनय न सोडतां मला असं म्हटलं पाहिजे कीं, ' रत्नाकर ' मासिकांत ' गुजगोष्टी ' या सदराखालीं जे निबंध मी लिहूं लागलों तोच मराठींतील आधुनिक स्वरूपाच्या निबंधाचा प्रारंभ म्हणावा लागेल. ' गुजगोष्टी ' या मथळ्यानं कांहीं लोक बिचकले. या ' गुजगोष्टीं ' ना निबंध म्हणतां येईल कीं काय याबद्दल कांहींनीं वादहि घातला. माझ्या ' गुजगोष्टीं ' च्याच धर्तीवर पण ' लघुनिबंध ' या नांवानं मोठेछोटे साहित्यिक लेखन करूं लागले. परंतु 'गुजगोष्टी' या मीं योजलेल्या नांवांतल्या अभिप्रायाची छटा दृष्टीआड करतां येण्यासारखी नव्हती. अखेर सुमारें पांच वर्षांपूर्वी मी एका व्याख्यानांत ' ललितनिबंध ' हें नांव सुचवून माझ्या पुस्तकांच्या यादींत तें वापरूंहि लागलों. तें नांव आतां सर्वमान्य झालेलं दिसतं. "

वर प्रो. फडके यांनीं ' ललितनिबंध ' हें ' नांव आतां सर्वमान्य झालेलं दिसतं ' असें म्हटलें आहे तें बिलकुल खरें नाहीं. ' लघुनिबंधा ' चें नांव ठरविण्याच्या बाबतात त्यांनीं पक्का निश्चय केला तो आतांच. कारण ऑगस्ट १९४१ मध्यें प्रसिद्ध झालेल्या ' वेचलेले मोती ' या पुस्तकाच्या वेष्ठनावरील जाहिरातींत त्यांच्या ' गुजगोष्टीं ' ना ' रसात्मक निबंध ' व ' धूम्रवलयें ' या पुस्तकास ' निबंधसंग्रह ' म्हटलें आहे.

' लघुनिबंध ' ही संज्ञा प्रो. फडके यांना मान्य नाहीं हें स्पष्ट आहे. श्री. खांडेकर, आचार्य अत्रे, प्रो. काणेकर इत्यादि साहित्यिकांनीं ' लघुनिबंध ' ही संज्ञा वापरली आहे, फार काय पण त्यांनीं ' लघुनिबंधा 'बद्दल दुसरी संज्ञा पुरस्कारलेली नाहीं. प्रो. फडके सोडले तर बाकीच्या सर्व निबंधकारांनीं आपल्या आत्मनिष्ठ निबंधाच्या पुस्तकांस ' लघुनिबंधसंग्रह 'च म्हटलें आहे. पहिल्यापासून नियतकालिकांतहि ' लघुनिबंध ' या नांवाचाच सर्रास उपयोग केलेला दिसतो. शालेय पुस्तकांत सुद्धां आत्मनिष्ठ निबंधास ' लघुनिबंध 'च म्हटलें आहे.

'नवं लेणं' या पुस्तकाचीं प्रसिद्ध झालेलीं परीक्षणें पाहतां त्यांत सदर पुस्तकांतील निबंध हे लघुनिबंध आहेत असें म्हटल्याचें आढळतें. ¶

'लघुनिबंधा'प्रमाणें दुसऱ्या वाङ्मयप्रकारांच्या नांवांविषयीं प्रो. फडके यांचा मतभेद आहे. 'कादंबरी' या नांवाऐवजीं एखादा मराठी शब्द बनवून तो Novel या इंग्रजी शब्दाच्या अर्थीं रूढ करावा असें आपल्याला वाटत असल्याचें त्यांनीं 'वेचलेले मोती'च्या सत्तावनाव्या पृष्ठावर सांगितलें आहे. प्रो. फडके यांची ही वृत्ति साहित्यिकांनीं अवश्य लक्षांत घेतली पाहिजे.

'लघुनिबंध' ही संज्ञा कित्येक वर्षें रूढ असून ती एका विशिष्ट अर्थानें वापरली गेली आहे. ही परिचित व सार्थ संज्ञा आतां टाकतां येणार नाहीं.

आतां, प्रो. फडके यांची 'ललितनिबंध' ही संज्ञा अजून लोकांना परिचित व्हायची आहे; ती प्रो. फडके यांनीं रूढ होऊं घातली आहे. तेव्हां ती नीट पारखून पाहणें अनुचित होणार नाहीं.

प्रथम 'ललित' या पदाचा विचार करूं.

हें पद 'ललितवाङ्मय' या शब्दांत असून सर्वांस परिचित आहे. राजशेखर नांवाच्या संस्कृत साहित्यशास्त्रकारानें 'वाङ्मया'चे 'काव्य' व 'शास्त्र' असे दोन प्रकार मानले आहेत. गो. ग. आगरकर यांनीं 'कवि, काव्य, काव्यरति' या निबंधांत राजशेखराचें मत अनुसरलें आहे. ह. ना. आपटे यांनीं मुंबईस मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या तेराव्या वार्षिक सभेंत ता. २६ नोव्हेंबर, १९११ रोजीं दिलेल्या व्याख्यानांत 'काव्या'चा संस्कृत अर्थानें उपयोग केला, 'काव्याला' त्यांनीं 'विदग्धवाङ्मय' हा दुसरा शब्द सुचविला व वापरला; तसेंच 'विदग्ध' व 'ललित' या शब्दांतील भेद दाखवून Belles Lettersबद्दल 'ललितवाङ्मय' हा शब्द त्यांनीं प्रथम वापरला. 'महाराष्ट्र-सारस्वत'कार भावे व 'सारस्वतसमीक्षा'कार श्री. आगाशे यांनीं प्राचीन मराठी कवींना अनुसरून 'सारस्वता'चा उपयोग 'काव्या'च्या अर्थीं केला. थोडक्यांत, याविषयीं अनेकांचे लेख पाहतां एकंदरींत असें दिसून येतें कीं, काव्य म्हणजे कविता–पद्यरचना–अशी सर्वसामान्य समजूत दृढमूल आहे आणि 'काव्य' या शब्दाच्या अर्थीं 'विदग्धवाङ्मय', 'ललितवाङ्मय' 'साहित्य', 'सारस्वत' व 'वाङ्मय' हे शब्द वापरांत आहेत. गेल्या नोव्हेंबरच्या

¶ ऑक्टोबर १९४२ च्या अंकांत महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेनें १९४१ च्या सांवत्सरिक साहित्य-समालोचनांत 'लघुनिबंध' संज्ञा पुरस्कारिली आहे.

‘सह्याद्रीं’त श्री. न. चिं. केळकर यांनीं या नाना शब्दांच्या, समान अर्थानें होणाऱ्या उपयोगाविषयीं विचारप्रवर्तक लेख लिहिला आहे.

‘ललितवाङ्मय’ ही संज्ञा राजशेखराच्या ‘काव्या’च्या अर्थानें रूढ आहे. जें वाङ्मय ‘शास्त्रीय’ नाहीं, तें ‘ललित’ समजलें जातें.

आतां ‘ललितनिबंधा’चा विचार करूं.

‘निबंध’ म्हणजे विशेष ‘रचना’. निबंध ही शब्दरचना गद्यच असते अशी सर्वमान्य समजूत आहे. निबंध पद्य असो किंवा गद्य असो, तो त्यांतील सत्यदर्शनाच्या पद्धतीवरून, विषयप्रतिपादनावरून, ‘शास्त्रीय’ ठरेल किंवा त्याचा ‘काव्यां’त समावेश होईल. जो निबंध ‘ललितनिबंध’ आहे तो ‘शास्त्रीय’ असणें शक्य नाहीं. ज्या निबंधाला खरोखर ‘विदग्ध निबंध’ किंवा ‘ललित निबंध’ म्हटलें पाहिजे, त्याला फक्त ‘निबंध’ म्हटलें जातें. अशा ‘निबंधा’चे अनात्मनिष्ठ निबंध व आत्मनिष्ठ निबंध (Impersonal Essay व Personal Essay) असे दोन प्रकार आहेत. तेव्हां, शास्त्रीय नसलेला कोणताहि निबंध, मग तो आत्मनिष्ठ असो अगर अनात्मनिष्ठ असो, ‘ललितनिबंधां’त जमा होतो. शि. म. परांजपे यांचा ‘प्रणयिनीचा मनोभंग’ हा ठाकुरसिंगांच्या चित्रावरील, ‘रत्नाकर’ मासिकांत प्रसिद्ध होऊन गाजलेला निबंध एक ‘ललितनिबंध’ आहे, पण तो ‘आत्मनिष्ठ निबंध’ नव्हे, तो लघुनिबंध नव्हे. एवंच, ‘ललितनिबंध’ ही संज्ञा अतिव्याप्तीच्या दोषानें युक्त आहे.

प्रो. फडके ‘गुजगोष्टी’चा आग्रह धरून बसले असतां, इतर मोठ्याछोट्या साहित्यिकांनीं ‘लघुनिबंध’ ही संज्ञा वापरून रूढ केली. ‘लघुनिबंध’ ही संज्ञा केव्हांच सर्वमान्य झाली आहे. प्रो. फडके आतां ‘लघुनिबंधा’ ऐवजीं ‘ललितनिबंध’ ही संज्ञा वापरावी असें निश्चयानें सांगत आहेत.

‘लघुनिबंधा’ची जागा ‘ललितनिबंध’ घेईल कीं नाहीं तें एकदा काळच ठरवील.

भि. अ. परब

२५ जानेवारी, १९४२

# ल घु नि बं ध

व

# लघुनिबंधकार

# प्रो. ना. सी. फडके

७१७९

पुराण काळीं युरोपांत मिडास नांवाचा एक राजा होऊन गेला. त्याची अशी गोष्ट सांगतात, कीं एका देवतेनें त्याच्या सेवेनें संतुष्ट होऊन त्याला अद्भुत वर दिला होता, त्याच्या योगें त्याच्या हस्तस्पर्शानें वाटेल ती वस्तु सुवर्णाची बने.

मिडासप्रमाणें प्रो. फडके यांनाहि एक अद्भुत वर लाभला आहे; त्यांच्या हस्तस्पर्शानें वाटेल त्या विषयाचें 'सोनें' होतें! ते कोणत्याहि विषयावर लेखणी चालवोत, त्यांत गोडी अन् जिवंतपणा उत्पन्न झाल्याविना राह्यचा नाहीं. 'झंकार' मध्यें सुरू झालेली 'माझ्या साहित्यसेवेंतील स्मृति' ही लेखमाला वाचतांना हाच अनुभव येत नाहीं का? अन् 'तुमची लिहिण्याची धाटणी आकर्षक आहे. तुमचीं मतें कालपरत्वें बदलतील, कदाचित् आजच्या-हून अगदीं निराळ्या मतांचा पुरस्कार तुम्ही करूं लागाल. तें कसंहि असो, जें लिहाल तें लोकांना वाचायला लावाल एवढं खास.' हे अच्युतराव भटांच्या तोंडचे उद्गार पाहतांच खात्री पटते, कीं प्रो. फडके यांनीं आपल्या कलमाच्या केवळ स्पर्शानें वर्ण्य विषयाचें सोनें करण्याची कला अगदीं पहिल्यापासून—त्यांनीं साहित्यक्षेत्रांत पाहिलें पाऊल टाकलें तेव्हांपासून—कमावली आहे.

काव्य असो किंवा शास्त्र असो, ते हाताळतील त्या वाङ्मयप्रकारांत सुरम्य भाषाशैली नि सुबोध विषयप्रतिपादन हीं दिसून यायचींच.

त्यांचीं 'गुजगोष्टी', 'नव्या गुजगोष्टी' व 'धूम्रवलयें' हीं लघुनिबंधांचीं पुस्तकें काळजीपूर्वक वाचणाऱ्यास त्यांच्या सुमधुर भाषाशैलीचें अधिकाधिक सुंदर होत गेलेलें स्वरूप खरोखर मोहिनी घालतें. 'गुजगोष्टी' ची भाषा एकंदरींत संस्कृतप्रचुर व भारदस्त आहे. 'नव्या गुजगोष्टी' व 'धूम्रवलयें' यांची भाषा 'सुबोध, हलकी, मनमोकळी, गंमतीनें बोलल्यासारखी' आहे. या त्यांच्या भाषेच्या 'साधेपणा'चें सौंदर्य मात्र काळजीपूर्वक कमावलेलें आहे.

वरील तिन्ही पुस्तकांत एकंदर ४४ निबंध आहेत. 'गुजगोष्टी' १९३३ त पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्या. त्यानंतर चार वर्षांच्या अंतरानें एकेक अशीं दोन पुस्तकें प्रकाशित झालीं. तीं त्या त्या वेळीं वाचतांना आनंद झाला त्यापेक्षां अधिक आनंद तीं तिन्ही लागोपाठ—किंबहुना एकाच बैठकीला—मीं वाचलीं तेव्हां झाला; अन् त्यांतील वाङ्मयीन गुणांचें जणूं नव्यानेंच दर्शन झालें!

या निबंधांत प्रो. फडके यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टि भेदक असून तींत संयमशील काव्य व तत्त्वज्ञान यांचें मधुर मीलन झालेलें आढळतें. त्यांची काव्यशक्ति उपमाउत्प्रेक्षांच्या मागें धावत नाहीं, त्यांची तत्त्वज्ञानप्रियता गंभीर होऊन प्रवचनें झोडात नाहीं, किंवा तर्ककर्कश होत नाहीं सुबोध पण सुंदर भाषा, प्रभावी व्यक्तित्व, काव्य व तत्त्वज्ञान यांची चतुर जोड मिळाल्यामुळें सामान्य वाटणाऱ्या विषयांवरील हे निबंध सुरेख उतरले आहेत. चटकदार आरंभ, विचार, कल्पना व भावना यांच्या मनोहर विलासानें होत गेलेला विस्तार, विषयाला पोषक नसलेल्या विषयांतराचा कटाक्षानें घडवून आणलेला अभाव व परिणामकारक शेवट हे या लघुनिबंधांच्या रचनेचे विशेष होत.

या लघुनिबंधांच्या कर्त्यांचा घवघवीत गुण म्हणजे त्याचें व्यक्तित्व. विद्वत्ता, तर्क, तत्त्वज्ञान व काव्य हे प्रो. फडके यांच्या व्यक्तित्वाचे प्रमुख घटक होत. त्यांच्या विद्वत्तेमुळें ‘ गुजगोष्टीं ’तील निबंध भारदस्त वाटतात, याचा अर्थ असा नव्हे, कीं त्यांनीं त्यांत आपल्या विद्वत्तेचें प्रदर्शन मांडलें आहे. तर्कसुंदर विषयप्रतिपादनाला काव्यदृष्टीची जोड मिळाली असतांहि केवळ लेखकाची जिव्हाळ्याची वृत्ति त्यांत नसल्यामुळें ते ‘ नव्या गुजगोष्टी ’ व ‘ धूम्रवलयें ’ यांच्या इतके हृद्य नाहीत. हा पहिल्या व नंतरच्या कृतींतील फरक तुलनेनें स्पष्ट होतो. ‘ गुजगोष्टीं ’तील ‘ बालवृत्ति ’ व ‘ नव्या गुजगोष्टीं ’तील ‘ पोरखेळ ’ हे किंवा ‘ गुजगोष्टीं ’ तील ‘ सहल ’ व ‘ नव्या गुजगोष्टीं ’ तील ‘ वाट चुकल्याचा आनंद ’ हे निबंध तुलनेच्या दृष्टीनें वाचले असतां विषयाच्या प्रतिपादनाचा व लेखकाच्या वृत्तीचा फरक दिसून येतो. जुन्या ‘ गुजगोष्टीं ’त लेखक साधारणतः कांहीं तरी तत्त्व सिद्ध करण्याच्या मागें लागलेला दिसतो. तर ‘ नव्या गुजगोष्टीं ’त व ‘ धूम्रवलयां ’त तसा प्रकार नाहीं; विद्वत्ता व तर्क यांपेक्षां लेखकाच्या वृत्तीचा जिव्हाळाच येथें अधिक प्रभावी झालेला आढळतो.

प्रो. फडके यांच्या वृत्तीचा एक विशेष म्हणजे त्यांचा उपकारक असंतोष. लौकिक रूढ समजसमजुतींना नाजुक धक्के देऊन विषयांत चमत्कृति निर्माण करण्याचें अप्रतिम कौशल्य त्यांच्या निबंधांत दिसतें. असंतोष-वृत्ति लघुनिबंधकाराला फार उपकारक ठरते, ती वाचकाच्या चित्ताला धक्का देते व त्याचें मन वेधतें. बहुधा या वृत्तीच्या विलासावरच लघुनिबंधाचें यश

अवलंबून असतें. प्रो. फडके यांच्या ठिकाणच्या या वृत्तीचीं निदर्शक अशीं अनेक स्थळें या निबंधांत आहेत. 'ऐनपंचविशी' तील तरुणांची तरफदारी करतांना ते म्हणतात, "ऐनपंचविशींतील तरुणांचे अविचार चालू आहेत म्हणूनच जगाची प्रगति चालू आहे, जुने शोध टाकाऊ ठरत आहेत; ज्ञानाच्या खाणींतून नवीं रत्नें बाहेर पडत आहेत, जुन्या संस्था जाऊन नव्या उदयास येत आहेत, सुधारणेचें पाऊल पुढं पडत आहे, आणि 'एवं प्रवर्तितं चक्रम्' असा ज्याचा भगवानांनीं उल्लेख केला आहे, तें चक्र अव्याहत चालू आहे! म्हणून ऐन पंचविशीचें वैभव कांहीं और आहे!" तरुणांच्या अधीर व साहसी वृत्तीला नांवें ठेवणाऱ्यांना हें समर्पक उत्तर त्यांनीं दिलें आहे. याच वृत्तीमुळें ते 'अज्ञानाची महती' गातात, अन् 'सहल' करण्याबाबत ते कटाक्षानें लिहितात, 'अमुक वेळेस फिरायला जाण्यांत मजा आहे, असें ज्यांना वाटत असेल त्यांना फिरायला जाण्यांतलं खरं सुख समजलंच नाहीं असं मी म्हणेन. फेरफटका करण्याच्या मजेला वेळेचं बंधन कुठलं?' ते 'पोरखेळा'ची शिफारस करतात तीसुद्धां त्याच वृत्तीनें; ते म्हणतात, 'पोटासाठीं कराव्या लागणाऱ्या रोजगारामुळं आणेखी दाखवाव्या लागणाऱ्या प्रतिष्ठित-पणामुळं आपण सगळेच रंजीस आलेले असतों. क्षणभर पोरखेळ करायला मिळाला तर आपल्याला हवा असतो. पण आपल्याला धैर्य नसतें आणि स्वतःची वंचना करून घेऊन प्रतिष्ठितपणाचं ओझं आतां तसंच सतत डोक्यावर वागवतों. पण मी आतां स्वतःची वंचना करून घेणार नाहीं. लोकलगाडीची मी वाट पाहणार; इतकंच नाहीं तर ती आली, कीं आरोळीसुद्धां ठोकणार आणि वाजवितां आली तर शिट्टीसुद्धां वाजविणार! पाही ना मला कोणीं पाहिलं तर आणि ठेवी ना नांवं! स्वतःची शरम वाटण्याऐवजीं मला त्यांचीच कींव येईल!' 'घड्याळा' वर प्रोफेसरांचा राग आहे तो वरील वृत्तीमुळेंच, त्याचें कारण असें आहे—"बारा आंकड्यांच्या तबकडीचं घड्याळ म्हणजे मनुष्याच्या या दास्याचं एक ठळक चिन्ह आहे. मनुष्य घड्याळाच्या 'हातांत' पूर्णपणें सांपडलेला आहे!" त्याच वृत्तीनें प्रेरित होऊन 'मित्र' या निबंधाचा आरंभ केला आहे—'या जगांत बहुतेक प्रत्येकजण पुरेसा पैसा जवळ नाहीं म्हणून किंवा पुरेसा कपडालत्ता नाहीं म्हणून, किंवा पुरेसे ग्रंथ वाचावयास मिळत नाहींत म्हणून तक्रार करीत असतो; पण पुरेसे मित्र मिळत नाहीं म्हणून दुःखीकष्टी झालेला एक तरी माणूस दिसतो का?' किती आकर्षक आहे हा आरंभ!

कांहीं निबंधांत लेखकाच्या आत्मचरित्रपर आठवणींच्या योगें प्रकट झालेलें व्यक्तित्व वरच्या वृत्तीपेक्षां अधिक मोहक आहे. 'गुजगोष्टी' तील 'पत्रें', 'हरवली म्हणून सांपडली', 'न वाचलेल्या ग्रंथांची गोडी', 'जुनीं पुस्तकें', 'नव्या गुजगोष्टीं' तील 'पहिला पांढरा केंस', 'ताजा कलम' आणि 'धूम्रवलयां' तील 'नव्या इमारती', 'चावी', 'पुरून ठेवलेलें धन', 'कोमेजणारीं फुलें', 'एक स्वप्न' या निबंधांत लेखकानें अगदीं हळुवारपणें आपल्या हृदयाचा एकेक कप्पा उघडून आपल्या आयुष्यांतील आठवणी शब्दांत गुंफिल्या आहेत. खरोखर सर्व चांगल्या लघुनिबंधांत लेखकाचें व्यक्तित्व प्रतिबिंबित होतें. वरच्यासारख्या लघुनिबंधांत प्रकट झालेल्या व्यक्तित्वाशीं कांहीं लोभनीय भावनांचा जिव्हाळा निगडित झालेला दिसतो. 'पत्रें', 'ताजा कलम' व 'कोमेजणारीं फुलें' या तिन्ही निबंधांतील स्वभावदर्शन व मनाचा गोडवा किती आल्हाददायक आहे! 'जिव्हाळ्याच्या माणसाकडून आलेलं पत्र वाचणं आणि जिव्हाळ्याच्या माणसाला पत्र लिहावयास बसणं यांत जो अत्यंत नाजुक सुखाचा प्रकार आहे त्याला दुसऱ्या कशाचीच उपमा नाहीं. अंतरंगांतल्या माणसाचं पत्र आलं, कीं तें आपण किती हळुवारपणानें फोडतों' असें लेखक 'पत्रें' या निबंधांत लिहितो, तें प्रत्येकाच्या अनुभवाचें आहे. 'ताज्या कलमां' त तो लिहिणाऱ्याचें मन दिसून येतें. हेंच प्रो. फडके यांच्या शब्दांत असें सांगतां येईल–'जें मजकुरांत प्रकट झालेलं नसतं तें या ताज्या कलमांत नाजुकपणानं उघडं केलेलं दिसतं. या ताज्या कलमांतला अभिप्राय असा स्पष्ट दिसतो, कीं पत्र लिहिणाऱ्या व्यक्तीला माझा निरोप घेणं कष्टदायक होत असून ती माझ्याशीं आणखी बोलत आहे. एकमेकांचा निरोप घेणाऱ्या स्नेहबद्ध व्यक्तींचं रेंगाळणं अंतःकरणाच्या ज्या काव्यमय जडतेनं चालतं ती जडता त्यांत असते.' ' तिसऱ्या निबंधांतहि असेच रसोत्कट शब्द आहेत—'पत्रांत सुकुमार फुलं घालावींत अन् घातलेलीं यावींत असंहि वाटतं.'

'हरवली म्हणून सांपडली!', 'पहिला पांढरा केंस!', 'नव्या इमारती' व 'पुरून ठेवलेलें धन' यांतील आठवणीचे प्रसंग नि गोष्टी लेखकानें तन्मयतेनें वर्णिल्या आहेत. यांत पडलेलें लेखकाच्या जीवनाचें प्रतिबिंब फार लोभनीय आहे. त्याहिपेक्षां मोठी गोष्ट म्हणजे गत आयुष्याचें सिंहावलोकन करतांना ज्या भाबड्या, निष्पाप, प्रेमाच्या नि अभिमानाच्या भावनांनीं माणूस पाहतो त्या या निबंधांत दिसून येतात; लेखकाचें बाळपण नि तारुण्य येथें

विविध रंगांनीं चित्रित झालें आहे. 'पांढरा केंस!' हा निबंध दाढी करतांना नजरेस आलेल्या पांढऱ्या केसानें मनांत उठविलेल्या विचारांचें काहूर व विवेकाचें त्यावरील नियंत्रण यांच्या आंदोलनानें फारच उत्कृष्ट उतरला आहे. प्रो. फडके उमेद राखून म्हणतात, 'या पहिल्या पांढऱ्या केंसानं एक मोठा उपकार केला आहे माझ्यावर. तो हा, कीं आतां पुढं कितीहि पांढरे केंस माझ्या मस्तकावर दिसले तरी आश्चर्याचा अगर विषादाचा धक्का मला पुन्हा बसायचा नाहीं.' पण दाढी करतां करतां त्यांच्या विचारांना कलाटणी मिळते तेव्हां ते लिहितात, 'दहादां माझ्या मनांत आलं, कीं तो पहिला पांढरा केंस आजच न दिसतां आणखी पांचदहा वर्षांनीं दिसला असता तर बरं झालं असतं!' अशा विचाराच्या पूर्वीच त्यांनीं उत्साहपूर्वक निश्चय केलेला आहे, तो असा—'तारुण्य केंसांत नाहीं. मला माझी जवानी कायम ठेवायची असेल तर मला खरी काळजी घेतली पाहिजे माझ्या अंतःकरणाची. तरुण पिढीच्या विचारांशीं, भावनांशीं, महत्त्वाकांक्षेशीं, सुखस्वप्नांशीं समरस होण्याची माझी हौस नि ताकद मीं कायम ठेवली पाहिजे...तरुण पिढीला माझ्या विचारांनीं मी आकर्षित करूं शकतों तोंपर्यंत मी तरुणच रहाणार!'

आपल्या विलासी व्यक्तित्वामुळेंच प्रो. फडके 'सिगरेट' या निबंधांत विशेष मौज उत्पन्न करूं शकतात. त्यांचे एक स्नेही त्यांना बाहेर मोटारींत सोडून बँकेंत गेले, त्या वेळेला अनुलक्षून प्रो. फडके लिहितात, "ते परत येतांच म्हणाले, 'फार वेळ लावला मीं, रागावलां असाल तुम्हीं माझ्यावर.' हातांतली सिगरेट दाखवीत मीं म्हटलं, 'रागावलों असतों, पण हिची सोबत होती त्यामुळं किती वेळ झाला तें मला कळलंच नाहीं!'" सिगरेट ओढणारा मनुष्य ज्या धुंदींत रंगून जातो तिचें याहून अधिक वर्णन करायला नको.

प्रो. फडके यांच्या वृत्तीप्रमाणें त्यांची जीविताकडे पाहण्याची दृष्टि भेदक आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाला काव्याची सोनेरी कडा लाभल्यामुळें तें अतीव मनोहर झालें आहे. त्यांच्या जीवितविषयक तत्त्वज्ञानाचा महनीय विशेष म्हणजे तें तर्ककर्कश होत नाहीं; तसेंच तें 'हठादाकृष्ट' नाहीं; विषयाचा विस्तार होतां होतां, जीवनांतील वैगुण्याची तीव्रता कमी करून माणसाला उत्साहाची नवदृष्टि देणारीं तत्त्वरत्नें, विचार, भावना व कल्पना यांच्या मनोरम खेळकर विलासांतून उद्भूत होतात. त्यांचा हा जीवनाकडे पाहण्याचा

दृष्टिकोन अगदीं निरोगी आहे. ‘जीविताच्या रस्त्यावरून धावत पळत जाण्याऐवजीं रमतगमत स्वच्छंदानं सर्व सुंदर वस्तूंचा उपभोग घेत सहल करावी. मग सुखाचा शोध निराळा करावयास नको.’ अशी त्यांची दृष्टि आहे. जीवनाच्या धडपडींत व धावपळींत सांपडलेल्या, परिस्थितीचा ताण पडलेल्या माणसांना उद्देशून ते म्हणतात, ‘गांभीर्याचं, जबाबदारीचं, प्रतिष्ठितपणाचं ओझं मनुष्य काय अहर्निश डोक्यावर वागवूं शकेल ? खेड्यांतून भाजीनं भरगच्च भरलेले हारे डोक्यावर घेऊन शहराकडे लगबग जाणाऱ्या माळिणी तोंडानं गाणीं म्हणतात, अन् वाटेंत मधून मधून डोक्यावरचं ओझं खालीं ठेवून घाम पुसतात. त्याप्रमाणंच प्रतिष्ठितपणाचं ओझं दूर करून घटकाभर विरंगुळा घेण्याची संधि माणसानं साधली पाहिजे.’ इतकेंच नव्हे तर [‘घरकुलांतलीं दुःखं’ सांगतांना ते म्हणतात] ‘गर्दींत मिसळणं हें आपल्या खाजगी दुःखावर मोठं रामबाण औषध आहे.’ कारण, ‘संसार म्हणजे एक धकाधकीचा खेळ आहे. त्यांत लागायचंच, खरचटायचंच, पडापडी व्हायचीच. एखाद वेळेस जखमसुद्धां व्हायची. पण म्हणून चिडून तो टाकून का शहाण्या माणसानं जायचं ? नव्हे; उलट, आणखी आणखी उत्सुकतेनं, वाढलेल्या ईर्षेनं, आणखी विस्तृत दृष्टीनं त्या खेळांत बुसलं पाहिजे. असं केल्यावर सुखासाठीं अरण्यांत जायला नको. तें सदैव आपल्या जवळच आहे.’ संन्यास घ्यायला निघालेल्या कोणा भाऊरावाच्या विषयींच्या या प्रो. फडके यांच्या उद्गारांत मननीय विचार आहेत. ‘घरोघर मातीच्याच चुली’ या न्यायानें सर्व माणसें कमीअधिक असंतुष्ट असतात; मिळालें तें त्यांना अपुरें वाटतें, नकोसें होतें अन् जें जवळ नाहीं तें त्यांना हवें असतें. या विषयीं प्रो. फडके म्हणतात—‘जीं सुखं वांट्याला आलीं तीं माणसाला गोड वाटत नाहींत, जीं त्याच्या वांट्याला आलीं नाहींत तीं अधिक गोड असलीं पाहिजेत अशी तो स्वतःची कल्पना करून घेतो; आणि या भ्रमानं तो स्वतःला दुःखीकष्टी करून घेत असतो. जीं द्राक्षं हातीं आलीं नाहींत तीं आंबट असलीं पाहिजेत असं म्हणायला मनुष्य शिकेल तर तो खरोखर किती तरी अधिक सुखी होईल.’ द्राक्षें आंबट म्हणणाऱ्या कोल्ह्याची विनोदी वृत्तिच संसारांत उपकारक व सुखकारक ठरते.

कित्येकदां प्रो. फडके यांचें जीविततत्त्वज्ञान काव्याच्या सीमेवर घुटमळत असलेलें दिसतें. उदाहरणार्थ, ‘धूम्रवलयां’तील ‘बाजारां’त ते म्हणतात,

' गर्दी, गलबला, धावपळ या गोष्टी माणसाच्या जीवनाला आवश्यक आहेत. त्यांच्या योगानंच अंतःकरणाचा कोठा साफ राहतो. एकान्तांत मनुष्य चिन्तन करूं शकतो, अन् बाजाराच्या उल्हासी गर्दीत त्याच्या चिंता निवळतात. ओढे, नद्या, नाले धावत समुद्राला जाऊन मिळतात व आपल्या उदरांतलं सारं किल्मिष टाकून देतात; तद्वतच आपल्या मनाचा कोंडमारा झाला, चिंतेचं अथवा दुःखाचं किल्मिष फारच सांचलं कीं घटकाभर बाजारांत जावं. मानवी जीविताची धांदल अन् मुग्ध प्रसन्नता तिथं अविरत खेळत असते, ती आपल्या अंतर्यामांतलं सारं किल्मिष शोषून घेते. ' असा काव्य व तत्त्वज्ञान यांचा मधुर मिलाफ त्यांच्या निबंधांत अनेक स्थळीं झालेला दिसतो.

आतां प्रोफेसरांच्या काव्यविलासाकडे वळतों. तिन्ही पुस्तकांत नाना रमणीय काव्यस्थळें आहेत. कांहीं ठिकाणीं त्यांची काव्यदृष्टि प्रकर्षानें शोभते ती सुंदर चित्रें वाचकाच्या दृष्टीपुढें उभीं करून त्याला खचित मोहिनी घालते. ' ऐन पंचविशीं 'त असें एक चित्र आहे—' समुद्राच्या उसळत्या लाटा धावत येत. त्या किनाऱ्याच्या फरशीवर आपटत, तेव्हां मोठी गर्जना होई आणि सफेत मोत्यांचे सरच्या सर हवेंत उंच उडत ! दूर क्षितिजापर्यंत दृष्टि फेंकली, कीं तांबूस, काळसर अशा पाण्याच्या प्रचंड प्रक्षोभाखेरीज दुसरं कांहींच दिसत नव्हतं. वर आभाळांत ढगांची गर्दी झाली होती आणि पावसाची मुसळधार केव्हां कोसळेल त्याचा नियम नव्हता. अशा वेळीं एक कोळयाचा वीसपंचवीस वर्षांचा मुलगा एक लहानसा पडाव समुद्रांत लोटून मारे वल्हीं मारीत निघाला होता...वादळी समुद्रांत पडाव चालविणारा तो कोळ्याचा मुलगा आणि संसारसागरांत आपल्या आयुष्याची नौका चालविणारा ऐनपंचविशींतील कोणताहि तरुण या दोघांचं तंतोतंत साम्य आहे. पंचविशी म्हणजे उन्मादाचा ऐन मोसम. '

' नव्या गुजगोष्टीं 'तील ' आरसेमहालां 'त पृ० २२ वर असेंच एक मोहक चित्र आहे, त्यांत ' लाकडाची मोळी वाहणारा कातकरी, चित्रकार व सूर्यास्ताचें सौंदर्य ' यांचें दर्शन केलें आहे.

कांहीं ठिकाणीं जातां जातां सुरम्य कल्पना शब्दांत गुंफलेल्या दिसतात. अशा कल्पना उद्धृत कराव्या तितक्या थोड्याच ! येथें एक नमुना देतों—

' पाळण्याच्या छताला लोंबणारें मोती ज्या निःशब्द सोप्या भाषेंत बालकाच्या कानांत गोष्टी सांगतात त्या भाषेंत नभोमंडलांतील त्या असंख्य तारका किती

मजेमजेच्या रम्यकथा मला सांगत होत्या ! आणि तान्ह्या मुलानं भाबडेपणानं त्या मोत्यांच्या लकाकीकडे पहात त्यांजजवळ आपलं अंतःकरण उघडं करावं त्याप्रमाणं त्या तारकांजवळ मी माझ्या मनांतील सर्व गोष्टी खुशाल बोलत सुटलों होतों.'

काव्यमय कल्पना, ' असंतोष ' व कुतूहल यांच्या तरल रमणीय विलासांवर आधारलेले कांहीं निबंध पाहूं. ' अंधारी रात्र ', ' जागेपणचीं स्वप्नें ! ', 'बाजार' व ' एक स्वप्न ' हे कमीजास्त प्रमाणांत अशा प्रकारचे निबंध आहेत. 'अंधारी रात्र ' या निबंधांत लेखक स्वतःवर प्रसन्न झालेल्या देवतेला म्हणतो, ' आमच्या या पृथ्वीवर महिन्यांतून पंधराच दिवस चांदणं असावं ही फार खेदाची गोष्ट आहे. पाळीपाळीनं पृथ्वीवर चंद्रिकेचा वर्षाव करणारे दोन चंद्र असले तर काय बहार होईल ! दुसरा चंद्र तूं निर्माण करूं शकशील ? ' आणि देवतेनें पृथ्वीभोंवतीं एकच प्रदक्षिणा घालून अंतर्धान पावणारा चंद्र निर्माण करून लेखकाची इच्छा पूर्ण केली ! ' जागेपणच्या स्वप्नां 'त तर लेखकाच्या इच्छेनुसार स्वैर विहार करणाऱ्या कल्पनेनें काढलेलीं मनोरम मनोरथांचीं चित्रें आहेत. ' बाजारा 'चें चित्रहि वाङ्मयीन सत्याचे विविध रंग वापरून तयार केलें आहे. माणसांना बाजाराचें जबर आकर्षण असतें तें कां, तें या निबंधांत प्रतिबिंबित झालेल्या लेखकाच्या व्यक्तित्वावरून चांगलेंच लक्षांत येतें.

प्रो. फडके यांच्या लघुनिबंधांत ठळकपणें दिसणारे अनेक गुण सोदाहरण दाखविले. पण लघुनिबंधकाराला भूषणास्पद अशा कांहीं गुणांना त्यांच्या निबंधांत म्हणण्यासारखें स्थळ मिळालेलें नाहीं. ते गुण म्हणजे विनोद व उपहास. 'नव्या गुजगोष्टीं 'तील ' दिखाऊ अन् टिकाऊ ! ' व 'धूम्रवलयां'तील ' नको असलेलीं पुस्तकं ' यांतील उपहास व विनोद उत्तम साधला आहे. वरीलपैकीं पहिल्यांत लेखक, पुस्तक-परीक्षक व प्रकाशक यांची कशी हजेरी घेतली आहे तें दाखविण्यासाठीं लहान लहान उतारेच देतों—

१. ' एक मोठी अडचण अशी, कीं प्रतिपाद्य विषयाचा गंधहि नसतांना जे ग्रंथ लेखकांकडून लिहिले जातात त्यांना प्रकाशकानं तरी कुठला सुगंध आणून फासायचा ? '

[ सदर निबंध ' सुगंधी प्रकाशना 'च्या अमेरिकन बातमीवर आधारला आहे. सुगंध लावून पुस्तकें प्रकाशित करण्याच्या कल्पनेच्या निमित्तानें लेखकानें 'उपहास' उत्पन्न केला आहे. ]

२. " आधींच ठरावीक ठशाचे अभिप्राय ठोकून द्यायला सवकलेले पुस्तक-परीक्षक सुगंधी ग्रंथांची कल्पना प्रचारांत आली तर अधिकच आळशी बनतील आणि पुस्तक न वाचतांच त्याच्या बाह्यांगावरच चार मोघम शब्द लिहिण्यास त्यांना अधिक वाव मिळेल. एखाद्या गचाळ पुस्तकाबद्दल ते लिहितील, ' पुस्तकास लावलेला सुगंध अगदीं भारीपैकीं आहे व प्रत्येक रसिक स्त्रीपुरुषानं हें पुस्तक आपल्या शयनमंदिरांत अवश्य ठेवावं. "

३. ' ग्रंथाच्या बाह्यांगाच्या बाबतींत कृपणाचं व्रत आचरणाऱ्या आमच्या मराठी प्रकाशकांच्या अगदीं विरुद्ध टोंकाला असलेल्या उधळ्या अमेरिकन प्रकाशकांची ही एक नवीन लहर आहे झालं. '

' नको असलेलीं पुस्तकं ' यांत पुस्तकं उसनीं नेणाऱ्या व पुस्तकें आणून देऊन तीं वाचण्याची गळ घालणाऱ्या व्यक्तींचा उपहास करून विनोद साधला आहे. यांतील उपहास एका अर्थी मोठा गमतीचा आहे. कारण दुसऱ्यांना उपहास-विषय करतांना लेखकानें स्वतःलाहि, जणूं काय, न कळत त्यांच्या पंक्तीला बसवून वाचकाला हसविलें आहे. पुस्तकें मागून नेऊन तीं परत न करण्याच्या प्रथेबद्दल प्रो. फडके म्हणतात, ' आणि माझ्या संग्रहांतील इतकीं पुस्तकं लोकांनीं नेलीं; मनुष्य जातीबद्दल अनुदार सिद्धांतहि मी बांधीत नाहीं. उलट मी म्हणतों, ज्या अर्थी माझ्या संग्रहांत अजून इतकीं पुस्तकं कायम राहिलीं आहेत त्या अर्थी माझ्याकडे येणाऱ्या माणसांत सज्जन माणसंच अधिक असलीं पाहिजेत. ' अशा गोड विचारसरणीची जोड या निबंधांतील उपहासाला मिळाली आहे.

अशा बहुगुणांनीं अलंकृत असलेले हे लघुनिबंध वाचणारा वाचक प्रो. फडके यांचं प्रभावी व्यक्तित्व, आकर्षक वृत्ति, मधुर काव्यदृष्टि, समंजस जीविततत्त्वज्ञान व उपहास विनोद यांच्या विविध दर्शनानें प्रमुदित होतो, पण त्याची अंतर्दृष्टि नाना रमणीय गोष्टींचें सिंहावलोकन करते अन् कांहीं वचनरत्नें तो आपल्या स्मृतिपुटांत सांठविण्याचा प्रयत्न करतो. अशीं रत्नें अनेक आहेत; उदाहरणार्थ खालील उत्कृष्ट नमुने पहा—

' सुभाषितं हीं कचकड्याच्या खुळखुळयासारखीं आहेत. '

' सुहास्य हा अलंकार असा आहे, कीं तो कोणत्याहि मुखकमलावर मनोहरच वाटतो. '

'वाढप्याच्या बायकोला बुट्टयाच्या काळया शालूची केवढीहि हौस वाटली तरी ती तिच्या नेसत्या जुनेऱ्याइतकीच अपुरी राहणार!'

'नवे, कोरे ग्रंथ हे माणसाच्या मामुली परिचितासारखे असून जुने ग्रंथ हे जिवलग दोस्ताप्रमाणें होत.'

'छोटी वाट सांपडली कीं मोठी फार लांब नाहीं म्हणून समजा.'

'हॉटेलावरून जातांना खिशांत पैसे असले कीं भूक लागल्यासारखं वाटूं लागतं!'

—हीं रत्नें मूळ ग्रंथांतून हुडकून काढणाऱ्या हौशी वाचकाला पानें चाळतांना अनेक पाणीदार खडे टिपण्याचा अनावर मोह झाल्याविना राहणार नाहीं.

'यशवंत,' जून, १९४१

## प्रो. ना. सी. फडके

# पहिला पांढरा केंस

मी एकदम दचकलों अन् आरशांतल्या स्वतःच्या प्रतिबिंबाकडे अगदीं टक लावून पहात राहिलों !

तो माझ्या दृष्टीस पडेल अशी माझी यत्किंचितहि कल्पना नव्हती. त्यामुळें तो दिसतांच मला अत्यंत आश्चर्य वाटलं. अर्थात् केव्हां ना केव्हां तरी तो मला दिसणार हें मी जाणून होतों. कारण, लवकर म्हणा अगर उशिरां म्हणा, प्रत्येकाच्या दृष्टीस तो पडत असतो. पण त्याचं आगमन आज होईल असं माझ्या ध्यानींमनींहि नव्हतं. किंबहुना, मला तो आजपर्यंत कधींहि दिसला नसल्यामुळं केव्हां तरी तो दिसणार ही गोष्ट मी अजिबात विसरून गेलों होतों. या कारणानं तो दृष्टीस पडतांच मी चांगलाच चपापलों ! भांबावूनसुद्धां गेलों !

तो कोण तें तुमच्या लक्षांत आलं ना ?

डोक्यावरचा पहिला पांढरा केंस !

सकाळच्या प्रहरीं दाढी करीत होतों मी. उजव्या बाजूची दाढी संपली होती, आणखी डाव्या कानशिलापासल्या केंसाचा काट मारायसाठीं डाव्या आंगठ्यानं तिथले केंस सारखे करून उजव्या हातांतल्या वस्तऱ्याची धार त्या जागीं टेंकण्याच्या बेतांत होतों तोंच तिथल्या केंसांत एक पांढरा केंस मला दिसला !

मला प्रथम वाटलं, छे, पांढरा केंस असणं शक्य नाहीं. साबणाचा फेस चिकटून राहिला असेल तिथं. म्हणून मीं टॉवेलनं ती जागा चोळली अन् पुन्हा आरशांत पाहिलं. तों काय ? होताच कीं तो पांढरा केंस तिथं ! कांहींशा अधिकच उर्मटपणानं चमकत होता तो !

मग मात्र मी दचकलों, अन् विचार करूं लागलों.

दाढी करणं अन् विचार करणं या दोन्ही गोष्टी एकदम साधतात कीं नाहीं याबद्दल तुमचं काय मत आहे मला माहीत नाहीं. माझा स्वतःचा अनुभव विचाराल तर दाढी आणखी विचार एकदम करायला कांहीं हरकत आहे असं मला वाटत नाहीं. किंबहुना, विचार करायसाठीं दाढी करायच्या

वेळेइतकी दुसरी कोणती वेळ सोयीची असेल असं मला वाटत नाहीं. याचं कारण असं, कीं दाढीच्या निमित्तानं आपल्याला सुमारें अर्ध्या तासाचा जो एकांत मिळतो तसा दीर्घ एकांत दिवसाच्या एकंदर गडबडींत क्वचितच मिळतो. दाढी करायच्या वेळीं आपल्याजवळ सहसा कोणी असत नाहीं, अन् आपली चित्तवृत्ति बहुधा प्रसन्न असते. सुवासिक साबणाच्या फेसाचा आणखी कुंचल्याच्या मऊ मऊ कॆंसांचा आपल्या गालांना होणारा स्पर्श, आणि तो फेस वस्तऱ्यानं खरडून काढतां काढतां आपल्या चेहऱ्यावर येणाऱ्या टवटवीचं दृश्य यांच्या योगानं आपण साहजिकच जरा मजेंत असतों. अशी वेळ विचार करायला अनुकूल नाहीं असं कोण म्हणेल ? तुमचा अनुभव निराळा असला तर असो, मी स्वतः तर दाढी करतां करतां मनांतल्या मनांत नव्या नव्या कल्पनांशीं खेळत असतों खरा !

पण ही नेहमींची गोष्ट सांगितली मीं. त्या दिवशीं डाव्या कानशिलापाशीं पहिला पांढरा कॆंस दिसल्याबरोबर जी गोष्ट घडली ती नेहमींपेक्षां निराळी होती. मी विचार करूं लागलों खरा, पण तो दाढी करतां करतां नव्हे तर दाढी करायचं एकदम थांबवून.

तुमच्यापैकीं किती जणांना तरी पहिला पांढरा कॆंस अजून दिसायचा असेल. तेव्हां तो दिसतांच कोणकोणत्या कल्पना माणसाच्या मनांत येण्यासारख्या आहेत त्याची तुमच्यापैकीं फारच थोड्यांना कल्पना असेल. वरच्या ओंठावरचा पहिला काळा कॆंस दिसल्याबरोबर यौवनांत पदार्पण करणाऱ्या तरुणाला काय वाटतं त्याचा स्वानुभव मी आतां पार विसरलों आहें. नाहीं तर विरोधन्यायानं त्याचा दाखला मला उपयोगीं पडला असता. पण, स्मृति नसली तरी कल्पना चालवून मला असं म्हणतां येईल, कीं मिशीचा पहिला कॆंस दिसल्याबरोबर तरुण पुरुषाला विस्मयाबरोबरच आनंद आणखी अभिमान वाटत असला पाहिजे ! बरोबर याच्या उलट अनुभव माझ्या मस्तकावरचा पहिला पांढरा कॆंस दिसल्याबरोबर मला आला.

विस्मय वाटला, अंतःकरण किंचित् कंपितहि झालं. पण तें आनंदानं नव्हे, तर कांहींशा विषादानं !

कारण मला वाटलं, माझी जात एकदम बदलली ! पांढऱ्या कॆंसवाल्यांच्या जातींत मी एकदम जमा झालों !

जन्मसिद्ध जातींची गोष्ट सोडली तर जगाच्या दृष्टीनं माणसांच्या दोनच जाती आहेत. एक काळया केंसवाल्यांची अन् दुसरी पांढऱ्या केंसवाल्यांची; जुन्या कल्पना अन् गंजलेल्या चालीरीति निर्भयपणानं टाकणाऱ्यांची अन् नव्या कल्पना आणखी नव्या चालीरीति यांचा नामोच्चार होतांच भीतीनं कांपणाऱ्यांची; प्रस्तुताविषयीं असंतुष्ट राहून पुढच्या पराक्रमाची महत्त्वाकांक्षा धरणाऱ्यांची, आणि मागच्यांचे पराक्रम आठवून त्यांतच संतोष मानणाऱ्यांची; धाडसाची हौस बाळगणाऱ्यांची, अन् परंपरेची पूजा करणाऱ्यांची; सुधारणेचे मनोरथ करणाऱ्यांची आणि पुढें पाऊल टाकायला आढेवेढे घेणाऱ्यांची; संकटांना न जुमानतां क्षितिजाकडे धाव घेणाऱ्यांची आणि जागच्या जागीं बसणाऱ्यांची !

यांपैकीं पहिल्या जातींत मी आजपर्यंत होतों तो एकदम दुसऱ्या जातींत जाऊन पडलों असं मस्तकावरचा तो पहिला पांढरा केंस पाहून मला वाटलं. माझ्या मनांत आलं, लोक मला आतां म्हातारा म्हणणार ! मला भीति वाटली, तरुण माणसं आतां माझ्याविषयीं आदर दाखवूं लागणार. माझ्याशीं मित्रत्वाच्या अन् प्रेमाच्या नात्यानं तीं वागणार नाहींत ! तरुणांच्या आदरासारखी दुसरी आपत्ति नाहीं असं नेहमीं मला वाटत आलं आहे; आणखी ती नको ती आपत्ति त्या एका केंसाच्या रूपानं माझ्या मस्तकावर कोसळलेली तर मला स्पष्ट दिसूं लागली !

तो केंस दिसेनासा कसा करतां येईल याबद्दल मी जोरजोरानें विचार करूं लागलों. प्रथम माझ्या मनांत आलं, तेवढ्या केंसाला कात्रीनं छाट मारावी. पण हातांतली कात्री सरसावतांच तेवढा एकच केंस अलगद कातरणं किती कठिण आहे तें माझ्या ध्यानांत आलं! (नापिताला कारागीर कां म्हणतात तेंहि ताबडतोब ध्यानांत आलं!). छेः तो केंस कातरण्यांत कांहीं अर्थ नव्हता. एक तर तो कातरणं सोपं नव्हतं; अन् शिवाय, आत्तां कातरला तरी उद्यां दिसूं लागणारच कीं तो! मग माझ्या मनांत आलं, तेवढ्या जागीं कलप लावावा. पण तितक्यांत माझ्यापेक्षां अधिक वयाच्या स्नेह्यांकडून कळलेले अनुभव मला आठवले. कोणी पुनःपुन्हा कलप लावायला कंटाळलेले होते, कोणाच्या केंसांना कलपानं काळयाऐवजीं पिंगट रंग आला होता, आणखी सगळयांचेच केंस कलपाच्या उष्णतेनं रखरखीत झाले होते. आणि शिवाय, हें मीं पाहून ठेवलं होतं, कीं कलपानं

केंस सुंदर दिसले तरी त्यांचं तें सौंदर्य कृत्रिम आहे हें ताबडतोब ओळखूं येतं दांतांच्या डॉक्टरकडून बसवून घेतलेले दांत अतिशय सुंदर दिसतात; पण म्हणूनच ते खोटे आहेत हें ताबडतोब उघडकीस येतं! जी गोष्ट दांतांची तीच केंसांची. छेः, कलप लावण्यांत कांहीं अर्थ नाहीं......

मग करावं तरी काय ?

ह्या पांढरा केंस लपवावा तरी कसा ?—

पण तितक्यांत माझ्या मनानं उलट खाल्ली अन् मी विचार करूं लागलों, कीं हा पांढरा केंस नाहींसा करण्याची अगर लपविण्याची गरज काय आहे ? असेना तो ? जवानी अगर म्हातारपण केंसाच्या रंगावर का अवलंबून आहे ? ती एक मनाची व अंतःकरणाची अवस्था आहे. तारुण्य अगर वार्धक्य हें विचारांच्या जोमावर अगर शैथिल्यावर अवलंबून आहे. या जगांत ज्यांच्या मस्तकावरचे केंस अगदीं काळेभोर आहेत पण ज्यांच्या अंतःकरणांतील विचार थकलेले आणि भागलेले आहेत असे म्हातारे कमी का दृष्टीस पडतात ? ज्यांच्या मस्तकावर काळ्याभोर केशकलापाचं आच्छादन आहे पण ज्यांच्या आचारविचारांत यत्किंचितहि जवानी नाहीं अशा व्यक्ति आपल्याला प्रत्यहीं दिसतात. एका राज्याचा एक तरुण वकील परराष्ट्राच्या दरबारांत गेला असतां, 'हा बिनदाढीचा वकील; याला राजकारण काय कळणार ? ' असा जेव्हां तेथल्या वृद्ध मंत्र्यांनीं त्याचा उपहास केला, तेव्हां 'शहाणपण केंसांत नसतं!' असा रोखठोक जबाब त्या तरुणानं दिल्याची गोष्ट आमच्या वेळच्या एका क्रमिक पुस्तकांत वाचल्याचं मला आठवतं. शहाणपण जसं केंसांत नाहीं तसंच तारुण्यहि केंसांच्या रंगांत नाहीं. मला माझी जवानी कायम ठेवायची असेल तर मला खरी काळजी घेतली पाहिजे माझ्या अंतःकरणाची. तरुण पिढीच्या विचारांशीं, भावनांशीं, महत्त्वाकांक्षेशीं, सुखस्वप्नांशीं समरस होण्याची माझी हौस आणि ताकद मीं कायम ठेवली पाहिजे. नव्या जगांत उदय पावणाऱ्या नव्या कल्पनांचं, तत्त्वांचं आणि सिद्धांतांचं मर्मग्रहण करण्याचं सामर्थ्य माझ्या अंगीं सतत राहिलं पाहिजे. नव्या सामाजिक अगर राजकीय प्रयोगांची मला भीति वाटण्याऐवजीं उत्सुकता वाटत राहिली पाहिजे. अशा प्रकारें तरुण जगांत मी वृत्तीनं मिसळूं शकलों, कीं माझं तारुण्य सतत कायमच राहील. जोंपर्यंत

तरुण पिढीला माझ्या विचारांनीं मी आकर्षित करूं शकतों तोंपर्यंत मी तरुणच राहणार.

हें जर खरं तर असेना का तो पांढरा केंस माझ्या मस्तकावर ?

तो मी कात्रीनं कापणारहि नाहीं किंवा त्याला कलपहि लावणार नाहीं.

ज्यांना आपल्या अंतःकरणाच्या तारुण्याबद्दल विश्वास वाटत नाहीं त्यांच्यासाठीं आहेत बाजारांतले सारे कलप.

मला काय करायचे आहेत ते ?

अन् शिवाय, या पहिल्या पांढऱ्या केंसानं एक मोठा उपकार केला आहे माझ्यावर. तो हा, कीं आतां पुढें कितीहि पांढरे केंस माझ्या मस्तकावर दिसले तरी आश्चर्याचा अगर विषादाचा धक्का मला पुन्हा बसायचा नाहीं...

असं मनाशीं ठरवून मी दाढी पुरी करूं लागलों.......

पण मन बेटं किती विचित्र पहा! दाढी पुरी करतां करतां दहादां माझ्या मनांत आलं, कीं तो पहिला पांढरा केंस आजच न दिसतां आणखी पांचदहा वर्षांनीं दिसला असता तर बरं झालं असतं!

—नव्या गुजगोष्टी

निबंध ८०८

## प्रो. ना. सी. फडके

# बाजार

असं पुष्कळदां होतं. मला अमुक वस्तु अगदीं निकडीनं हवी असते म्हणून नव्हे तर बाजरांत जाऊन कांहीं तरी खरेदी करण्याची मला लहर येते म्हणून मी जातों, अन् ज्या वस्तु आणखी आठपंधरा दिवस घेतल्या नसल्या तरी चाललं असतं अशा वस्तु विकत घेऊन मी घरीं येतों. घरीं कागद शिल्लक असतात, पण मी ते घेऊन येतों. मनाशीं मी म्हणतों, आज नाहीं तरी आणखी चार दिवसांनीं ते लागतीलच ना? वस्तऱ्याच्या ब्लेड्स सरलेल्या नसतात, तरी मी त्या आणतों. अन् अशाच प्रकारें शाई, पेन्सिली, नोटपेपर इत्यादि किती तरी वस्तु मी नेहमीं आणीत असतों. कित्येकदां असंहि होतं कीं दुकानांत शिरतांना ज्या वस्तु घेण्याचा माझा यत्किंचितहि बेत नसतो अशा वस्तु खरेदी करून मी दुकानाबाहेर पडतों. मला हवे असलेले नोटपेपर बांधतां बांधतां दुकानदार विचारतो,

"आणखी काय देऊं? सेंट वगैरे.......?"

मी सांगतों, "नको."

"पण पॅरिसचे नवे सेंट आले आहेत. दाखवूं?"

माझ्या मनांत येतं, बघायला आपलं काय जातं? नोटपेपरांचं बंडल मी उचलीत नाहीं, तेवढ्यावरून दुकानदार माझ्या मनांतला विचार ओळखतो. तो लगबगीनं कपाटांतून एक मोठी कागदाची पेटी काढतो व दुसऱ्याच क्षणीं सेंटच्या दहापंधरा सुंदर मोहक बाटल्या माझ्यापुढें मांडल्या जातात. मी त्यांवरचीं नांवं वाचूं लागतों, मधेंच एखादीचं टोपण काढून तिच्या सीलबंद तोंडातून तिच्यांतल्या सुगंधाची कल्पना यावी म्हणून ती नाकाजवळ नेतों व तें पाहून दुकानदार म्हणतो,

"बघायलाच नको. अगदीं गॅरंटीचा माल आहे. हा 'जस्मिन' घ्या. आपल्याला आवडेल...... "

मी ती बाटली घेतों.

दुकानदार मनांत कदाचित् म्हणत असेल, "कसं बनवलं?"

पण तो असं समजत असेल तर तो खुळा आहे. मला माझ्या मनाविरुद्ध त्यानं एखादी गोष्ट करायला लावलेली असते असं मुळींच नाहीं. ज्यावांचून

अडलं आहे तेवढंच घ्यायसाठीं मनुष्य दुकानांत जातो असं त्याला वाटत असेल तर ती चूक आहे त्याची. दुकानदारानं आपल्याला कांहीं तरी घेण्याचा आग्रह करावा अशी माणसाची इच्छा असते. अशा आग्रहानं माणसाच्या ठिकाणची मोठेपणाची हांव पुरी होत असते. या इच्छापूर्तीच्या सुखासाठीं माणसं बाजारांत जातात. नको त्या वस्तु दुकानदाराच्या आग्रहाखातर विकत घेतल्या, कीं आपण कुणी तरी बडे शेठ आहोंत असं घटकाभर वाटतं. 'वस्तु' नव्हे, तर या जाणिवेचं सुख मनुष्य विकत घेत असतो. आपण बनलों, असं दुकानदार समजत असेल हें माणसाला समजतं. पण जें सुख त्याला हवं असतं तेवढ्यासाठीं ही किंमत द्यावयाची त्याची तयारी असते.

निदान माझी तरी असते. बाजारांत जायचं अन् नेमकी हवी तेवढीच वस्तु घेऊन परत यायचं म्हणजे शुद्ध वेडेपणा म्हटला पाहिजे. कारण 'बाजारांत जाणं' हा एक खेळ आहे. वेळ घालवावयासाठीं लोक पत्ते खेळतात, बुद्धिबळ, कॅरम खेळतात. मला कंटाळा आला, अन् दुसरं कांहीं करण्यासारखं नसलं, कीं मी उठतों अन् बाजारांत जातों. दहापांच दुकानांत हिंडलं, दोनचार वस्तु खरेदी केल्या, कीं बरं वाटतं. खिशांतले पैसे गेलेले असतात एवढंच वाईट.

पण 'बाजारांत जाण्या'चा हा खेळ पैसे खर्च न करतां खेळतां येत नाहीं असं समजूं नका. दुकानदारानं चार शिव्या दिल्या तरी त्या मनावर न घेण्याचा अभ्यास केला तर हा खेळ अगदीं फुकटांत हवा तेवढा खेळतां येतो. ज्या गांवीं आपल्या ओळखीपाळखीचं कोणी नाहीं, अन् प्रतिष्ठेची झूल अंगावर ठेवण्याचं आपल्याला प्रयोजन नाहीं अशा गांवीं या खेळाला फार रंग चढतो. अगदीं परप्रांतांतल्या शहरांत गेल्यावर तिथलीं प्रेक्षणीय स्थळं पाहण्यांत जितकी गंमत आहे, तितकीच उगीच्याच उगीच बाजार पेठेंतलीं दुकानं धुंडाळण्यांत आहे कीं नाहीं याचा अनुभव घेऊन पाहा. साध्या कापडदुकानापासून तों जवाहिऱ्याच्या दुकानापर्यंत वाटेल तिथें शिरावं, तऱ्हेतऱ्हेचा माल पाहावा, अन् अखेर नापसंतीची मुद्रा करून बाहेर पडावं. एवढंच, कीं ही बाहेर पडण्याची क्रिया फार कौशल्याची गोष्ट आहे. शिरणं फार सोपं. पण कांहीं खरेदी न करतां शिरसलामत बाहेर पाऊल टाकणं वाटतं तितकं सोपं नाहीं.

एकदां दिल्लीस असतांना मी एका शालविक्याच्या दुकानांत शिरलों. लोडाला टेकून बसलों. बड्या गिऱ्हाइकाचा आव आणला. पांच-पन्नास

शालजोड्यांचा ढीग माझ्यापुढें पडला. मला अर्थात् एकहि पसंत पडेना. दुकानदाराला वाटलं असावं, फार चोखंदळ गिऱ्हाईक आहे. त्यानं आणखी शाली काढल्या. पण एकीचं अंग नापसंत, तर एकीच्या कोपऱ्यांतले नारळ नापसंत; हिची किनार वाईट, तर तिचा रंग फार भडक; अशा शेऱ्यांच्या माऱ्यानं मीं ते ढीग गारद केले. दुकानदारानं मग अगदीं ठेवणींतल्या शाली काढल्या. मला तर शरम वाटूं लागली. मीं अखेर एक पान पसंत केलं. दुकानदारानं त्याची किंमत पंचावन्न रुपये सांगितली. "शीः ! कांहीं तरीच काय ?" असं म्हणून मी उठलों व पादत्राणं घालूं लागलों. मनांत वाटलं, सुटलों. पण दुकानदार शाल पुढें करून म्हणाला, "जातां काय एकदम ? आपण बोला कीं !" भलतीच कमी किंमत सांगितली कीं आपण सुटूं असा मीं विचार केला, अन् सारा सज्जनपणा गुंडाळून ठेवून म्हटलं, "वीस रुपये देईन." दुकानदारानं शाल माझ्या अंगावर फेकून म्हटलं, "चला, काढा पैसे. भवानी होऊं द्या आपल्या हातून !" शाल अंगावर असूनहि मी थंडच झालों ! शालीऐवजीं शालजोडींतले मिळाल्यासारखा चेहरा खचित झाला असेल माझा पैसे देतांना !

असला प्रसंग टाळण्याची एक नामी युक्ति माझ्या एका मित्रानं शोधून काढलेली आहे. तो मुळीं दुकानांत शिरल्याबरोबर दुकानदाराला प्रथमच सांगून टाकतो, "मला आतांच कांहीं खरेदी करायची नाहीं हो. फक्त मला माल पाह्यचा आहे." दुकानदाराला मग म्हणणं भागच पडतं कीं, "कांहीं हरकत नाहीं. बघा, बघा; काय दाखवूं ?" अशा प्रकारें दुकानदाराला निःशस्त्र केल्यावर मग काय ? त्याचं दुकान म्हणजे माझ्या मित्राचं राज्यच कीं. अगदीं उंची रेशमी, गरम, कापडाचे तागेच्या तागे त्यानं खुशाल पाहावे. "हें छान आहे. याचा भाव काय ?" असं मधून मधून विचारलं म्हणजे झालं. शर्टिंग, कोटिंग, रेशमी लुगडीं, नाना प्रकारच्या डिझाइनचीं सहा वारी पातळं, हवं तें बघावं; दुसऱ्या दुकानांत शिरून पांच-पन्नास छऱ्यांची उघडझांक करावी; पुढच्या दुकानावर स्वारी करून आरसे, कंगवे, ब्रश निरखावे, साबणाच्या पेट्या उघडायला लावून प्रत्येक पेटींतल्या एका वडीचा सुगंध मनमुराद घ्यावा; अन् "या हं शेठ" अशी सन्मानपूर्वक संभावना प्रत्येक दुकानदाराकडून मिळवीत दोन घटकांची बाजारपेठेची फेरी आटपून प्रसन्न चित्तानं घरीं परत यावं; असं विलक्षण 'टेक्निक्' माझ्या या चतुर मित्रानं साध्य केलेलं आहे. हें तुम्हांला शिकतां आलं तर पाहा.

मीं अजून असला प्रयत्न केला नाहीं. दुकानदार काय म्हणेल अशी उगीच भीति वाटते त्याला काय करायचं?

भाजी व फळबाजारांत मात्र मी पुष्कळदां हा प्रयोग थोडाफार करून पाहतों. कारण तो बोलून चालून रस्त्यावरचा उघडा बाजार. दुकानदाराच्या खाजगी हद्दींत आपण शिरलों आहोंत अशी ( trespass ची ) जाणीव तिथें मनांत येत नाहीं. ओल्या भुईमुगाच्या किंवा मटाराच्या शेंगांच्या ढिगांत खुशाल हात घालावा, भावाची चौकशी करावी, अन् पुढें जावं. आंबे, सफरचंद, संत्रीं, मुसंबीं उचलून पाहावीं, ठेवावीं; आणि एवढाहि धीर होत नसेल तर नुसती चौफेर नजर टाकीत साऱ्या स्टॉल्समधून चक्कर मारावी. त्यांतहि आनंद कमी नाहीं. मला तर मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटमध्यें किंवा पुण्याच्या मंडईंत घटका, अर्धी घटका, रेंगाळण्यांत विलक्षण मौज वाटते. हरतऱ्हेच्या ताज्या ताज्या भाज्यांचे ते प्रचंड ढीगच्या ढीग अन् कपड्यानं वरच्या वर पुसून ज्यांची कांति वाढविली आहे व झिरझिरीत रंगीबेरंगी कागदांच्या बैठकींत ज्यांची स्थापना केली आहे, अशा सतरा प्रकारच्या फळांनीं शिगोशीग भरलेले ते करंडे पाहिले, कीं डोळ्यांचं पारणं फिटल्यासारखं वाटतं. धरित्रीच्या उदरांतून बाहेर आलेल्या त्या फलसृष्टीचा सुगंध मिळाला, कीं चित्तवृत्ति ताज्यातवान्या होतात. आणि या बाजारांतला तो अखंड कोलाहल! तो कानांवर पडला, कीं अंतःकरणांत दडून राहिलेला कोणता तरी एक चमत्कारिक, अनामिक संस्कार संतुष्ट झाल्यासारखं व्यक्तित्व विरतं. माझ्या वैयक्तिक सुखदुःखांचे प्रश्न मी पार विसरून जातों. मला बरं वाटतं!

ती पहा ती माळीण, आपल्या भाजीची टवटवी राहावी म्हणून तिच्यावर पाणी शिंपतां शिंपतां किती उल्हासानं "पैशाला दोन लावल्या" म्हणून ओरडते आहे! कोवळ्या लुसलुशीत खिऱ्यांच्या ढिगामागं बसलेला तो माणूस बघा कसा हसतो आहे व ऐटीनं तागडी झुकवितो आहे! लालसर पिवळसर टपोरीं बोरं विकणारी ती बाई पाहिलीत कशी उच्च रवानं सांगते आहे, "साखरलाडू! सस्ते लावले!" या साऱ्या माणसांना काय प्रपंचाच्या चिंता नसतील? पण त्यांनीं त्या सगळ्या टाकून दिल्या आहेत, अन् जगाच्या कोलाहलांत तीं सामील होऊन घडीभर आनंद लुटताहेत! गर्दी, गलबला, धावपळ या गोष्टी माणसाच्या जीवनाला आवश्यक आहेत. त्यांच्या योगानंच

अंतःकरणांचा कोठा साफ राहतो. एकान्तांत मनुष्य चिंतन करूं शकतो, अन् बाजाराच्या उल्हासी गर्दींत त्याच्या चिंता निवळतात. ओढे, नद्या, नाले धावत समुद्राला जाऊन मिळतात व आपल्या उदरांतलं सारं किल्मिष टाकून देतात, तद्वतच आपल्या मनाचा कोंडमारा झाला, चिंतेचं अथवा दुःखाचं किल्मिष फार सांचलं, कीं घटकाभर बाजारांत जावं. मानवी जीविताची धांदल अन् मुग्ध प्रसन्नता तिथें अविरत खेळत असते, ती आपल्या अंतर्यामांतलं सारं किल्मिष शोषून घेते. कृष्णलीलांच्या बहुतेक गीतांत गोपी मथुरेच्या बाजाराला निघालेल्या असतात व त्या बाजाराच्या वाटेवरच सर्व दुःखांचा परिहार करणारा 'कान्हा' त्यांना भेटतो यांतलं मर्म हेंच आहे. बाजारांत हजारों वस्तूंचा क्रयविक्रय चालतो हें तर खरंच; पण तिथं सारीं माणसं गुप्त संकेतानं अकारण प्रसन्नतेची व उल्हासाची जी देव-घेव मुबलकपणं करतात तिला फार महत्त्व आहे. जिथें आपण एकमेकांचे धक्के मनावर घेत नाहीं, ओळख नसतांहि एकमेकांकडे पाहून हसतों, नसत्या चौकशी करूं शकतों, गर्दींत व गलक्यांत सामील होतों, त्या स्थलाचा मोह कुणाच्याहि मनाला पडावा, नव्हे काय?

मला तरी हा मोह आवरतां येत नाहीं; व म्हणून उगीचच्या उगीच बाजारांत जाण्याची हौस मी वारंवार भागवून घेतों.

—'धूम्रवलयें'

# प्रो. वि. पां. दांडेकर

**प्रो.** वि. पां. दांडेकर यांचीं 'फेरफटका' (१९३६), 'टेकडीवरून' (१९३७) व 'एक पाऊल पुढें' (१९४०) हीं लघुनिबंधांचीं पुस्तकें वाचतांना मला जेप्सन यांचे 'निबंधा'च्या तंत्राविषयींचे विचार वारंवार आठवत होते. जेप्सन म्हणतात, 'लघुनिबंधाचा विषय कोणताहि असो, विषयाचें प्रतिपादन अनिर्बंध असो, औपचारिक व रूढ बंधनें निबंधकारानें तोडलेलीं असोत, पण लघुनिबंध म्हटला कीं, त्याची रचना बांधेसूद, संलग्न व एकजीव असली पाहिजे.' या विचारांबरोबरच माझ्या मनांत एक आठवण जागी होती. १९३६ सालीं 'फेरफटका' पुस्तकाचें परीक्षण 'विविधवृत्तां'त प्रसिद्ध झालें होतें, त्यांत मीं लिहिलें होतें—

"'फेरफटक्यांत' त विषयाची विविधता भरपूर आहे. परंतु निबंधाचें प्रतिपादन बऱ्याच ठिकाणीं कलेला पारखें झाल्यामुळें व सारखेपणानें केलें असल्यामुळें विषयाच्या नावीन्यास रचनाचातुर्याची जोड मिळालेली नाहीं. विषयाचें अगत्य प्रस्थापित करण्यासाठीं लेखकानें संगृहीत केलेले अनुभवाचे चुटके व दाखले काळजीपूर्वक केलेल्या परिश्रमाचे द्योतक असले तरी त्यांचा उपयोग जंत्रीवजा ग्रथनानें करण्यांत आला आहे. कोणता कां अनुभवाचा चुटका असेना, तो सांगण्याची एक कायम ठशाची पद्धत लेखकानें स्वीकारलेली दिसते. 'एकदां काय मौज झाली', 'दुसऱ्या एका प्रसंगीं', 'दुसरे एक सज्जन आहेत', 'एका तरुणाची हकीकत मला माहीत आहे', 'माझे एक परदेशांत जाऊन आलेले इंजीनियर स्नेही आहेत', किंवा 'माझ्या माहितींतल्या एक बाई आहेत' अशा तऱ्हेचा आरंभ करून प्रो. दांडेकर अनुभवाचा एकएक घुटका वाचकाला पाजतात व एकेक परिच्छेद पुरा करतात."

"त्यामुळें परिच्छेदांची घडण व गुंफण कृत्रिम कंटाळवाणी झाली आहे. या म्हणण्याची प्रचीति यावी म्हणून 'बोरं' या निबंधांतील लागोपाठ येणाऱ्या परिच्छेदांचे आरंभ येथें उदाहरणादाखल देतों—'मला माझ्या मित्राचें अभिनंदन करायला जायचें होतें', 'माझ्या मित्राला भेटायला जाण्यांतहि माझी मनोभूमिका अशीच होती', 'माझा मित्र समोर दिसतांच मी ओरडलों', 'माझ्या मित्राचें उत्तर ऐकून मी सर्दच झालों' वगैरे. अशा तऱ्हेच्या

रचनावैगुण्यानें विषयाचें रहस्य विटून जातें. 'बोरें' या निबंधांत या वैगुण्याचा अतिरेक झाला आहे."

प्रो. दांडेकरांच्या 'फेरफटक्या' नंतरच्या पुस्तकांत मात्र हें रचनावैगुण्य कमी कमी होत गेलें आहे आणि 'एक पाऊल पुढें' यांत त्यांनीं खरोखरच रचनासौष्ठवाच्या बाबतींत 'एक पाऊल पुढें' टाकलेलें दिसतें; क्वचित् त्यांचें पाऊल पूर्वीच्या वैगुण्याच्या वळणावर घुटमळत असलेलेंहि दिसतें.

यामुळेंच कीं काय, कोणी वाचकानें मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांतील 'टेकडीवरून' या पुस्तकाच्या आरंभींच्या आभारप्रदर्शनांत एक वाक्य लिहिल्याचें मला आढळलें. त्यांतील 'मी आभार मानतों.' या प्रो. दांडेकरांच्या शेवटच्या वाक्यापूर्वीं 'सहनशील वाचकांचे–' अशी पुस्ती हातानें जोडलेली आहे.

त्या वाचकाचें म्हणणें सर्वस्वीं खोटें नाहीं. परंतु सहनशील वाचकांना छळण्याइतके प्रो. दांडेकरांचे निबंध मुळींच कंटाळवाणे नाहींत. विषयाचें प्रतिपादन व जिव्हाळा (sincerity), जीविततत्त्वज्ञान, रचनाचातुर्य, काव्यदृष्टि, भाषासरणी वगैरे गुणांची गोळाबेरीज करतां, प्रो. दांडेकरांचे निबंध बऱ्यापैकीं आहेत असें खात्रीनें वाटतें.

त्यांचें विषयप्रतिपादन सरळ नि सुबोध आहे, पण बहुधा त्याला भाषेचें सौंदर्य लाभलेलें दिसत नाहीं. त्यांच्या निबंधांत विषयाचें वैचित्र्य पुष्कळ आहे, जिव्हाळाहि आहे, पण उठावदार व्यक्तित्वाच्या अभावामुळें, 'सामान्यपणा'चा डाग त्यांना लागलेला दिसतो. प्रो. दांडकरांच्या व्यक्तित्वाचें एक अंग मात्र बहुवार प्रकट होतें. त्यांना आपल्या व्यवसायाचा वारंवार उल्लेख करण्याचा जणूं हव्यासच दिसतो! ते प्रोफेसर असल्याचें वाचकास तीनतीनदां वाचावें लागतें; आणि अनुभवाचे चुटके व चुटकेवजा कथा हीं पाहतां लेखकाची धंदेवाईक संग्राहक वृत्ति विशेष उठावानें दिसून येते.

प्रो. दांडेकरांचा जीविताकडे पाहण्याचा दृष्टिकोन उत्साहप्रेरक आहे. पण त्यांचा तत्त्वशोधनाचा उत्साह इतका दांडगा आहे, कीं लघुनिबंध उपदेशपर, प्रवचनवजा किंवा व्याख्यानरूप असूं नये हें उपकारक तत्त्व ते बहुधा धाब्यावर बसवितात; इतकेंच नव्हे तर 'एक पाऊल पुढें' सारख्या निबंधांत आधींच उतावळेपणानें सर्व तत्त्वज्ञान सांगून टाकून नंतर त्याचे चुटके-दाखले देऊन एकएक परिच्छेद लिहून, विवरण करतात. विषय कोणता कां

असेना, प्रो. दांडेकर उत्साहाचें तत्त्वज्ञान हुडकून काढायचेच! यामुळेंच कोठें कोठें त्यांचें जीवितविषयक तत्त्वज्ञान कोतें, किंबहुना लटकें दिसतें.

त्यांच्या मतें 'सृष्टीकडे आणि आयुष्याकडे थोड्याशा रसिकतेनें व खेळाडू वृत्तीनें बघितल्यास असें खचित वाटेल, कीं जगण्यांत मौज आहे.' जीविताचा शक्य तितका आनंद उपभोगावा, संसारांतील विषमतेकडे काणाडोळा करावा, अशी त्यांची विचारसरणी आहे. सुखदुःखांची विषमता पाहून ते म्हणतात, 'आपला संसार हा द्राक्षाप्रमाणें निव्वळ गोड किंवा चिंचेप्रमाणें निव्वळ आंबट नसून बोराप्रमाणें आंबटगोड असा आहे. द्राक्षें पुष्कळ खाववणार नाहींत, चिंच पुष्कळ खाववणार नाहीं, परंतु बोरांचें तसें नाहीं. आपल्या संसाराचेंहि असेंच आहे. दुःखामुळेंच त्याची गोडी कांहीं और बनली आहे.' (फेरफटका). सुखदुःखांच्या विषमतेप्रमाणें बिकट परिस्थितीविषयींहि त्यांचे विचार उद्बोधक आहेत. माणसाला स्मृति व आशा या दोन मोठ्या देणग्या निसर्गानें दिल्या आहेत, त्या नसतील तर मानवी जीवन रुक्ष, भकास, शून्य होऊन जाईल. 'आशा ही सदैव मानवी हृदयांत उचंबळत असते' असें एका इंग्रजी कवीनें म्हटलें आहे. तें नित्य सत्य आहे. आशा परिस्थितीवर मात करते. आशेविषयीं प्रो. दांडेकर लिहितात, 'आशेचें मद्य पिणाऱ्याला परिस्थितीची विषमता कधींच भासत नाहीं. दुःस्थितीच्या काळ्या कभिन्न मेघांवर आशेची रुपेरी कडा चमकत असते, म्हणूनच परिस्थितीच्या सहारा वाळवंटांतून वाट चालत असणाऱ्या मुशाफिराला त्याचें कांहींच वाटत नाहीं.' (ए. पा. पु., पा. ६). प्रोफेसरसाहेबांचा आशावाद मात्र दैवावर अवलंबून नाहीं, त्यांचा सर्व भार परिश्रमांवर आहे. "ज्याला आपण आशावाद म्हणतों," ते सांगतात, "तें परिस्थितीच्या पुढें एक पाऊल टाकणें असतें... ज्या स्थितींत असाल त्याच्यापुढें एक पाऊल टाकलेंत, कीं तुम्हांला हवें तें मिळेल. दैवावर विश्वास टाकलात कीं आटपलेंच! त्यानें तुमच्यावर कुरघोडी केलीच म्हणून समजा. त्यापेक्षां हिंमतीनें पुढें या म्हणजे तुम्हांला दिसेल, कीं जिकडे तिकडे प्रकाश आहे, आनंद आहे." (ए. पा. पु., पा. ३). आशेप्रमाणें आनंदहि जीवनाला उपकारक आहे. आनंद मिळेल तसा व तितका माणसानें हस्तगत करावा; जरूर पडल्यास त्यासाठीं त्यानें ठराविकाला मूठमाती द्यावी, ठराविकाची कोंडी फोडावी. "सर्व नियमांना एकीकडे झुगारून कांहीं काळ तरी प्रत्येकानें स्वच्छंदानें डोंगरमाथ्यावर हुंदडावें, रानांत भटकावें आणि

लाटांची लीला पहात समुद्रकिनाऱ्यावर खुशाल तासन्तास बसावें." ( फे. फ., पा. ८ ). प्रसंगीं नियमातीत होणें आवश्यक आहे असें नव्हे तर एकंदरींत "जगाकडे बेफिकीर वृत्तीनेंच बघितलेलें बरें. आयुष्यांतील चढउतारांवरून जात असतांना 'कांहीं फारसें नाहीं—नथिंग सीरिअस—' अशा भावनेनें जर आपण जाऊं लागलों तर आपणाला मुळींच त्रास व्हावयाचा नाहीं, उलट आनंदच होईल." आनंदी होण्यासाठीं पोरकटपणाचीहि लेखकानें शिफारस केली आहे. "प्रत्येकाच्या ठिकाणीं सुप्तावस्थेंत मूलपणा, बालिशपणा, खेळकरपणा असतोच असतो. आपण उगीचच प्रौढपणाचें पांघरूण अंगावर आणि मनावर घेऊन बसलेलों असतों." ( टेकडीवरून, पा. ८३ ). हें प्रौढपणाचें पांघरूण झुगारून दिल्यानेंच माणसाला आनंद लाभेल असें लेखकास वाटतें व त्यामुळेंच तो दुसऱ्या एका निबंधांत म्हणतो, "दिवाळीच्या सणांत कांहीं कांहीं म्हाताऱ्यांना तरुणांप्रमाणेंच नव्हे, तर लहान मुलांप्रमाणें वागतांना जेव्हां मी पाहतों, तेव्हां मला फार बरें वाटतें." ( ए. पा. पु., पा. ९१ ). मोठ्यांनीं लहान व्हावें व आनंद लुटावा, त्यांनीं लहानग्यांच्या संगतींत रमून जावें, याच दृष्टीनें विद्यार्थ्यांच्या सहवासाचा गुरूवर होणारा परिणाम प्रो. दांडेकर वर्णितात, "विद्यार्थ्यांच्या सान्निध्यांत वयोमानाची जागृतिच नसते. आपण अजून लहान आहोंत, तरुण आहोंत, हूड आहोंत, असेंच मला नेहमीं वाटत असतें." त्यांना गंभीरपणाचा तिटकारा आहे. वेदान्त सांगणाऱ्या, जीवित क्षणभंगुर आहे असें म्हणून सदा दुःखी कष्टी होणाऱ्या जनांबद्दल त्यांना सहानुभूति वाटणें शक्यच नाहीं. "ते लोक शाश्वततेच्या मृगजळामागें लागून क्षणाच्या सुखाला आंचवतात. तुम्हीं त्यांना कितीहि सांगितलेंत तरी ते ऐकणार नाहींत. विचक्षणा करकरून सुखाला आणि सौंदर्याला ते पारखे होतील. तुम्हीं त्यांच्यासमोर आइस्क्रीम ठेवलेंत तरी तें क्षणिक म्हणून ते स्वीकारणार नाहींत." ( ए. पा. पु., पा. ५१ ).

संसारांत प्रेमाचें महत्त्व फार आहे असें प्रोफेसरसाहेबांचें मत दिसतें. 'प्रेमा' कडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन एकांगी आहे; त्यांना त्याची चांगली बाजू तेवढी दिसते, किंबहुना प्रेमाची प्रकाशमय बाजू त्यांच्या जीविततत्त्व-ज्ञानाला पोषक असल्यामुळेंच ते तीच पुढें मांडतात आणि प्रेमाच्या माधुरीपेक्षां त्याच्या कटुतेचेंच गाणें कवींनीं अधिक गायिलें आहे हें ते विसरून गेलेले दिसतात. 'जाहल्या तिन्ही सांजा' ( फे. फ. ), 'घरघरटें' ( ए. पा. पु. )

व ‘ लेडीज रूम ’ ( फे. फ. ) या निबंधांवरून त्यांच्या प्रेमाच्या कल्पना दिसून येतात. ‘ जाहल्या तिन्ही सांजा ’ यांत त्यांनीं प्रेमाचे पोवाडे मुक्तकंठानें गायिले आहेत. ‘ लेडीज रूम ’ मध्यें त्यांनीं कॉलेजांतील ‘ लग्हाळयां ’ संबंधीं विवेचन केलें आहे. प्रोफेसर साहेबांचें प्रेमाचें कोरींव तत्त्वज्ञान ‘ घातक ’ आहे, तें फसवें आहे, तें अशक्य आहे. विजेनें कोठें, केव्हां आणि कसें कोसळावें याचे नियम करण्याइतकाच हा प्रो. दांडेकरांचा प्रयत्न निष्फळ आहे. वीज सांगून पडत नाहीं, प्रेम सांगून जडत नाहीं. प्रेमाला नियम माहीत नाहींत असें इंग्रजी कवि चॉसर म्हणतो तें प्रो. दांडेकरास माहीत नसावें. प्रो. दांडेकरांची प्रेमाच्या साफल्याची कल्पना केवळ कल्पनाच होय. ‘ घरघरट्यां ’ तील त्यांची प्रेमाची कल्पना मात्र मोठी मनोरम आहे. ते म्हणतात, ‘ आकाशांत स्वैरसंचार करणाऱ्या, पोटासाठीं वणवण फिरणाऱ्या किंवा उडणाऱ्या पक्ष्याला संध्याकाळ होऊन काळोख पडूं लागतांच घरट्याकडे धावून जावेंसें वाटतें. कारण घरट्यांत ऊब असते, सुरक्षितता असते. घराच्या बाबतींतहि हेंच म्हणतां येईल, त्यांत प्रेमाची ऊब असते, संरक्षणाची खात्री असते. ( ए. पा. पु , पा. ४४–४५ ).

तत्त्वज्ञानाप्रमाणें काव्याचीहि जोड प्रो. दांडेकरांच्या निबंधांना लाभलेली आहे. ते कवीची वृत्ति धारण करूं शकतात, पण थोडी फार वृत्ति त्यांना साधली तरी कवीचे शब्द मात्र त्यांना फारसे लाभलेले दिसत नाहींत. त्यांची काव्यदृष्टि आगगाडीच्या रुळांसारख्या पदार्थांतहि रमून जाते ! ‘ त्या रुळांकडे पाहिलें, कीं कसल्या तरी भव्य नि उदात्त भावना ( त्यांच्या ) मनांत उत्पन्न होतात. ’ आणि ‘ सृष्टिसुंदरीनें आपल्या पाठीवर दोन वेण्या सोडल्यासारखे ते काळेभोर नि तकतकीत रूळ दिसतात. ’ ( ए. पा. पु., पा. ३५ ). या यंत्रयुगांत कवितेचे विषय नाहींत अशी तक्रार करणाऱ्या कवींनीं प्रो. दांडकराच्या या दृष्टीनें व वृत्तीनें सुधारलेल्या जगाकडे पाहिल्यास त्यांना सर्वत्र काव्यविषय दिसतील. ‘ नियमितपणा ’ ची कोंडी फोडून आडपथ धरणाऱ्याला त्यांच्या मतें कसा काव्यमय फायदा होतो पहा–‘ क्वचित् फळाफुलांनीं बहरलेल्या वृक्षांना वळसा घालून जावें लागेल आणि मग पक्ष्यांचा मंजुळ रव व भ्रमरांचा गुंजारव हीं ऐकायला मिळतील. याहिपेक्षां क्वचित् वाटेंत खडक आल्यानें पाणी जोरानें उसळेल आणि मग पाणी दुभंगलें तरी हवेवर कितीतरी मोतीं उधळलीं जातील आणि त्यांवर किती तरी इवलालीं इंद्रधनुष्यें नाचतील. ’ ( फेरफटका, पा. ६ ).

'स्त्री' ही तर प्रो. दांडेकरांना नितान्त रमणीय काव्यनिधान वाटते. 'स्त्री ही पुरुषाच्या वाटेंतील धोंड नसून ती एक सुंदर नदी आहे. जिच्या निर्मळ प्रवाहाकडे पाहून पुरुषाला पोहावेंसें वाटतें, विहार करावासा वाटतो, जिच्या कांठावर त्याला संसार थाटावासा वाटतो, जिच्या तीरावरील फुलांनीं आणि फळांनीं त्याच्या चित्तवृत्ति थरारून जातात, अशी ती एक सुंदर नदी आहे.' (ए. पा. पु., पा. ६५). अशा दृष्टीनें ते स्त्रीकडे बघतात.

मूलहि प्रो. दांडेकरांना काव्याचें प्रतीक वाटतें. मुलाचें निर्व्याज हास्य अरसिकाला रसिक करतें, कठोराला मृदु बनवितें, विराग्याच्या मनांतहि अनुराग उत्पन्न करतें. ते मुलांच्या हास्याचा प्रभाव वर्णन करतांना म्हणतात, 'साऱ्या विश्वाची जादू त्यांच्या हसण्यांत भरलेली असते. काळ्या ढगांआडून चमकणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें अडींअडचणीच्या वेळीं बालकाचें हास्य चमकत असतें.' (ए. पा. पु., पा. ८४, ८५).

काव्यमय वृत्तीमुळेंच प्रो. दांडेकर मुंबईची सारी जादू 'तिच्या पदराशीं खेळणाऱ्या सागरांत आहे असें सांगतात.' 'हांक' व '३१ डिसेंबर' या निबंधांत प्रो. साहेबांच्या या वृत्तीची उत्कटता चांगलीच प्रकट झालेली दिसते.

कांहीं ठिकाणीं सरस काव्यकल्पनांप्रमाणें सुंदर वचनें प्रो. दांडेकरांच्या लेखणीनें पेरलेलीं आहेत. उदाहरणार्थ येथें दोन देतों—

'रागवावें पण मनांत राग धरूं नये.'

'दगडासारखें शाश्वततेचें जीवन कंठण्यापेक्षां इंद्रधनुष्याचें क्षणिक जीवन पुरवलें.'

अशा वचनांप्रमाणें गुजराती व हिंदी म्हणींचाहि लेखकानें उपयोग केला आहे.

विनोद व उपहास यांच्या योजनेनें निबंधांत मनोरंजन व उद्बोधन साधण्याकडे प्रो. दांडेकरांनीं लक्ष पुरविल्याचें दिसून येतें. रचनेचें सौंदर्य लाभलें नसतांहि त्यांचे निबंध, संवाद, गोष्टी, चुटके नि विनोद-उपहास यांच्या उपयोगामुळें वाचनीय झाले आहेत. 'टेकडीवरून-' मधील श्रीमंतांचा स्वयंपाक', 'एक पाऊल पुढें' यांतील 'न्हावीदादा' आणि 'फेरफटक्यां'तील 'घमेंडखोर' व 'उपरण्याचे उपयोग' ह्या निबंधांत लेखकानें विनोदाच्या साधनांचा पुष्कळ उपयोग केला आहे. 'न्हावीदादा'च्या वर्णनांत त्यांनीं अतिशयोक्तीचा अवलंब करून त्याच्या वार्ताहरणाचें वर्णन केलें आहे. त्याच

निबंधांतील उपहास कसा आहे त्याचा एक नमुना देतों—'संपादक हा जसा सर्वज्ञ समजला जातो, तसा नापितहि समजायला कांहीं हरकत नाहीं असें मला वाटतें.' 'श्रीमंतांचा स्वयंपाक' हा निबंध तर कांठोकांठ उपहास-विनोदानें भरलेला आहे. यांत स्वयंकरणाचें-स्वतःचीं कामें स्वतः करण्याचें—व्रत आचारणाऱ्या कोणा श्रीमंताला लेखकानें हास्यास्पद बनविलें आहे.

वर विवेचिलेल्या गुणदोषांनीं युक्त असलेले प्रो. दांडेकर यांचे निबंध वाचणाऱ्यास त्यांच्या स्वभावाचा गोडवा पटल्याशिवाय राहत नाहीं. आपण हसावें, सुखी व्हावें अन् दुसऱ्यांना हसवावें, सुखी करावें असा त्यांचा मानस दिसतो. यामुळेंच रागीट माणसाबद्दल ते म्हणतात, 'दूषित हवेचा जसा आजूबाजूच्या लोकांवर अनिष्ट परिणाम घडतो, तसेंच रागीट मनुष्याच्या भोंवतालच्या मंडळींना त्याच्या अकारण रागाचे दुष्परिणाम भोगावे लागतात.'

जातिवंत लघुनिबंधकाराला आवश्यक असा विषयप्रतिपादनाचा जिव्हाळा, संवादप्रियता, काव्यदृष्टि व विनोद हे गुण प्रो. दांडेकरांना लाभले आहेत; या गुणांना रचनेचें चातुर्य, वृत्तीची उत्कटता, प्रभावी व्यक्तित्व व भाषेची रमणीयता यांची चांगली जोड मिळाल्यास त्यांची लेखणी उत्कृष्ट लघुनिबंधांना जन्म देईल अशी खात्री वाटते.

—यशवंत, जुलै, १९४१

## प्रो. त्रि. पां. दांडेकर

# पोरकटपणा

चोंच उघडी ठेवून मेघबिंदूंची मार्गप्रतीक्षा करणाऱ्या चातकाची संस्कृत कवींनीं केलेली कल्पना खरी नसली तरी रम्य आहे, अशी आमची सर्वांची खात्री त्या दिवशीं झाली. त्या दिवशींचा उन्हाळा म्हणजे काय! सर्वत्र होमकुंडच पेटल्यासारखें वाटत होतें. सूर्यास्त होऊन संध्याकाळ झाली तरी कढत कढत वाफा जमिनींतून निघत होत्या. पपीहा पक्षाचा हृदयभेदक आक्रोश सुरू होता—'प्यासाहुं, प्यासाहुं.' घरांतल्यापेक्षां बाहेर बरें, म्हणून आम्ही मंडळी फेरफटका करावयाला निघालों. आकाशांत पश्चिमेकडे कांहीं मेघखंड दिसत होते. पावसाचें चिन्ह होतें तें. चिमण्या मातींत बसून धुळीनें शरीर माखून घेत होत्या. त्याहि दर्शवीत होत्या पाऊस लवकर येणार म्हणून. आमचीहि इच्छा होती, कीं पावसानें यावें आणि आम्हांस खूप भिजवावें. आम्हांला आमच्या धुळाईच्या कपड्यांची पर्वा वाटली नाहीं. आकाशांत ढग जमा होऊं लागले, वारा वाहूं लागला. कांहीं पावसाचे थेंब पडले. कोणाकोणाच्या अंगावर ते पडले, याची आम्ही कौतुकानें चौकशी करूं लागलों. ज्यांच्या अंगावर थेंब पडले होते, त्यांना वाटलें आपण धन्य होत. इतक्यांत पाऊसच जोराचा येऊं लागला. सरीवर सरी येऊं लागल्या. टपोऱ्या मोगऱ्याच्या कळ्यांचे हारचे हार आकाशांतून पृथ्वीवर सोडल्यासारखे दिसत होते. इतक्या जोरानें येत होत्या पावसाच्या धारा जमिनीवर, कीं खालीं सर्वत्र बुडबुड्यांचीं फुलेंच फुलें नाचत होतीं आणि पृथ्वीची आतुरता वाफांच्या रूपानें प्रकट होत होती. पावसानें भूमातेला संतुष्ट केलें. जिकडे तिकडे पाणीच पाणी झालें. केवढें मजेदार दृश्य दिसूं लागलें! पावसाचा जोर कमी होऊन झिमझिम सुरू झाली. आम्ही आमचे भिजलेले कपडे पिळून टाकले आणि परत यायला निघालों.

कागदाच्या नावा करून त्या पाण्यांत सोडण्यांत मुलें दंग झालीं होतीं. कांहीं मुलें पाण्यांत नाचत होतीं. पाणी पाहिलें, कीं मुलांना नाचावेसें कां वाटतें याचा शोध करून पाहण्याजोगा आहे. केवढें अगाध प्रेम असतें त्यांचें पाण्यावर! बेहोष होतात तीं पाणी पाहिलें म्हणजे. तसें पाहिलें तर आपलें सर्वांचेंच

पाण्यावर प्रेम असतें. नदी, सरोवर, निर्झर, सागर हीं पाण्याचीं विविध स्वरूपें आपणाला नेहमींच आकर्षक वाटतात. ज्याला पाण्याचा खेळकरपणा पाहून थांबावेंसें, त्यांत डुंबावेंसें वाटत नाहीं, त्याच्यांत कांहींच पाणी नाहीं, असें खुशाल समजावें.

आम्ही जरा पुढें गेलों तों एक तरुण स्त्री घरांतून मुद्दाम बाहेर येऊन पावसाच्या झिमझिमीखालीं उभी राहिली. तिचें आमच्याकडे लक्ष नव्हतें. ती जवळ जवळ नाचतच होती. तिला भिजवायला सांपडलें म्हणून पावसाला आनंद झाला.

पण याहीपेक्षां एक म्हातारी जेव्हां स्वतःच्या अंगणांत येऊन पावसाखालीं उभी राहिली तेव्हां आम्हाला खूपच आश्चर्य वाटलें आणि आनंदहि वाटला. त्या म्हातारीच्या ठिकाणीं मूलपणा (किंवा मुलगीपणा) अद्यापि शिल्लक असलेला पाहून आम्हांला पराकाष्ठेचें समाधान वाटलें. मला त्या वेळीं सुप्रसिद्ध निबंधलेखक गार्डिनर याची आठवण झाली. त्यानें एके ठिकाणीं 'We must try to maintain the eternal boy in us' अशा आशयाचा जो मजकूर लिहिला आहे त्याचें स्मरण झालें. योग्यच नाहीं का गार्डिनरचें म्हणणें? प्रत्येकाच्या ठिकाणीं सुप्तावस्थेंत मूलपणा, बालिशपणा, खेळकरपणा असतोच असतो. आपण उगीचच प्रौढपणाचें पांघरूण अंगावर आणि मनावर घेऊन बसलेले असतों. सभ्यतेच्या आणि मोठेपणाच्या फाजील कल्पना उराशीं बाळगल्यानें आपण आपल्या आयुष्यांतील आनंदाला अकारणच मुकलेले असतों. ज्यांना आपल्या ठिकाणीं असलेली बाल्यवृत्ति टिकवितां आली ते धन्य होत असेंच मी म्हणेन. संसाराच्या गाड्याला त्या बाल्यवृत्तीच्या स्प्रिंग्ज् किंवा रबरी धावा लावल्या असतांना संसार दुःसह खात्रीनें होणार नाहीं. उलट संसाराचें रूपांतर एखाद्या क्रीडेंत झालेलें आपणाला आढळेल आणि क्रीडेंतील किंवा खेळांतील जयापजयाचें जसें आपणाला कांहींच वाटत नाहीं, तसेंच संसारातील सुखदुःखांचेंहि कांहीं फारसें वाटणार नाहीं.

माझ्या माहितींत अशीं कितीतरी स्त्री-पुरुषरत्नें आहेत, कीं ज्यांना संसारांतील सुखाची ही गुरुकिल्ली हस्तगत झालेली आहे. एक साठी उलटलेले

गृहस्थ आहेत. परंतु त्यांच्या ठिकाणीं गांभीर्याचा लवलेश नाहीं. उपनिषदें वाचण्याऐवजीं ते कादंबऱ्या वाचणेंच पसंत करतात. हरिकीर्तनालाप ऐकण्याऐवजीं ते आपल्या नातवंडांचीं रडणीं-ओरडणींच ऐकत असतात. संतांशीं चर्चा करण्याऐवजीं ते मुलांबाळांशीं गोष्टी करण्यांत स्वतःला धन्य समजतात. आणि स्वतःच्या हातून किती जप झाला याची मोजदाद न करतां बायकोबरोबर बिझिक खेळून त्याचेच मार्क्स मोजीत बसतात ! ते पोराबाळांची, लेकीसुनांची इतकी थट्टा करतात, कीं त्यांच्या बायकोला मधून मधून म्हणावें लागतें, ' पुरे झाला हा पोरकटपणा ! ' त्यावर त्यांचें उत्तर ठरलेलें असतें. ते म्हणतात, " पोरकटपणा माझ्या पांचवीला पुजलेला आहे. तो आतां स्वभावधर्म बनला; आणि स्वभावाला औषध नसतं हें तुला माहीतच आहे. कोणीं तुला विचारलें, ' तुमचा नवरा असला कसला ? ' तर त्याला किंवा तिला म्हणावं, ' साठी बुद्धि नाठी!' " असलें उत्तर ऐकून त्यांची पत्नी निरुत्तर होत असेल हें सांगणें नलगे.

कांहीं दिवसांपूर्वीं आमच्या घरीं एक वृद्ध संन्यासी आले होते. आम्हांला माहीत नसलेलीं जंगलांतील कितीतरी सौंदर्यस्थळें त्यांनीं आम्हांला दाखविलीं. आमच्या बरोबर ते अनवाणी पायांनीं चालत. गांव जरा मागें राहिला, कीं धांवायला सुरवात करीत. रस्त्यानें जातांना झाडांवर करवंदें किंवा जांभळें दिसलीं तर लहान पोरांप्रमाणें तीं तोडून खात व आम्हांला देत आणि आम्ही परशुरामकुंडावर गेलों तेव्हां तर त्यांनीं त्या पाण्यांत इतका खेळ केला, कीं आम्हां तरुणांना त्यांनीं लाजविलें. पोहण्याचे निरनिराळे प्रकार, उड्या मारण्याच्या वेगवेगळया तऱ्हा त्यांनीं आम्हांला सप्रयोग दाखविल्या. त्यांच्या अंगीं पोरकटपणा असलेला पाहून, त्यांच्याविषयीं आम्हांला वाटत असलेल्या आदरांत प्रेमाची भरच पडली.

पुष्कळांची अशी समजूत आहे, कीं मोठ्या माणसांनीं जरा दुरूनच जगाच्या खेळाकडे बघावें; लहान मुलांशीं जरा दुरूनच बोलावें चालावें; असें केल्यानें आपला आब राहतो, आपलें वजन राहतें. माझ्या मतें या विचारसरणीइतकी फोल विचारसरणी अन्यत्र पाहूं जातां सांपडावयाची नाहीं. आपल्यापेक्षां वयानें, बुद्धीनें लहान असलेल्यांचें प्रेम व सहानुभूति हीं संपादावयाचीं असल्यास, त्यांच्यांत मिसळलेंच पाहिजे, त्यांच्याशीं समरस झालेंच पाहिजे. आपल्यांत जर कांहीं गुणविशेष असतील तर इतर आपणाला

योग्य तो मान देतील. त्याकरितां मोठेपणाचें, वृद्धपणाचें खोटें अवडंबर नको माजवायला. खरा मान आणि खरा आदर हीं मागून मिळत नसतात. हिमालयाला पाहून आपलें मस्तक नमतें तें त्याच्या ठिकाणीं असलेल्या स्वयंभू महनीयतेमुळें. तो जसा हिमाचा मुकुट धारण करतो, तसाच क्षुद्र निर्झरांनाहि आपल्या अंगाकर, खांद्यावर बागडूं देतो.

आणि तसाच विचार केला, तर दुसऱ्यांनीं आपल्या पोरकटपणाकडे पाहून, आपला जो मान ठेवावयाचा तो नाहीं ठेवला तर नाहीं. त्या मानाकरितां आपण आपल्या आयुष्यांतील आनंद घालवावयाचा कीं काय ? दुसऱ्यांची पर्वा आपणाला हरघडी पाहिजे कशाला ? आपण आपणाला वाटेल तसें खुशाल वागावें. कधींहि वृद्ध न होणाऱ्या पिटरपेनची कल्पना इंग्रज लोकांनीं करून त्याचा पुतळाहि उभारला आहे. आपण शरीरानें वृद्ध झालों तरी मनानें कां व्हावें, हें मला कळत नाहीं. शरीर आणि मन हीं अन्योन्याश्रयी आहेत हें मला कबूल आहे. खेळकर मनाचा शरीरावर परिणाम फार होतो. ज्या वृद्ध स्त्रीपुरुषांच्या ठिकाणीं पोरकटपणा वसत असतो, तीं शरीरानें देखील चांगलींच निरोगी आणि टुणटुणीत राहतात.

आपलें मन हें कांहींसें पोलादी कमानीसारखें आहे. त्याला फार ताण सहन होत नाहीं. गंभीर विचारांचा त्याच्यावर फार दाब असला तर त्याच्या ठिकाणीं असलेला लवचीकपणा नाहींसा होतो. तें मुर्दाड बनतें. त्याला लवचीकपणा ठेवण्याकरितां बालिशवृत्तीचा जेवढा उपयोग होतो तेवढा कशाचाहि होत नाहीं.

या बाबतींत एक मजेदार गोष्ट आठवली ती सांगतों. जगप्रसिद्ध तत्त्वज्ञानी इसाप याची कीर्ति ऐकून एक भला मनुष्य त्याला भेटायला आला. त्याची कल्पना अशी होती, कीं इसाप जमिनीकडे पाहत कुठल्यातरी गहन विषयाच्या चिंतनांत गुंतला असेल. त्याऐवजीं इसाप आपल्या मुलांबाळांशीं बालिश क्रीडा करीत असलेला पाहून त्या भल्या गृहस्थाच्या मनाला जबरदस्त धक्का बसला ! इसापसारख्या तत्त्वज्ञानी पुरुषानें लहान मुलांशीं पोरकटपणानें खेळणें म्हणजे काय होय, असें त्याला वाटलें. परंतु आल्यासारखें इसापला नमस्कार वगैरे करून त्यानें आपली शंका विचारली. त्याबरोबर इसाप हसला आणि त्यानें घरांतून दोरी काढून ठेवलेलें धनुष्य आणून त्या मनुष्यासमोर

ठेवलें. तरीहि त्याचें समाधान न झालेलें पाहून तो म्हणाला, “ आपलें मन ह्या धनुष्यासारखें आहे. त्याला चोवीस तास दोरी बांधून ठेवली तर तें पाहिजे तेव्हां वाकावयाचें तर नाहींच नाहीं, उलट तुटून मात्र जाईल. ”

मनाचा ताण सैल करायला पोरकटपणाशिवाय दुसरा चांगला उपाय नाहीं आणि म्हणूनच त्या म्हातारीला जेव्हां भिजतांना मीं पाहिलें तेव्हां तिच्याविषयीं मला धन्यता वाटली. लहान मुलीच्या ठिकाणीं शोभणारी तिची बालिश वृत्ति पाहून, आम्हांला आमच्या भिजलेल्या कपड्यांचें कांहींच वाटलें नाहीं. आम्ही सर्व तिचाच विचार करीत घरीं परतलों.

—टेकडीवरून

प्रो. वि. पां. दांडेकर

# ३१ डिसेंबर

गेल्या ३१ डिसेंबरची गोष्ट. दर वर्षी या तारखेच्या आसपासच्या दिवसांत मी बहुतेक परगांवीं जात असतों. जुनें वर्ष आणि नवें वर्ष यांच्या संधिकालांत बाहेर कुठेंतरी जाऊन आणि ताजेतवानें होऊन, नव्या वर्षाच्या दुसऱ्यातिसऱ्या तारखेला घरीं परत यावयाचें, असा क्रम कांहीं वर्षांचा माझा आहे. यामुळें कांहीं फायदे व क्वचित् कांहीं तोटेहि होतात.

कांहीं वर्षांमागें श्री. नानासाहेब चापेकर यांच्या अध्यक्षतेखालीं बडोद्यास साहित्यसंमेलन भरलें असतांना, माझ्या भटक्या स्वभावाप्रमाणें मी संमेलनाच्या दिवसांत हरिद्वार-हृषिकेशच्या गंगातटाकावर भटकत होतों! अर्थात् केवळ साहित्याचा विचार केल्यास माझें अपरिमित नुकसान झालें असें माझ्या कांहीं मित्रांप्रमाणें मलाहि एकादे वेळीं वाटतें. परंतु साहित्यसंमेलनाचें खोटें निमित्त करून नाताळच्या सुट्टींत बडोद्यास मौज मारायला आलेल्या पाहुण्यांचा मला जो खात्रीनें त्रास सोसावा लागला असता तो लागला नाहीं, यांत मला वाटतें माझा खूप फायदाच झाला असणार.

पाहुण्यांना माझा हा स्वभाव आतां माहीत झाल्यासारखें दिसतें. त्यामुळें यंदा जे पाहुणे आले ते नाताळची सुट्टी सुरू होण्यापूर्वीं चार दिवस! पाहुण्यांची गाडी दाराशीं येतांच माझ्या उरांत धडकीच भरली. मनांतल्या मनांत मी त्यांच्यावर रागावलों देखील. त्यांतून पाहुणे तरी कुणी चांगले होते का? आपलीं सर्वच वयस्क माणसें! एक दोन त्यांच्यांत स्त्रियाहि होत्या. परंतु त्या आया-आज्यांप्रमाणें शोभणाऱ्या अशा होत्या. असल्या पाहुण्यांपासून कसला आनंद आणि कसलें सुख, असा विचारहि माझ्या मनांत आला. परंतु आपणालाहि एक दिवस म्हातारें व्हायचें आहे, असा पोक्त विचार करून आणि चेहऱ्यावर हर्षाच्या कळया उमलवून मीं ताबडतोब पाहुण्यांचें स्वागत केलें. माझ्या स्वागतानें पाहुणे इतके खुष झाले, कीं त्यांनीं आपले डेरे-तंबू आमच्या घरांत चांगले दहा दिवस ठेवले! ३१ डिसेंबरला

माझे पाहुणे गर्गाचार्यांच्या सुमुहूर्तावर मथुरेकडे प्रयाण करते झाले आणि त्यानंतर मला माझ्या स्वतःविषयीं विचार करायला फुरसद मिळाली.

पण हाय ! फुरसदीअंतीं केलेला विचार तापदायक ठरला. प्रवासाकरितां राखून ठेवलेले पैसे पाहुण्यांची मिजास राखण्यांत खर्ची पडले होते आणि मला बडोद्याबाहेर कुठेंहि जातां येणें शक्य नाहीं, हें सत्य त्यांतून निर्माण झालें होतें. अर्थात्, त्या दिवशीं माझ्या डोक्यांत क्रांतीचे विचार अगदीं थैमान घालीत होते. भांडवलशाही नष्ट झाली पाहिजे, माझ्यासारख्या श्रमजीवी आणि बुद्धिजीवी माणसांना मिळतो त्यापेक्षां अधिक पैसा मिळाला पाहिजे, आम्हांला प्रवास करतां आला पाहिजे, थोडीशी चैन करतां आली पाहिजे, 'इन्किलाब झिंदाबाद', 'क्रांति चिरायु होवो' इत्यादि अद्यतन आणि पुरोगामी विचार माझ्या डोक्यांत सुरू होऊन, जणूं काय त्यांचा नशाच माझ्या अंगावर चढला होता !

परंतु नशा चढून काय उपयोग ? इमानें इतबारें नोकरी करणाऱ्या माझ्यासारख्या शिक्षकाला मनांतल्या विचारांनीं मनांतच दाबून ठेवावें लागत असल्यानें, मीं विचारचक्र प्रयत्नानें बंद केलें आणि आईनें समोर आणून ठेवलेला चहा घेतला.

त्या चहानें मात्र माझ्यांत अनुकूल बदल घडवून आणला आणि माझी खात्री झाली, कीं रेल्वे स्टेशनवरील चहाच्या दुकानावर झळकत असलेल्या चहाविषयक जाहिराती सर्वस्वीं खऱ्या आहेत. 'गरमीके दिनोंमें थंडक देनेवाली चहा है'—हें म्हणणें अगदीं खरें आहे. हवेंतील उष्णता जो चहा कमी करूं शकतो, तो डोक्यांतील उष्णता कमी केल्याखेरीज कसा राहील ? कधींच नाहीं. निदान माझा तरी अनुभव तसा नाहीं. चहामुळें, क्षणापूर्वी उत्पन्न झालेले सर्व क्रांतिकारक आणि पुरोगामी कीं पुच्छगामी विचार माझ्या डोक्यांतून पार नाहींसे होऊन, त्या जागीं शांत विचार सुरू झाले. ठीक आहे; असेंच चालावयाचें, असेच पाहुणे यावयाचे, असेच खिसे रिकामे व्हावयाचे, अशा प्रकारचे शांत, सौम्य नि मवाळ विचार माझ्या डोक्यांत सुरू होऊन माझ्या आईला आणि पत्नीला हायसें वाटलें, असें त्या दोघींच्या चेहऱ्यावरून मला दिसलें.

मीं कोट-टोपी चढविली आणि घराबाहेर पडलों. दुधाची तहान ताकावर भागवावी, त्याप्रमाणें लांबचा प्रवास नाहीं तर नाहीं, जवळचा

प्रवास करावा असें मीं ठरविलें. चालत चालत मी स्टेशनवर गेलों. सुदैवानें तिथें दोन गाड्या उभ्या असून त्या परस्पर भिन्न दिशांना जाणाऱ्या होत्या. त्यांपैकीं एका गाडीनें गेलें असतांना रात्रीं बडोद्याला येण्याची शक्यता पाहून मला आनंद झाला. त्या आनंदाच्या भरांत स्टेशनमास्तरला मीं तिकिटाची किंमत विचारली. 'जाऊन येऊन सुमारें एक रुपया लागेल' असें त्यानें सांगितलें. मीं माझ्या खिशांत हात घालून पाहतांच त्यांत सातआठ पैसेच असलेले आढळले! या ठिकाणीं माझी कींव करणाऱ्या कांहीं वाचकांना ३१ तारखेला त्यांच्या स्वतःच्या खिशांची काय अवस्था होते, तिकडे लक्ष देण्याची मी नम्रपणें सूचना करतों. माझा पडलेला चेहरा पाहून स्टेशन-मास्तरनें सहानुभूति व्यक्त केली. परंतु तसें कांहीं करण्याची जरूरी नाहीं, असें त्यास मीं आश्वासन दिलें.

गाडीनें प्रवास नाहीं तर नाहीं; पायींच प्रवास करावा असें मीं शेवटीं ठरविलें आणि स्टेशनवर उभ्या असलेल्या दोन्ही गाड्यांकडे आणि त्यांत बसलेल्या प्रवाशांकडे तुच्छतेनें बघत मी मुंबईच्या दिशेनें जाऊं लागलों.

सर्व प्रकारचीं सुचिन्हें मला होऊं लागलीं. वारा मंद मंद वाहूं लागला! आकाश निरभ्र दिसूं लागलें! भारद्वाज पक्षी मला मधून मधून दिसूं लागले! आणखीहि कांहीं गोष्टी दिसल्या. परंतु त्या शुभ कीं अशुभ यांची मला माहिती नसल्यानें त्यांच्याविषयीं मुग्धताच स्वीकारीत आहें. एखाद्या वीराप्रमाणें माझी पावलें दमदार पडत होतीं आणि थोड्याच वेळांत मी पुष्कळ चाललों असें रेल्वेच्या बाजूनें लावलेल्या माइली-धोंड्यांवरून मला कळलें. थोडा का होईना, पण प्रवास आज झाला या जाणिवेनें मला खूप बरें वाटलें. मीं सूर्याकडे बघितलें. ते बुवा आपला दिवसाचा प्रवास संपवून अस्ताला जाण्याच्या तयारींत दिसले. अर्थात् मलाहि माझा प्रवास तिथेंच थांबवावा लागला.

एका दगडावर बसून सूर्यास्ताची शोभा मी पाहूं लागलों. जुन्या वर्षाचा निरोप सूर्य घेत असतांना दिसत होता आणि हें हृदयस्पर्शी दृश्य, आकाशांत जमा होऊन विविध रंगांचे ढग पाहत होते. क्षितिजापासून वर आकाशांत ढगांच्या बिछायतीवर सूर्यकिरणांचा पट्टा दिसत होता. त्याचा खालचा भाग अंधुक व वरचा भाग अधिकाधिक प्रकाशमय होता. जुन्या वर्षांतून निर्माण

होणारें नवें वर्ष जणूं काय असेंच प्रकाशमय, तेजोमय, स्फूर्तिमय निघणार अशी ग्वाही किंवा सूचना त्या प्रकाशमार्गावरून मिळत होती. तें दृश्य पाहून नकळत माझे दोन्ही हात जोडले गेले. 'यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः।' ही ओळ मला आठवली आणि वाटलें, कीं खरेंच अजूनहि विश्वाचें किंवा विश्वदेवाचें सम्यग्ज्ञान कुठें झालें आहे आपणाला ? नमस्कार असो त्या चिच्छक्तीला ! तिच्या सहानुभूतीनें नवें वर्ष सुखाचें आणि प्रगतीचें सर्वांना होवो !

—एक पाऊल पुढें

# प्रो. अनंत काणेकर

लेखकाचें व्यक्तित्व हा लघुनिबंधाचा एक प्रमुख विशेष होय. लघुनिबंधाचें यश वा अपयश त्यांत प्रतिबिंबित झालेल्या लेखकाच्या व्यक्तित्वावर बरेंच अवलंबून असतें. लेखकाची जीविताकडे पाहण्याची दृष्टि, विषयप्रतिपादनाचें कौशल्य व भाषाशैली हीं व्यक्तित्वाच्या प्रमाणांत कमीजास्त नवीन, स्वतंत्र व आकर्षक वाटतात आणि साहित्यकृति जितकी आटोपशीर, कलायुक्त व आत्मपर तितक्या अधिक उत्कटतेनें तींत तिच्या कर्त्याचें व्यक्तित्व प्रतीत होतें. भावगीतें व लघुनिबंध प्रायः अशा कृतींत मोडतात. रचनेप्रमाणें यांचें एकंदर स्वरूप भिन्न असतें. विचार, भावना व कल्पना यांचा स्वानुभूतीच्या अग्नींत झालेला सुंदर मिलाफ म्हणजे भावगीत. उत्कटता आणि गेयता हे भावगीताचे प्रकृतिगुण असल्यामुळें तें आटोपशीर असावें लागतें. लघुनिबंधाचें तसें नाहीं. तो पद्यरचनेच्या बंधनांनीं जखडलेला नाहीं, त्याला गद्याचा अधिक खुला प्रदेश मोकळा असतो. परंतु भावगीताप्रमाणें लघुनिबंधाचा दर्जा, विषयाचा जिव्हाळा व जिवंतपणा यांवरच विशेषतः अवलंबून असतो.

प्रो. अनंत काणेकर यांनीं भावगीत व लघुनिबंध हे दोन्ही वाङ्मयप्रकार हाताळून चांगलें नांव केलें आहे. त्यांनीं फुलविलेल्या प्रीतीच्या 'चांदराती'नें वेडावून जाऊन रसिकांनीं 'किति गोड गोड वदलां' अशा शब्दांत त्यांचें अभिनंदन केलें आहे. त्यांच्या लघुनिबंधांचे तीन संग्रह प्रसिद्ध आहेत. 'पिकलीं पानें' (१९३४), 'शिंपले व मोती' (१९३६) व 'तुटलेले तारे' (१९३८). या त्यांच्या पुस्तकांत एकूण चौऱ्याऐंशीं लघुनिबंध आहेत. या लघुनिबंधांचा व 'चांदरातीं'तील कवितांचा तोंडवळा सारखा आहे. सहज साधलेली सुबोधता, चटकदार उत्कटता व गोड आटोपशीरपणा हे त्यांच्या दोन्ही वाङ्मयप्रकारांचे समान गुण होत. संग्रहांत प्रसिद्ध होण्यापूर्वीं त्यांचे निबंध नियतकालिकांत क्रमशः प्रकाशित झाले होते, त्यामुळें कदाचित् त्यांची लांबीरुंदी ठराविक होणें अपरिहार्य झालें असेल. तथापि, वाङ्मयकृतीच्या आटोपशीरपणाचा तत्त्वतः विचार करूनच वरील विधान केलें आहे. गॉस यांनीं 'निबंधा'बद्दल काढलेले उद्गार प्रो. काणेकरांच्या लघुनिबंधांना चांगले लागू पडतात. गॉस म्हणतात, 'An essay should be elegant, fresh,

confidential and constructed with as much care as a sonnet.' प्रो. काणेकरांचे लघुनिबंध सुरेख आहेत, त्यांत ताजेपणा असून वाचकाला विश्वासांत घेण्याचें सामर्थ्य आहे आणि त्यांची रचना सुनीताइतकी काळजीपूर्वक केलेली आहे.

अंतर्गुणांत मात्र त्यांचे लघुनिबंध त्यांच्या भावगीतांपेक्षां इतके भिन्न आहेत, कीं 'चांदरातीं'त दिसून येणारा भावनेचा हळुवारपणा किंवा हळवेपणा या निबंधांत शोधून सांपडायचा नाहीं. या निबंधांत सखोल, स्पष्ट व क्वचित् सडेतोड विचारसरणी दिसून येते. प्रो. काणेकर हे येथें शब्दार्थांच्या मधुर व गेय मोहकतेची जोपासना करीत नाहींत; ते मंजुळ मुरली फेंकून देऊन तत्त्वज्ञान्याच्या भूमिकेंत येथें वावरत असल्याचें दिसून येतें.

उदाहरणार्थ, त्यांचें प्रेमाचें तत्त्वज्ञान पहा. 'प्रेमा' ची काव्यमय दिव्यता येथें दिसत नाहीं. 'चांदरातीं' तील प्रेममाधुरीचा यथेच्छ आस्वाद घेतलेल्या रसिकांस या निबंधांतील प्रेमविषयक विचार धक्का देतील, गदगदां हालवतील नि जागे करतील. ते म्हणतात, " 'प्रेम, प्रेम' ज्याला म्हणतात ती एक शरीरविकृति आहे. एक प्रकारच्या वेडाची लहर आहे. अर्थात् फार सुंदर वेड आहे तें. तरी पण वेडच आणि तें वेड असल्यामुळें व्यवहारांत त्याला जागा नाहीं." (पि. पा., पा. ७९) आणि विवाहेच्छु प्रेमिकांना प्रो. काणेकर बजावून सांगतात, 'एखाद्या व्यक्तीवर आपलें फार प्रेम असेल तर तिच्याशीं विवाह करूं नये. तें प्रेम ओसरण्याची वाट पहावी आणि तें ओसरून त्याची जागा मैत्रीनें पटकावली तर मगच विवाह करावा. कारण विवाहासारख्या व्यवहाराला मैत्रीचाच चिरकालीन पाया हवा. प्रेमाची उन्मादावस्था ओसरून विशुद्ध मैत्रीचा जर उदय होणार नसेल, तर विवाह ही एक असह्य बेडी होईल.' (कित्ता, पा. ७५). 'प्रेम आहे तोंपर्यंत विवाह करूं नका आणि विवाह केल्यावर प्रेम करूं नका.' (कित्ता, पा. ७७). याचा अर्थ असा नव्हे, कीं संसारांत प्रेममय वातावरण असूं नये. फक्त त्यांना एवढेंच प्रतिपादन करावयाचें आहे, कीं "तांदूळवाल्यांचीं बिलें आणि घरवाल्याचें भाडें चुकतें करतां करतां अद्भुतरम्यतेला विशेष वाव रहात नाहीं. तरी पण संसाराच्या रुक्ष व्यवहाराला अद्भुतरम्यतेची थोडी तरी रुपेरी किनार असावी, असें मला वाटतें. अर्थात् उठतां बसतां प्रत्येक पतीनें आपल्या पत्नीला 'हे हृदयेश्वरी' आणि प्रत्येक पत्नीनें आपल्या नवऱ्याला

'हे प्राणनाथ' या शब्दांशिवाय हांक मारूं नये!" (पि. पा., पा. ११८). इतकेंच नव्हे तर 'संसाराचें नाटक आनंदपर्यवसायी करावयाचें असेल तर प्रत्येक पतीनें वल्लभाची आणि प्रत्येक पत्नीनें वल्लभेची भूमिका करण्याचा थोडा फार तरी अभ्यास ठेवला पाहिजे' (पि. पा., पा. ११९). प्रेमाच्या (अर्थात् लग्नपूर्व) एकनिष्ठपणाबद्दल श्री काणेकरांचे विचार निश्चित व वास्तव आहेत. ते लिहितात, 'प्रेमांत पडणें ही एक नैसर्गिक सहजप्रवृत्ति आहे. त्याचप्रमाणें प्रेमभंग होणें ही एक नैसर्गिक आपत्ति आहे' (शिं. मो., पा. ६२). आणि, 'एकनिष्ठ प्रेम याचा अर्थ एका काळीं एखाद्या स्त्रीनें एकाच पुरुषावर प्रेम करणें, किंवा एखाद्या पुरुषानें एका वेळीं एकाच स्त्रीवर प्रेम करणें.' (कित्ता, पा. ६२). चंचल मनोवृत्तीच्या प्रेमिकांना मात्र त्यांचें मत अनुकूल नाहीं.

स्त्रीच्या समाजांतील स्थानाबद्दल प्रो. काणेकर नवीन मताचे आहेत. त्यांना स्त्रीवर निसर्गतः पडलेल्या जबाबदारीची पुरेपूर जाणीव असून तिच्याबद्दल आदर आहे. 'माते'पुढें त्यांचें मस्तक कृतज्ञतेनें व आदरानें वाकलेलें दिसतें. ते म्हणतात, 'मानवी जीवनाचें सातत्य राखण्याची मानाची पण भयंकर जबाबदारी स्त्रीच्या अंगावर टाकून तिच्या जीवनाची एक बाजू निसर्गानें कायमची पांगळी करून टाकली आहे. आगामी जीवनाच्या जोपासनेकरितां स्वतःच्या जीवनांतल्या किती तरी सुखांवर पाणी सोडून आणि केव्हां केव्हां स्वतःच्या प्राणांचें मोलहि देऊन, निसर्गानें तिच्यावर टाकलेली असामान्य जबाबदारी ती पार पाडीत असते.' (शिं. मो., पा. ४६)

स्त्रीच्या हक्कांबद्दल प्रो. काणेकरांनीं पोटतिडिकीनें लिहिलें आहे. तिला हिंदु समाजांत जें स्थान आहे त्याविषयीं त्यांनीं व्यक्त केलेले विचार सडेतोड व सत्य आहेत. 'जमीनजुमला, हत्ती घोडे, तशीच स्त्री! मालमत्तेचा एक भाग! स्त्रीसंबंधीं मालकी हक्काची ही प्रवृत्ति मानवी मनाला खिळली आहे, ती इतकी जुनी आहे, कीं शतकानुशतकें मनुष्याची उत्क्रांति झाली, उघडें नागडें राहण्याच्या रानटी अवस्थेंतून मनुष्य सध्यांच्या ज्ञानवृद्धतेच्या अवस्थेंत येऊन पोहोंचला, तरी या प्रवृत्तीचा निखारा या साऱ्या ज्ञानवृद्धतेच्या आणि तर्ककुशलतेच्या ढिगाखालीं अजूनहि जिवंत आहे. सारा समाज जोंपयत मालकी हक्कावर उभारला आहे–' प्रो. काणेकर घटस्फोटाचा पुरस्कार करतांना म्हणतात, 'तोंपर्यंत ही प्रवृत्ति उघड अगर थोडीबहुत

प्रच्छन्न राहणारच आणि एखाद्या प्रामाणिक माणसाच्या बुद्धीला कितीहि पटलें, तरी या प्रवृत्तीला विरोधक अशी एखादी गोष्ट घडतांच या साऱ्या प्रचंड ढिगांतून हा निखारा धगधगणारच. त्या गृहस्थाच्या बुद्धीला घटस्फोटाची आवश्यकता पटली, पण मनाला कसेंसेंच वाटलें, त्याचें तरी कारण हेंच' (पि. पा., पा. ४). पांढरपेशा हिंदु समाजाला प्रायः घटस्फोटामुळें हिंदुधर्म बुडणार असें वाटत आहे. त्या समाजाला प्रो. काणेकरांचा सणसणीत सवाल आहे, 'खरें पाहूं गेल्यास कोट्यवधि हिंदुधर्मीयांपैकीं शेंकडा चार किंवा पांच टक्के असलेल्या पांढरपेशा वर्गांत फक्त घटस्फोट नाहीं. बाकी उरलेल्या पंच्याण्णव टक्के खालच्या वर्गांत, स्त्रीवर्ग स्वतःच्या श्रमावर पैसे मिळविण्यास समर्थ असल्यामुळें राजरोस काडीमोडीचा प्रकार चालू आहे... घटस्फोटामुळें जर सामाजिक अवनति होणार असेल तर, ज्या धर्मांतल्या शेंकडा पंच्याण्णव लोकांत हा प्रकार आहे तो धर्म उदात्त आणि पवित्र कसा ?'

विषमतेमुळें केवळ स्त्रीवरच नव्हे तर इतर कनिष्ठांवरहि वरिष्ठांचा जुलूम होतो, त्याचा प्रो. काणेकरांनीं तीव्र निषेध केला आहे. 'विशिष्ट समाजव्यवस्थेंत जो वर्ग सत्ताधीश असेल तो आपल्या वर्गहिताला ज्या ज्या गोष्टी पोषक त्या त्या नीतिकारक व ज्या ज्या स्वहितविरोधी त्या त्या अनीतिकारक असें ठरवून टाकतो. मनुस्मृतीचा काळ घ्या, ब्राह्मणाला चारी वर्णांपैकीं खालच्या कुठल्याहि वर्णांतल्या स्त्रीशीं विवाह करायला मोकळीक ! ब्राह्मणानें शूद्र स्त्रीशीं व्यभिचार केला तर त्याला थोड्याशा मोहरा दंड, पण शूद्रानें ब्राह्मणीशीं व्यभिचार केला तर त्याला हाल हाल करून ठार करावयाचा ! ब्राह्मणानें शूद्राला शिवी दिली तर विशेष कांहीं नाहीं; पण शूद्रानें जर का ब्राह्मणाला शिवी दिली तर लोखंडाचा खिळा तांबडा लाल तापवून दहा आंगळें त्याच्या तोंडांत खुपसावा असें आमचे पूज्य पूर्वज मनुराज सांगतात ! वर्गहितसंरक्षणाचा इतका किळसवाणा कळस जगाच्या इतिहासांत दुसरीकडे कुठें सांपडेल किंवा नाहीं याची मला शंका वाटते' (शिं. मो., पा. ५८). अशा विदारक शब्दांत प्रो. काणेकरांनीं आमच्या हिंदु समाजव्यवस्थेवर टीका केली आहे. 'सध्यांच्या समाजव्यवस्थेंत एका वर्गाचे हितसंबंध दुसऱ्या वर्गाशीं असे कांहीं निगडित झाले आहेत, कीं एकाला जें अमृत तें दुसऱ्याला विष होय' असें त्यांचें या विषयाचें तत्त्वज्ञान थोडक्यांत सांगतां येईल. आपलें अस्तित्व राखण्यासाठीं सत्ताधारी वर्ग सत्ताधीन वर्गास पिळून काढतो, अशा

स्थितींत 'सत्ताधारी वर्गाकडून पोसल्या जाणाऱ्या तत्त्वज्ञान्यांनीं आणि नीतिशास्त्रज्ञांनीं तरी दलितवर्गानें जें केलें असतां चोरी, गुन्हेगारी किंवा बंड असें म्हणावयाचें, तेंच सत्ताधारी वर्गानें केल्यास त्याला समाजधारणा, राष्ट्रसेवा किंवा मुत्सद्देगिरी अशीं गोंडस नांवें कां देऊं नयेत?' (पि. पा., पा. १०२).

सामाजिक विषमतेची प्रो. काणेकरांना मनापासून चीड आहे. ही विषमता हें एक दुःख आहे. "मानवी दुःखाचेहि प्रकार आहेत. आधुनिक जगापुढें 'आ' वासून राहिलेला बेकारीचा प्रश्न घ्या. धडधाकट शरीराचे किती तरी तरुण बेकारीला कंटाळून जगांत जिकडेतिकडे आत्महत्या करून घेत आहेत. अगणित निरपराध कुटुंबें अन्नान्नदशा होऊन कुत्र्याच्या मोलानें आयुष्य कंठीत आहेत. या निराश जीवांच्या करुण कथा कांहीं कमी दुःखान्त नाहींत. पण हें दुःख आज आहे उद्यां नाहीं. आजच्या समाजरचनेमुळें उत्पन्न झालेलें हें दुःख मानवी बुद्धि आणि प्रयत्न आज नाहीं उद्यां समूळ नाहींसें करतील आणि भविष्यकाळच्या साम्यवादी समाजव्यवस्थेंत या दुःखाचा मागमूसहि उरणार नाहीं" (शि. मो., पा. ३९).

आणखी एका विशेष दुःखाचा प्रो. काणेकर गंभीरतेनें विचार करतांना दिसतात. ते म्हणतात, 'जगांत दुसऱ्या प्रकारचें दुःख आहे आणि जनन-मरणाच्या फेऱ्यांत चिरकाल सांपडलेल्या मानवजातीचें हें दुःख मात्र मानवी प्रयत्नांच्या पलीकडचें आहे. काळपुरुषांशीं चाललेला मानवाचा झगडाच घ्या ना. कुणा मानवानें त्यांत विजय मिळविला आहे?' अशी विचारणा करून ते अनादि काळापासून न उलगडलेल्या जन्ममरणाच्या रहस्याकडे वाचकाचें लक्ष वेधतात.

काळपुरुष काय किंवा परमेश्वर काय, त्याचा माणसानें शतकानुशतकें विचार चालविला आहे. धर्माची उत्पत्ति या विचाराच्याच पोटीं झाली. प्रो. काणेकर धर्माविषयीं म्हणतात, 'मला स्वतःला धर्म म्हणजे काय तें विशेषसें कळत नाहीं. धर्माचा उपयोग अफूच्या गोळीसारखा केला जातो खरा' (पि. पा., पा. ११४). सर्व विश्व चालविणाऱ्या शक्तीचें अस्तित्व मानणाऱ्या वा नाकारणाऱ्या माणसांचाहि त्यांनीं विचार केला आहे—'ईश्वरवाद्यांत व निरीश्वरवाद्यांत खरा फरक माझ्या मतें इतकाच, कीं ही शक्ति सर्वज्ञ आहे, या शक्तीला बरें वाईट सर्व कांहीं कळतें, असें ईश्वरवाद्याला वाटतें आणि एकदां गति मिळालेली—कुणाकडून, कशी आणि कधीं कुणाला ठाऊक!—

अशी ही एक गतिमान्, बरें वाईट कांहीं एक न जाणणारी आंधळी शक्ति आहे, असें विचारवंत निरीश्वरवाद्याला वाटतें.' ईश्वर व निरीश्वर यांविषयीं त्यांचे विचार असे स्पष्ट आहेत. ते जगच्चालक शक्तीबद्दल अखेरीस म्हणतात, 'तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञ जे काय तात्त्विक झगडे लढावयाचे असतील ते आपापसांत लढोत, माझ्यासारख्या सामान्य माणसाला इतकें उघड उघड दिसतें, कीं ही शक्ति मानवी जीवनाला अपूर्णत्वांतून पूर्णत्वाकडे खास नेत आहे आणि त्याहूनहि अभिमानाची गोष्ट अशी, कीं पूर्णत्वाकडे चांचपडत चाललेल्या या अचाट पण आंधळ्या शक्तीला जाणून बुजून आणि डोळसपणें मदत करण्याचा अधिकार फक्त विवेकशील अशा मनुष्य-प्राण्यालाच आहे' (शि. मो., पा. ३४).

प्रो. काणेकर ईश्वराबद्दल इतके विचार सांगू शकतात, पण त्यांच्या गणूकाकांपुढें त्यांची मात्रा चालत नाहीं. ते त्यांच्या तावडींतून सुटण्यासाठीं अक्कलहुषारीनें पळवाट काढतात. 'तुझा ईश्वरावर विश्वास आहे काय ?' असें गणूकाका विचारतात तेव्हां 'ईश्वर आहे किंवा नाहीं' असें कांहींच उत्तर न देतां ते गणूकाकांना म्हणतात, 'ईश्वर म्हणजे काय, तें स्पष्ट सांगा बुवा आपणाला अगोदर; मग तो आहे किंवा नाहीं, मला काय वाटतें, तें मीं तुम्हांला सांगतों. नाहीं तर ईश्वर म्हणजे तुमची एक कल्पना असायची आणि माझी दुसरीच असायची आणि मीं आहे म्हणायचं आणि तुम्हांला वाटायचं तुम्हांला वाटतं तसाच आहे. असल्या गैरसमजुतीनें उगाच वाद मिटायला नको. वादाचा विषय नक्की झाला, मग आपलं सरळ होय किंवा नाहीं म्हणतां येईल' (शि. मो., पा. २३).

गणूकाका हें प्रो. काणेकरांनीं निर्मिलेलें जिवंत स्वभावचित्र आहे. देवाबद्दलच नव्हे तर हरएक प्रश्नांबाबतचें तत्त्वज्ञान उलगडून सांगण्यासाठीं प्रो. काणेकर गणूकाकांशीं मोठ्या आपुलकीनें संलाप करतात व गणूकाकांनीं खुलवून, रिझवून किंवा चिडवून लघुनिबंधकाराला साजेसें तत्त्वप्रतिपादनाचें विशद कार्य ते कुशलतेनें करतात. गणूकाका निबंधांत नसले तर माझ्यासारख्या वाचकाला चुकल्या चुकल्यासारखें होतें. स्वतः प्रो. काणेकरांनाहि गणूकाकांच्या संगतींत जो खेळकरपणा, मानवी स्वभावाची उकल करण्याचें कौशल्य व प्रतिपाद्य तत्त्वाच्या विरुद्ध असलेल्या विचारांचें खंडन हीं जितक्या सहज रीतीनें व उत्कर्षानें साधतात, तितक्या सुलभतेनें व चांगल्या प्रकारें तीं

गणूकाका हजर नसतांना त्यांना जमत नाहींत. कदाचित् गणूकाकांबद्दल वाटणाऱ्या आपुलकीमुळें मला असें वाटत असेलहि.

प्रो. काणेकरांचे गणूकाका हे एक किंचित् सनातनी, परंपरागत विचारांचे, चांगल्या मनाचे, धार्मिक, एकंदरींत सरळ वृत्तीचे पण थोडे तऱ्हेवाईक असे उतार वयाचे गृहस्थ आहेत. त्यांचा समंजसपणा, वेष व तऱ्हेवाईकपणा यांवरून मीं त्यांचें वय अजमावलें आहे (गणूकाका रुमाल बांधतात व चाळिशी लावतात).

गणूकाकांचा एक महत्त्वाचा स्वभावविषेश आहे, त्याचाच प्रो. काणेकरांनीं आपल्या निबंधांत उत्तम उपयोग करून घेतला आहे. 'गणूकाका थोर मनाचे आहेत आणि केवळ वितंडवाद करीत बसण्याची जन्मजात खोड असल्यामुळें ते माझ्याशीं वाद घालतात' असें प्रो. काणेकर म्हणतात (तु. ता., पा. ५४). वितंडवाद घालणाऱ्या गणूकाकांच्या स्वभावाचा 'तत्त्वनिष्ठा आणि तमासगीर' (तु. ता.), 'कानांत आणि मनांत' (तु. ता.), 'जगाशीं संबंध' (शिं. मो.), 'प्रत्येकाचें वेड' (शिं. मो.), 'सद्गुणी माणसें' (शिं. मो.), 'जीवनशक्ति' (शिं. मो.), 'समतेची आवड' (शिं. मो.), 'पुरुषांचा स्वभाव' (शिं. मो.), 'काळेपणा, गोरेपणा आणि सौंदर्य' (पि. पा.) वगैरे निबंधांत प्रो. काणेकरांनीं चांगला उपयोग करून प्रतिपाद्य तत्त्वें विशद केलीं आहेत.

गणूकाकांना स्वतःचीं मतें आहेत, त्यांचे कांहीं (?) सिद्धान्त आहेत. आणखी आपल्या पुतण्याचे, प्रो. काणेकरांचे, निबंध वाचून पाहण्याची (अर्थात् ते छापून येण्यापूर्वी) त्यांना संवय आहे. त्यामुळें झालें काय तर काकांच्या व पुतण्यांच्या मताचा वारंवार खटका उडाला आहे.

'क्रिया आणि प्रतिक्रिया' यांवरील भाष्य वाचून काकांनीं प्रो. काणेकरांना सरळ सांगून टाकलें, 'तुझ्या क्रियाप्रतिक्रिया घाल चुलींत, आपणाला वाटेल तेव्हां वाटेल तें करावें !' पुष्कळदां प्रो. काणेकर भीडभाड न ठेवतां गणूकाकांचीं मतें साफ खोडून काढतात, तेव्हां काकांचा अवतार पाहण्यासारखा असतो. धर्मानें एका संत्रस्त जिवाला कसें समाधान मिळालें याविषयीं बोलणें निघालें तेव्हां 'विड्या, अफू आणि धर्म यांत धर्म सर्वांत अधिक प्रभावी ठरला' असें पुतण्याचें उत्तर ऐकून गणूकाका गरम झाले. 'काकांनीं रागानें नाकावरचा चष्मा कपाळावर चढविला' व ते तडक निघून गेल्याचें प्रो. काणेकरांनीं

सांगितलें आहे (पि. पा., पा. ११३). काकांचा वर्ण काळा असल्यामुळें ते गोऱ्या माणसांपेक्षां काळीं माणसें कां अधिक चांगलीं याबद्दल वितंडवाद घालतील व पुतण्यानें आपल्या मताचा जोर दाखविला, कीं 'मूर्ख आहेस तूं! माझे सिद्धान्त तुला काय कळणार!' अशा अर्थाच्या दृष्टीनें चष्म्यांतून त्याच्याकडे पाहतील (पि. पा., पा. १२८).

पुरोगामी विचार, नवमतवाद, मानवजात वगैरे गोष्टी म्हणजे व्यर्थ बडबड अशी गणूकाकांची प्रामाणिक समजूत आहे. अशा गोष्टींचें बोलणें पुतण्यानें काढलें, कीं गणूकाका त्याला जिरवितात–तसें करण्याचा प्रयत्न करतात. 'मानव जातीच्या हिताकरितां सध्यांची विषम समाज-पद्धति आमूलाग्र बदललीच पाहिजे' असें पुतण्यानें म्हणतांच, 'काय रे, ही तुझी मानवजात कुठें असते रे?' काका शांतपणें धोतराच्या सोग्यानें चष्म्याचीं भिंगें पुशीत त्याला विचारतात, 'आपण कांहीं पाहिली नाहीं कुठें? ब्राह्मणजात, परभूजात, साळीजात, माळीजात आपणाला माहीत आहे. पण ही कांहीं नवीनच जात दिसते आहे!' स्वराज्याच्या चळवळीबद्दलहि काकांचें मत असेंच आहे. 'बाबांनो, कसल्या चळवळी करतां? इकडे चळवळी करून होणार काय? तिकडे विलायतेला जाऊन स्वराज्य आणा.'

गणूकाका थोडे तऱ्हेवाईक आहेत. पुतण्यानें त्यांच्या घरचा त्यांचा एक टॉवेल चुकून आणला होता तें कळल्यामुळें एक दिवस काका पुतण्याकडे आले नि जातांना, दांडीवरचे एकदोन टॉवेल्स नि सदरे गुंडाळून कांखेंत मारून तडक चालायला लागले! त्यांना पुतण्यानें हटकलेंच. तेव्हां काका म्हणाले, 'पळवतों काय? तूं चोरी करून नेतोस त्यापेक्षां मी तुझ्या डोळ्यां-समोर नेतोंय तें कांहीं वाईट नाहीं. माझ्या वस्तूबरोबर तुझ्याहि एकदोन नेल्याशिवाय तूं वठणीवर यायचा नाहींस?' आणि अशा रीतीनें त्यांनीं पुतण्याची चूक त्याच्या नजरेस आणली!

गणूकाका तऱ्हेवाईक असले तरी मनानें वाईट नाहींत. प्रो. काणेकरांनीं त्यांच्या सत्प्रवृत्त दयाळु मनाचा एक उत्कृष्ट प्रसंग दिला आहे. काकांकडून पैसे उसने घेऊन ते परत न करणाऱ्या मित्रावर ते एकदां खूप रागावले नि 'आतां येऊं द्या त्याला पैशाशिवाय, मग पहिल्यांदा मुळीं दोन कानशिलांतच वाजवितों. मग पुढच्या गोष्टी!' अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली. अन् तेवढ्यांत तो मित्र आला, त्यानें आपल्या बायकोच्या भयंकर आजाराचें रडगाणें

काकांपुढें गाऊन दाखविलें नि काकांनीं ‘ अरे, वैतागतोस काय ? कांहीं तरी उपाय केलाच पाहिजे, वेड्या ! ’ असें म्हटलें व त्यानें पांच रुपयांची निकड असल्याचें सांगतांच तितकी रक्कम पुतण्याकडून उसनी घेऊन ती त्याला ताबडतोब देऊन टाकली. पुतण्यानें काकांना त्याबद्दल जाब विचारला तेव्हां ते म्हणाले,

‘ अरे बाबा, वेळ वखत बघून रागावलं पाहिजे, दारावर आलेल्या माणसाला काय मारून घालवून देतात ? ’

काकांना माणसांची आवड आहे. ते एकलकोंडेपणाचे शत्रु आहेत. त्यांना ‘ माणसांचा गजबजाट हवा आंवतीं भोंवतीं. ’ ( शिं. मो., पा. ८ ).

गणूकाकांना लेखन करावें अशी लहर येते केव्हां केव्हां. ‘ मला सुद्धां लेख लिहून ते छापवून घेतले पाहिजेत. तुझ्या ओळखीचे बरेचसे मासिकवाले आहेत ना रे ? ’ ते पुतण्याला म्हणतात, ‘ मग माझे लेख छापवून काढ. ’ आणि काकांचे विषय काय, तर ‘ देवाचं भजन केल्यापासून फायदे, पैसा कसा राखावा, हें सर्व जग म्हणजे माया आहे, वगैरे वगैरे. ’ पुतण्याचे निबंध ( तुटलेले तारे ) वाचून त्याला एकदां म्हणाले, ‘ अलीकडे तूं फारच शहाणपणा दाखवूं लागला आहेत ! कांहीं तरी एखादी क्षुल्लक गोष्ट घ्यायची किंवा मीं चुकून बोललेला एखादा शब्द धरायचा आणि त्यांतून मोठं कांहीं तरी तत्त्वज्ञानाचं अवडंबर काढायचं ! तूं तोडलेले अकलेचे तारे कित्येक दिवस वाचतोंय मी...... ’ इतकें बोलून त्यांनीं पुतण्याचीं इकडचीं तिकडचीं इंग्रजीं पुस्तकें वाचण्याची, जाडजूड शब्दांचा भडिमार करून ‘ आम्हां लोकांना ’ चकित करण्याची सडकून हजेरी घेतली ( तु. ता., पा. २८ ).

गणूकाकांच्या स्वभावाच्या छटा वर विस्तारानें दाखविल्या आहेत त्याला कारण आहे. गणूकाका म्हणजे जुन्या मतांच्या, सुस्वभावी पण परंपरागत विचारांना न सोडणाऱ्या माणसांचे प्रतिनिधि. नवें जग, नवे विचार, नवीं मतें, नवें वाङ्मय पाहतांना त्यांची दृष्टि मंद होते. प्रो. काणेकरांनीं गणूकाकांच्या स्वभावचित्रणानें त्यांच्या (म्हणजे काकांच्या) जातीच्या माणसांवर प्रच्छन्न टीका केली आहे. गणूकाकांच्या योगें त्यांनीं आपल्या निबंधांत जसा जिवंतपणा तसा उपहासाचा बोचकपणा व मनाचा गोडवा निर्माण केला आहे.

प्रो. काणेकरांच्या निबंधांत मधून मधून विनोदाचीं व उपहासाचीं स्थळें व तीं निर्मिणारे प्रसंग, चुटके, कथा वगैरे आढळतात. पण त्यांनीं साधलेला

विनोद प्रायः उपहासपार आहे. क्वचित् गदगदां हंसविणारे ' चुटके ' त्यांनीं ग्रथित केले आहेत.

एक सुवर्णमध्यवादी आपल्या यजमानाकडे कांहीं मागण्यासाठीं गेला पण हात हालवीत परत आला. त्याबद्दल प्रो. काणेकर म्हणतात,

" त्यानें...समाधान करून घेतलें–' कांहीं मिळेल अशी आशा वाटत होती, ती व्यर्थ झाल्यामुळें दुःख झालें; पण यजमान कमरेवर लाथ मारून घालवून देईल अशी मला सारखी भीति वाटत होती ती निराधार ठरल्यामुळें आनंद झाला ! ' "

या निराशेच्या तत्त्वज्ञानानें किंचित् हसूं येतें तें त्या माणसाच्या स्वभाव-विशेषाबद्दल.

आतां पुढील संवाद पहा—

' काय रे, तुला चांगलाच एकान्त मिळाल्यामुळं या चार सहा महिन्यांत तूं खूप गूढ कविता लिहिल्या असशील ? ' मीं सहज विचारलें.

' एकहि गूढ कविता मीं लिहिली नाहीं. ' तो म्हणाला.

' म्हणजे ? '

' अरे म्हणजे काय ? त्या ओसाड गांवांत व्हिस्कीचा पेग् कुठचा मिळणार मला ? ' तो हसत म्हणाला.

' अस्सं ! ' मी उद्गारलों.

प्रो. काणेकरांनीं केलेला हा गूढगुंजन करणाऱ्या कवींच्या गूढ कवितांचा उपहास मनोज्ञ आहे. श्री. वामन नारायण देशपांडे यांचे असल्या कवितां-विषयींचे उद्गार सार्थ वाटतात. ते म्हणतात, ' प्रत्यक्ष आत्मानुभूति नसणाऱ्या कवीनें केवळ पुस्तकी ज्ञानावरून चांगल्या चांगल्या विद्वान् रसिकांनाहि बुद्धीनें व कल्पनेनेंहि जाणतां न येणाऱ्या अशा आध्यात्मिक भावना, विचार व अनुभव आपल्या कवितेंत केव्हांहि दडपूं नयेत !' (विचारसमीक्षा, पान ७६).

आंतल्या आवाजावर टीका करतांना प्रो. काणेकर म्हणतात, ' मला लहानपणीं माझा आंतला आवाज सांगत असे, कीं घरांतील सर्व मंडळी बाहेर गेली म्हणजे खुर्चीवर चढून फळीवरचा डबा काढ आणि आंतला लाडू गुपचूप खाऊन टाक ! '

हे उद्गार किंवा ' अज्ञानाचा आनंद ' या निबंधांतील हिप्पॉपॅटेमस शब्दाचा अर्थ कळल्यावर रागावलेल्या मित्राचें वर्तन हीं निव्वळ विनोदी

स्थळें आहेत. प्रो. काणेकरांचा विनोद क्वचित् फार विदारक आहे. मजुराला ताडी पितांना पाहून दारूच्या दुकानावर निरोधन करणाऱ्या देशभक्तिणीनें सांगितलें,

'ताडी पिना हराम है, बाबा.'

'आहे खरं हराम. बाईसाहेब.' तो मजूर म्हणाला, 'पण मला जर कोणी रोज सकाळीं अच्छेर दूध प्यायला देईल तर नाहीं पिणार ताडी.'

हें उत्तर ऐकून सकाळीं पोटभर नास्ता करून मद्यपान चळवळ करणारी ती देशभक्तीण निरुत्तर होऊन गेली असें प्रो. काणेकर म्हणतात.

त्यांच्या उपरोधिक लिखाणाचे कांहीं नमुने देतों —

१. 'घोड्याच्या गाडींतून जातांना काका नेहमीं गाडीच्या मोठ्या थोरल्या मागच्या जागेवर बसतात आणि पुढच्या म्हणजे गाडीवाल्याच्या बैठकीखालच्या छोट्या जागेवर काकूंना बसवतात. त्याचप्रमाणें कुठें बाहेरगांवीं जावयाचें असल्यास बोरीबंदर स्टेशनवर गाडींतून उतरल्यावर आम्ही हल्लींचे पुरुष स्वतः गाठोडीं उचलतों, किंवा हमाल करतों, त्याप्रमानें न करतां पुरुषांइतकाच गाठोडीं उचलण्याचा हक्क स्त्रीजातीला देण्याकरितां गाठोडीं वगैरे दरवाजापासून प्लॅटफॉर्मपर्यंत ते काकूंनाच न्यावयास लावतात. बाकी आम्ही नवे लोक या बाबतींत ढिले खरे! तत्त्वनिष्ठा आणि अर्थप्राप्ती यांचा सुंदर मिलाफ करणें शिकावयाचें असल्यास हे जुने लोकच आदर्श होत! स्त्रियांना समान हक्क देऊनच्या देऊन त्यावर आणखी हमालाला द्यावयाच्या एका आण्याची ते बचत करतात' (शिं. मो., पा. ४५).

२. 'पण मी म्हणतों मूर्खपणाचीं विधानें करण्यांत तरी स्त्रियांनीं पुरुषांना कां हार जावं?'( पि. पा., पा. १३२ ).

३. 'मानवी मनाचें काय हें औदार्य! स्वतःखेरीज इतर सर्व चांगले असावेत असें प्रत्येक माणसाला वाटतें!' ( तु. ता., पा. ८९ ).

जेथें उपहास वा उपरोध यांची तीक्ष्ण धार उपयोगीं न पडण्याचा संभव दिसला तिथें प्रो. काणेकरांनीं प्रत्यक्ष प्रहार केला आहे. उदाहरणार्थ, 'समतेची आवड' ( शिं. मो., पा. ३६ ) या निबंधांत त्यांनीं 'वृत्तपत्रसृष्टींत धोंघावणाऱ्या टोपणनांवी वाङ्मय-चिलटां'चा घेतलेला समाचार.

आतां प्रो. काणेकरांच्या जीवितविषयक तत्त्वज्ञानाचा विचार करूं. जीविताकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन एकंदरींत समंजसपणाचा आहे.

खरें बोलून दुसऱ्याचें मन दुखविण्यापेक्षां खोटें बोलून त्याला सुखविणें व्यवहार-दृष्ट्या चांगलें ठरतें. ते म्हणतात, 'खरें काय किंवा खोटें काय, त्याची खरी योग्यता जीवनाच्या कसोटीवरच ठरावयाची. आधींच बिचाऱ्या मनुष्य-प्राण्याचें मन करपून पोळून टाकणारे योग आणि घटना संसारांत किती तरी येतात, त्यांत एखाद्या खोट्या शब्दानें एखाद्याचें थोडें समाधान होत असेल, आणि नुकसान मात्र कोणाचेंच होत नसेल तर निर्भेळ सत्याचा बेधडक बळी द्यायला कांहींच हरकत नाहीं' (पि. पा., पा. ७). फार काय, पण 'सत्याकरितां सत्य, किंवा कलेकरितां कला, हीं केवळ निरान्त मूर्खपणाचीं उदात्त अभिधानें होत' असें ते जोरानें प्रतिपादन करतात. त्याचप्रमाणें 'आंतल्या आवाजांच्या आणि अंतःकरणप्रवृत्तीच्या...गोष्टी म्हणजे सडक्या आत्मनिष्ठतेचा आणि आचरट अहंतेचा गगनचुंबी कळस होय! मग स्वार्थत्यागाच्या देखाव्याचा किंवा जगत्कल्याणी संतपणाचा कितीहि मुलामा दिलेला असो!' (पि. पा., पा. ३६). आणि 'बुवा आणि बुवा' या निबंधांत त्यांनीं अनेक प्रकारच्या बुवाबाजीवर विदारक टीकेचा प्रहार केला आहे. सदा-सर्वकाळ स्वतःच्या दुःखाचें प्रदर्शन मांडणाऱ्या व 'सदासुतकी' लोकांवर प्रो. काणेकरांचा तीव्र कटाक्ष आहे. माणसांबद्दल मतें बनवितांना सावधगिरी बाळगावी असें त्यांचें मत आहे. 'अमुक मनुष्य रागीट आहे, अमुक मनुष्य शांत आहे, तमका सरळ मनाचा आहे, अशीं ठाम मतें आपण जेव्हां निरनिराळ्या माणसांविषयीं बनवीत असतों' तेव्हां आपली स्थिति हत्ती पाहणाऱ्या आंधळ्यासारखी असते, असें त्यांना वाटतें. ते या बाबतींत पृच्छा करतात, 'भिन्न भिन्न स्वभावाचे चित्रविचित्र मुखवटे घालून निरनिराळीं माणसें फिरतात, पण त्या मुखवट्यांच्या आंत दडलेल्या खऱ्या मनुष्य-स्वभावाचा थांग कधीं कुणाला लागला आहे?' माणसाच्या पारखेप्रमाणें माणुसकीविषयीं त्यांचे विचार मननीय आहेत. ते म्हणतात, 'फार सद्गुणी होण्यांत अर्थ नाहीं. मला तर अति सद्गुणी माणसांची भीतिच वाटते. मी त्यांच्यापुढें भीतियुक्त आदरानें मान लववीन, पण अंतर्यामींच्या उमाळ्यानें त्यांच्याविषयीं मला प्रेम वाटणार नाहीं. खंबीरपणा आणि दुबळेपणा, सद्गुण आणि दुर्गुण यांचें काटेतोल मिश्रण म्हणजेच मला वाटतें माणुसकी!' (तु. ता., पा. ९).

विचार आणि शहाणपण हीं दुसऱ्यांना देतांना मनुष्य उदारपणा दाखवितो, तीं आचरतांना मात्र तो कंजुषाहून कंजूष होतो. विचाराबद्दल प्रो. काणेकर

म्हणतात, 'विचार न करतां कांहीं केल्यावर जर वाईट प्रसंग गुदरला तर निदान एवढें तरी समाधान मिळेल, कीं बोलून चालून अविचारानें केलेली गोष्ट, हुकली तर हुकली. मारे विचार करकरून एखादी गोष्ट करावयाची आणि एवढें करूनहि ती फिस्कटली, कीं कपाळावर हात मारून आकाशाकडे पहात बसायचें!' पण प्रो. काणेकरांना अविचारानें वागून खड्ड्यांत पडा असें सांगावयाचें नाहीं. शहाणपणा ज्याचा त्यानें शिकावयाचा हें खरें, पण ज्यांना प्रत्यक्ष अनुभव आला त्यांचेंहि ऐकलें पाहिजे. 'खड्ड्यांत पडूं नको, म्हणून दुसऱ्याला सांगण्याचा अधिकार खड्ड्यांत पडून जखमी झालेल्या माणसालाच जास्त आहे.' कारण ते पुढें म्हणतात, 'स्वतःच्या हातून अनेक चुका होत असतांना देखील तशा चुका करूं नका म्हणून जीव तोडून दुसऱ्यांना उपदेश करणाऱ्या माणसाचा मला तरी एकच उदात्त हेतु दिसतो. आपणांत पूर्णत्व नाहीं, पण निदान दुसऱ्यांत तरी तें असावें, असेंच प्रत्येकाला वाटतें. गांवचा आळशी वेळेवर कामें करण्याची महती दुसऱ्यांसमोर गातो, याचें इंगित हेंच' (शि. मो., पा. २९). पण 'माणूस दुसऱ्याच्या अनुभवानें मुळींच शहाणा होत नाहीं असा माझा अनुभव आहे,' आणि 'तुटलेल्या ताऱ्यां'त (पा. ५७) ते म्हणतात, 'पुढच्याला ठेंच लागली, तर तो पुढें जाणारा माणूस गाढव होता, तो नीट खालीं पाहून चालत नव्हता; मी शहाणा आहें, मी तशी चूक करणार नाहीं, या घमेंडींत मागला पुढें पाऊल टाकतो, आणि ठेंचाळून पडतो!'

येथपर्यंत वर सोदाहरण दाखविलेल्या विशेषांच्या योगें प्रो. काणेकरांचें व्यक्तित्व बऱ्याच प्रमाणांत स्पष्ट निर्दिष्ट केलें आहे. आतां बाळपण, ललितलेखन, कला नि 'श्लीलअश्लील' यांविषयींचीं त्यांचीं मतें व विचार थोडक्यांत पाहूं. 'बालकाचें एखादें कृत्य आपणाला आवडलें नाहीं तर त्या बालकावर दुष्ट अगर वाईट हेतूचा आरोप करणें' ही गोष्ट त्यांना अत्यंत तिरस्करणीय वाटते. तसेंच, उठतां बसतां मुलानें आपल्या हुकमतीखालीं असावें असें अप्रबुद्ध पालकांना वाटतें; त्यांच्या मतें 'या जुलमी मनोवृत्तीच्या बुडाशीं मालकी हक्काची भावनाच असावी. प्रत्येक क्षुल्लक गोष्टसुद्धां मुलानें आपणाला विचारून केली पाहिजे अशी सक्त ताकीद असल्यामुळें, स्वतंत्र विचार आणि कार्य करण्याची धमक या दोन गोष्टींना पारखीं झालेलीं त्यांचीं मुलें साहजिकच बावळट होतात' (पि. पा., पा. ५४).

ललितलेखनाचें वैशिष्ट्य व महत्त्व प्रो. काणेकरांनीं आपल्या निबंधांत प्रतिपादन केलें आहे. 'शाईनें लिहिणारे लेखक आणि रक्तानें लिहिणारे लेखक' या निबंधांत त्यांनीं मिल्टन कवींचे 'A good book is the precious life-blood of a master spirit.' हे उद्गार फार सुंदर रीतीनें विशद केले आहेत. त्यांच्या मतें 'धंदेवाईक लेखक व कलावंत लेखक यांतला फरक हाच, कीं एक आपलें लिखाण शाईनें लिहितो आणि दुसरा रक्तानें लिहितो.' ललितलेखनाचें महत्त्व व प्रभाव ते किती ओजस्वी शैलीनें वर्णितात तें पहा—

'ललित लेखकानें निर्माण केलेलीं आणि पुस्तकाच्या दोन पुठ्ठयांत धरून ठेवलेलीं रंगीत सुखस्वप्नें मानवी मनाला क्षणभर गुंगवून विरंगुळा देण्याइतकेंच कार्य करतात का? कल्पनेच्या कुंचल्यानें रंगविलेल्या आणि फक्त मनाच्या डोळ्यांना दिसणाऱ्या क्षणजीवि सामान्य सुखस्वप्नांत आणि ललित लेखकाच्या अंतःकरणांत स्फुरलेल्या आणि त्याच्या लेखणीनें चितारलेल्या चिरंतन सुखस्वप्नांत तुलनाच नाहीं. क्षणभंगुर सुखस्वप्नांचें गुंगवून टाकणारें तरल सौंदर्य ललित कृतींत असतेंच असतें, पण अगम्य मानवी जीवनाचा प्रतिभेच्या प्रकाशानें सुगम्य केलेला एक जिवंत खंड तिच्यांत असतो. ललित कृति म्हणजे मानवी जीवनांतला जिवंत धगधगीतपणा, पण त्यांतली अगम्यता नाहीं; आणि सुखस्वप्नांतलें तरल सौंदर्य, पण त्यांतली क्षणभंगुरता नाहीं! कागदाच्या कपट्यावर कायम ठसविलेलीं हीं सुखस्वप्नें आजच्याच मानवानें नव्हे, तर उद्यांच्या मानवानेंहि वाटेल तेव्हां मन मानेल तशीं अवलोकावीं आणि आपलें अपुरें मानवी जीवन पूर्णांशानें जगावें. उपयुक्तता हीच जर मानवी व्यवहारांत अंतिम कसोटी असेल तर ललित लेखकाला स्वतःची लाज वाटायला तर नकोच नको, पण अवनितलावर कुठेंहि ताठ मान करून चालावयाचा अधिकांत अधिक अधिकार त्यालाच आहे!' (शि. मो., पा. ४३)

कलेचें माहात्म्य प्रो. काणेकर मोजक्या अन्वर्थी शब्दांत पुढीलप्रमाणें सांगतात, 'ज्याप्रमाणें परिसानें लोखंडाला स्पर्श केला, कीं त्याचें सोनें होतें, त्याचप्रमाणें विषय क्षुद्र असो कीं महान् असो, श्लील असो अगर अश्लील असो, कलेनें त्याला स्पर्श केला, कीं सौंदर्याची निर्मिति झालीच पाहिजे.'

प्रो. काणेकरांच्या व्यक्तित्वाच्या विविध छटा येथवर निर्दिष्ट केल्या, आतां त्यांच्या स्वभावविशेषाचा व तदनुषंगिक मतप्रणालीचा विचार कर्तव्य आहे. ते समंजस आहेत, त्यांच्या जीवितविषयक तत्त्वज्ञानाचा जन्म समंजसपणाच्या पोटीं झालेला आहे. समुचितपणा हा त्यांच्या लेखनाचा विशेष त्यांच्या मनोवृत्तीचा द्योतक आहे. 'काय लिहावें यापेक्षां काय लिहूं नये, हें ज्याला समजतें तोच खरा लेखक' (पि. पा., पा. १३६) हे त्यांचे शब्द त्यांना पुरेपुर लागू पडतात आणि समंजसपणा व समुचितपणा यांमुळेंच त्यांचे निबंध संयमशील झाले आहेत.

समंजसपणामुळेंच मनुष्य तत्त्वासाठीं तिरमिरीनें एखादि गोष्ट करून गेला असतांहि, मागाहून पडतें घेतो. प्रो. काणेकर 'चित्रा'च्या मालकाच्या भांडवलशाहीचा धिक्कार करून 'आशे'नें बाहेर पडले, पण परिस्थितीनें त्यांजवर मात केली, ते पुन्हा 'चित्रा' कचेरींत लेखक म्हणून काम करूं लागले. (लोटवालाशेठनीं त्यांना आग्रहानें बोलावून नेल्याचें कळतें). त्याबद्दल त्यांना नांवें ठेवणाऱ्यांनीं त्यांचे पुढील उद्गार पारखून ध्यानांत घ्यावे—

'एखाद्या साम्यवाद्यानें विशिष्ट परिस्थितींत एखाद्या भांडवलवाल्याशीं तडजोड केली, कीं...रिकामटेकडे तमासगीर तो तत्त्वच्युत झाला म्हणून त्याच्या विरुद्ध एकच गिल्ला करतात. साहजिकच आहे. तडजोड न होतां तो साम्यवादी त्या भांडवलवाल्याकडून हकनाहक चिरडला गेला असता म्हणजे चार दिवस या तमासगिरांना मजा पाहतां आली असती! अर्थात् तडजोड न केल्यामुळें साम्यवादाचा फायदा होणार असता, किंवा भांडवलशाहीला धक्का बसणार असता तर ती तडजोड करणारावर तत्त्वच्युतीचा आरोप खात्रीनें करतां येईल. पण ज्या तडजोडीनें भांडवलवाल्याचा कांहीं एक फायदा न होतां तो साम्यवादी जिवंत राहून त्या भांडवलवाल्याचें अधिक नुकसान करूं शकतो, ती तडजोड तत्त्वनिष्ठेला मुळींच बाधक नाहीं. या तमासगिरांच्या टाळ्या मिळविण्याकरितां किंवा 'हुतात्मा' म्हणून स्वतःचे जयजयकार करून घेण्याकरितां साध्यावर तिलांजली देऊन शत्रूच्या जाळ्यांत चालत जाणारे खुळे तत्त्वनिष्ठ पुष्कळ असतात. खऱ्या तत्त्वनिष्ठ माणसानें या तमासगिरांना खुष करण्याच्या भानगडींत न पडतां साध्यावर नजर ठेवून आपल्या तत्त्वाचें पालन करावें हेंच बरें.' (तु. ता., पा. ५५)

अखेर प्रो. काणेकरांच्या निबंधांतील आल्हादक, उद्बोधक व भेदक अशीं कांहीं विचाररत्नें देऊन हा लेख पुरा करतों—

'सामान्यांतच असामान्य माणुसकी असते, असें मला वाटतें.'

'स्वतःच्या मोठेपणाची जाणीव असणें हा मुळीं मोठेपणाच नव्हे.'

'स्वतःला सुख पाहिजे असलें तरीसुद्धां दुसऱ्याला सुखी केलें पाहिजे, हेंच माझ्या मतें अंतिम सत्य.'

'स्वतःसाठीं जगलास तर मेलास; दुसऱ्यासाठीं जगलास तर जगलास.'

'थापा मारणें ही एक ललितकला आहे.'

'मौलिकता म्हणजे इतरांहून कांहीं निराळाच विचार करणें नव्हे, तर स्वतःचा विचार स्वतःच करणें.'

'बहुतेक तत्त्वनिष्ठ लोकांच्या तत्त्वांचा पाया त्यांच्या बँकेंत सांपडतो!'

—यशवंत, ऑगस्ट, १९४१

प्रो. अनंत काणेकर

# शाईनें लिहिणारे लेखक
## आणि
# रक्तानें लिहिणारे लेखक

लेखक म्हणून मला जर कधीं धन्यता वाटली असेल, तर ती काल. माझ्या एका मित्राच्या घरीं मी काल गेलों. तेव्हां त्याची बायको अगदीं रागारागानें मला सांगूं लागली,

"काय लिहितां हो तुम्ही हें भलतं भलतं ?"

"काय ?" मीं म्हटलें.

"तें व्यवस्थितपणाविषयीं तुम्हीं कांहीं तरी लिहिलंत."

"मग झालं काय, वहिनी ?" मी हसत हसत म्हणालों.

"झालं काय ? अहो, आमच्या बेबीनं तुमचा तो लेख वाचल्यापासून कमाल चालवली आहे. एक वस्तु जाग्यावर ठेवील तर शपथ! शाळेंतून आल्यावर पुस्तकं एकीकडे उडवील, तर कपडे दुसऱ्या कोंपऱ्यांत फेंकून देईल. असा नुसता धांगडधिंगा चालवला आहे तिनं आणि बोलायची सोय नाहीं. कारण कांहीं बोलायला गेलं, तर म्हणते, 'त्या लेखांत पहा काय छापलं आहे तें. उगाच खोटं कांहीं तरी लोक छापतात वाटतं ? व्यवस्थित राहण्यापासून कांहीं एक फायदा नाहीं!' सांगा, आतां हिच्यापुढें काय करायचं तें ?"

वहिनींचे ते शब्द ऐकून माझा आनंद गगनांत मावेनासा झाला. इतकी निष्ठावान् शिष्यीण मिळाल्यावर कुणाला आनंद होणार नाहीं ?

खरोखरच छापलेल्या शब्दांचा महिमा कांहीं और आहे खरा! बेबीचीच गोष्ट कशाला, मोठीं वयातीत माणसेंसुद्धां कोणतीहि छापलेली गोष्ट प्रमाणभूत समजतात. आमच्या गणूकाकांच्या देवादिकांच्या कल्पना तर राजा रविवर्म्यांच्या चित्रांवरूनच ठरलेल्या आहेत. या बाबतींत तुम्ही त्यांच्याशीं कांहीं वादविवाद करायला जाल, तर ते तुमचं मुळींच ऐकणार नाहींत. उलट तुम्हांलाच मूर्ख

ठरवतील! मीं मात्र त्यांच्या या समजुतींचा एकदां पुरेपुर फायदा घेतला आहे. मीं जेव्हां पहिल्यांदाच मिशा काढल्या, तेव्हां ते माझ्यावर भयंकर रागावले.

"काय रे हें? पुरुषासारखे पुरुष तुम्ही आणि हे काय चाळे?"

"हं, काका, असं म्हणूं नका हं," मी म्हणालों, "तुमच्या देवांना मिशा आहेत का पाहा बरं. पाहा रविवर्म्याचं रामाचं नाहीं तर कृष्णाचं चित्र. त्यांना तुम्ही बायकी म्हणणार वाटतं?"

गणूकाकांना माझें म्हणणें पटलें कीं नाहीं कुणाला ठाऊक? पण त्या प्रश्नावर त्यांनीं मला पुन्हा डिवचलें नाहीं. राजा रविवर्म्यानें माझी बाजू बेमालूम बचावली!

मी जेव्हां बेबीची गोष्ट गणूकाकांना सांगून छापील शब्दांची महती गाऊं लागलों, तेव्हां ते अगदीं कमालीचे अस्वस्थ झाले.

"तें कांहीं नाहीं," ते म्हणाले, "मला सुद्धां आतां लेख लिहून ते छापवून घेतले पाहिजेत. तुझ्या ओळखीचे बरेचसे मासिकवाले आहेत ना रे? मग माझे लेख छापवून काढ."

"पण तुम्ही लिहिणार कशावर, काका?" मी म्हणालों.

"कशावर? शेंकडों विषयांवर. देवाचें भजन केल्यापासून फायदे, पैसा कसा राखावा, हें सर्व जग म्हणजे माया आहे, वगैरे वगैरे किती विषय आहेत."

काकांचे ते विषय ऐकून मला हसूं येत होतें, पण त्यांना राग येईल म्हणून मीं तें आवरून धरलें. पण काकांना तरी कां हसावयाचें? लेखक, लेखक म्हणून मिरविणारे बरेचसे लोक असलेच शिळे आणि कळकट विचार मोहक आणि मंजुळ भाषेंत घोळवून लोकांना चारण्यापलीकडे दुसरें काय करतात? आणि तुम्ही जर त्यांना म्हणाल, "काय हो, तुम्हांला स्वतःचं असं जर कांहींच सांगण्यासारखं नाहीं, तर तुम्ही लिहूं नका," तर मोठा गंभीर आव आणून ते तुम्हाला सांगतील, "आम्हांला प्रचंड गोष्टी सांगायच्या आहेत, पण लोकांना पटायला हव्यात ना त्या!"

हे शब्द उच्चारतांना आपण काय म्हणतों आहोंत याची त्यांना बहुधा कल्पनाच नसते. पण त्यांच्या त्या म्हणण्यांत सत्य मात्र कांठोकांठ असतें.

लोकांचे नेते आणि लोकांचे खुषमस्करे असे लेखकांचे जर दोन वर्ग केले, तर आपण या दुसऱ्या वर्गांतले आहोंत असाच कबुलीजबाब वरील विधानांत असतो.

बेबीची गोष्ट घेतली काय किंवा गणूकाकांची घेतली काय, छापील शब्दांवर एवढा विश्वास ठेवला जातो, याचा अर्थ इतकाच, कीं खऱ्या लेखकाकडून लोक नेतृत्वाची अपेक्षा करतात, खुषामतीची नव्हे. म्हणूनच आपल्या कलेशीं इमानानें वागणारा कोणताहि लेखक केवळ पुढ्यांत कागद आहे आणि जवळ शाई आहे म्हणून लेखणी उचलणार नाहीं. माझ्या एका आवडत्या ग्रंथकाराचे शब्द मला आठवतात. त्याचें एक लहानसें पुस्तक खूप लोकप्रिय झालें, आणि जो तो येऊन त्याचें अभिनंदन करूं लागला. अभिनंदनाच्या माऱ्यानें कंटाळून जाऊन तो स्वस्थ बसला असतां एक भक्त आंत शिरून त्याची स्तुति करूं लागला, "किती छानदार पुस्तक आहे तुमचं ! किती सुरेख लिहितां तुम्ही !"

"असं ?" तो डोकें वर करून शांतपणें म्हणाला, "माझीं पुस्तकं मी शाईनं लिहीत नाहीं. हृदयांतल्या रक्तानं मी माझा प्रत्येक शब्द लिहितों !"

खरंच धंदेवाईक लेखक आणि कलावंत लेखक यांतला फरक हाच, कीं एक आपलें लिखाण शाईनें लिहितो आणि दुसरा रक्तानें लिहितो.

—पिकलीं पानें

## प्रो. अनंत काणेकर

# शत्रु करण्याची कला

आमच्या गणूकाकांचे पुण्याला एक मित्र आहेत. त्यांचा कुणाशींहि कधींच मतभेद होत नाहीं; किंवा, खरें बोलायचें म्हणजे कुणाशीं मतभेद करण्याची त्यांची मुळीं इच्छाच नाहीं. परवां पुण्यांत स्टेशनच्या बाजूला घाईघाईनें जातांना मला ते दिसले. मीं त्यांना सहज म्हटलें, "काय अप्पा, मुंबईला चाललांत वाटतं?" त्यावर अगदीं गोड चेहरा करून ते म्हणाले, "हो, तसं म्हणायला कांहीं हरकत नाहीं. तसा आत्तां एका रेल्वेच्या अधिकाऱ्याला भेटायला चाललोंय्, पण दोनचार दिवसांनीं जाणार आहें मुंबईला मी!"

म्हणजे त्या वेळेला ते मुंबईला चालले नव्हते. पण माझ्याशीं मतभेद करूं नये या सोज्वळ हेतूनें ते पहिल्यांदा 'हो, हो' म्हणाले; आणि नंतर हळूच आपण मुंबईला जात नसून रेल्वे अधिकाऱ्याला भेटायला जात आहोंत ही खरी परिस्थिति त्यांनीं भीत भीत मला सांगितली. पण एवढ्याशा मतभेदानें सुद्धां माझें हळवें मन दुखावलें जाईल म्हणून त्यांनीं तीनचार दिवसांनीं आपण मुंबईला जाणार आहोंत असें खात्रीपूर्वक आश्वासन देऊन माझें सांत्वन केलें!

दुसऱ्याशीं सहमत होण्याची त्यांची ही विलक्षण तत्परता पाहून केव्हां केव्हां हसतां हसतां पोट दुखूं लागतें. एकदां बोलतां बोलतां गणूकाका रागानें त्यांना म्हणाले, "काय गाढव आहेस तूं, अप्पा!"

"हो, 'नाहीं' नाहीं म्हणत मी; पण इतक्या मोठ्यानं माझ्या अंगावर ओरडूं नकोस बुवा!" ते गोरामोरा चेहरा करून म्हणाले.

या गृहस्थांच्या अगदीं उलट माझ्या एका मित्राचा स्वभाव आहे. प्रत्येक गोष्टींत दुसऱ्याशीं मतभेद करणें हें एक त्याला पवित्र कर्तव्य वाटतें. कुणीं जर म्हटलें, कीं अमुक एक ठिकाण इथून पांच मिनिटांच्या रस्त्यावर आहे, तर तो तावडतोब त्या माणसाला सांगेल, "छे छे, चुकतां तुम्ही; तिथं जायला साडेपांच मिनिटं लागतात!"

कुणाला म्हणून सुख वाटूं द्यायचें नाहीं असा जणूं काय त्याचा निश्चयच आहे. शत्रु करण्याच्या कलेंत तो इतका तरबेज झाला आहे, कीं हा एक त्याचा आतां स्वभावधर्मच होऊन बसला आहे. दुसऱ्यांचीं मनें दुखविण्यांत आणि विनाकारण कुणाचीहि टोपी उडविण्यांत त्याला निरतिशय आनंद वाटतो. आपण दुसऱ्यांचीं मनें दुखवितों आणि जिकडे तिकडे शत्रु निर्माण करतों याची मात्र त्याला कल्पनासुद्धां होत नाहीं.

सर्वांच्या टोप्या उडवून वर आणखी आपल्याशीं लोक नीट वागत नाहींत, आपणाला शत्रु फार आहेत, आपणाला कुणी चांगला म्हणत नाहीं, याबद्दल तो कुरकूर करतो. मला त्याच्या या कुरकुरीचें आश्चर्य वाटतें. तसें त्याला मीं स्पष्ट सांगितलेंहि. मीं म्हटलें, “ इतरांनीं तुला चांगलं म्हणावं असं तुला वाटतं, दुसऱ्यांनीं चांगलं म्हटलं कीं तुला सुख होतं; मग इतरांनाहि तुझ्यासारखंच वाटत असेल याचा मात्र तूं चुकूनसुद्धां विचार कां करीत नाहींस ? इतरांकडून चांगला म्हणवून घेण्यांत तुला जर सुख वाटतं, तर तूंहि इतरांना चांगलं म्हटलं पाहिजेस. ” त्याला हें पटतें, पण त्याचा स्वभाव कांहीं जात नाहीं.

मी या गोष्टीचा विचार करूं लागलों, कीं अप्पांच्या वरवर हास्यास्पद दिसणाऱ्या वागणुकीचें मर्म मला थोडें थोडें कळूं लागतें. आपणाला कुणीं चांगलें म्हटलें नाहीं, किंवा आपणाविषयीं कुणीं वाईट मत प्रदर्शित केलें, कीं त्यांना अत्यंत दुःख होत असावें. तेव्हां आपण कुणाला वाईट म्हणायचें नाहीं म्हणजे लोक आपणाला दुःख देणार नाहींत, या आशेनें सर्वांशीं सहमत होण्याचा आणि दुसऱ्यांचीं मनें न दुखविण्याचा त्यांनीं निश्चय केला असावा.

अप्पा किंवा माझा तो मित्र हे माझ्या मतें दोन आत्यंतिक नमुने आहेत. मी या दोहोंमधला सुवर्णमध्य साधायचा प्रयत्न करतों. मला कुणीं चांगला म्हटलें, कीं बरें वाटतें आणि वाईट म्हटलें, कीं वाईट वाटतें, हें मीं माझ्या मनाशीं स्पष्ट केलें आहे. तेव्हां शक्य तों दुसऱ्यांना चांगलें म्हणायचें, सहसा कुणाला वाईट म्हणायचें नाहीं, आणि अशा तऱ्हेनें आपणाला वाईट म्हणून आपल्या आयुष्यांतले कांहीं क्षण दुःखीकष्टी करणारे शत्रु निर्माण करायचे नाहींत, असा माझा नियम आहे. कठोरपणें मतभेद व्यक्त केल्यामुळें एखाद्याचें चांगलें होणार असेल, किंवा कटु सत्य स्पष्टपणें न बोलल्यामुळें जगाचा मोठा

तोटा होणार असेल तरच एखाद्याचें मन दुखवावें असें मला वाटतें. इतकेंहि करून कुणी माझ्याशीं शत्रुत्व करूं लागला तर मात्र सर्व शक्ति एकवटून त्याच्याशीं झटापट करायला आणि शक्य तों त्याला चारी मुंड्या चीत करून विजयोत्साहाचा आनंद उपभोगायला मी मागें पुढें पाहणार नाहीं!

माझें हें तत्त्वज्ञान मी जेव्हां माझ्या मित्रांना सांगतों, तेव्हां त्यांच्यापैकीं कांहीं मला चिडविण्याकरितां म्हणतात, " किती थोर मन तुझं! पुढं मागं तूं महात्मा होणार! "

यावर माझें उत्तर ठरलेलें आहे " माझ्या या तत्त्वज्ञानांत थोरपणा किंवा मनाचा मोठेपणा कांहीं एक नाहीं, हें मी कबूल करतों. माझा हा अगदीं उघडा नागडा स्वार्थ आहे. मी म्हणतों, उगाच शत्रु निर्माण करून आपल्या आयुष्यांतले कांहीं क्षणतरी दुखीकष्टी कां करा? "

—तुटलेले तारे

# श्री. विष्णु सखाराम खांडेकर

**श्री.** विष्णु सखाराम खांडेकर यांनीं १९२७ पासून अगदीं परवांपर्यंत लिहिलेल्या लघुनिबंधांचीं चार † पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. 'वायुलहरी' (प्र. आ. १९३६, द्वि. आ. १९४०), 'चांदण्यांत' (१९३८), 'सायंकाळ' (१९३९) व 'अविनाश' (जून १९४१) या चार संग्रहांत एकंदर अठ्याहत्तर निबंध आहेत. फक्त पहिल्या व शेवटल्या संग्रहाला श्री. खांडेकरांनीं प्रस्तावना लिहिली आहे. 'वायुलहरी' (द्वि.आ.) ची प्रस्तावना तीन ओळींची असून तींत त्यांनीं तो 'गमतीनें लिहिलेल्या लघुलेखांचा' संग्रह असल्याचें सांगितलें आहे. 'अविनाश' हें त्यांचें वाङ्मयापत्य गोजिरवाणें व गुणी असून दृष्ट लागूं नये म्हणूनच कीं काय त्यांनीं त्याला 'तीट' लावली आहे.

ती 'तीट' म्हणजे 'अविनाश'ची आठ पृष्ठांची प्रस्तावना. तींत श्री. खांडेकरांनीं लघुनिबंध या वाङ्मयप्रकाराच्या तंत्रासंबंधीं आपले विचार मांडले आहेत. त्यांपैकीं दोन विचार मी येथें उद्धृत करतों—

(१) 'लघुनिबंधांतला काव्यविलास म्हणजे बागेंतली सहल नव्हे. शेतांतल्या पायवाटेनें जातांना मधून मधून जशीं रानफुलें दिसतात, तसें लघुनिबंधांतलें काव्य असायला हवें.'

(२) 'निबंधाप्रमाणें लघुनिबंधालाहि तात्त्विक बैठकीनें उठावदारपणा येतो. पण त्यांतलें तत्त्वप्रादिपादन हें तळ्यांत फुलणाऱ्या कमळासारखें मोहक वाटलें पाहिजे. रानांत उगवणाऱ्या झाडांप्रमाणें तें भासतां कामा नये.'

या विचारांतील तत्त्वनिकषांवर श्री. खांडेकरांच्या लघुनिबंधांची पारख मला करावयाची आहे. त्यांच्या निबंधाना काव्यविलास व तत्त्वप्रतिपादन यांची जोड मिळाली आहे. ज्या निबंधांत त्यांनीं या दोहोंचा संयमशील उपयोग केला आहे; ते उत्कृष्ट उतरले आहेत. पण काव्यविलासाचें रान माजल्यामुळें व प्रवचनवजा तत्त्वप्रतिपादनाचा वर्षाव केल्यामुळें कांहीं निबंध प्रतिपाद्य विषयाला पोषक नसलेल्या विषयान्तरानें डागळले आहेत. श्री. खांडेकरांनीं उपमेबद्दल काढलेल्या उद्गारांत केवळ एका शब्दाचा बदल

---

† आणखी 'मंदाकिनी' नांवाचा संग्रह मे, १९४२ त निघाला आहे.

करून असें म्हणतां येईल कीं, ‘ काव्य ही कांहीं देवता नव्हे. नुसती अप्सरा! तिच्या रूपाला भुलून मनुष्य मार्गभ्रष्ट होतो यांत शंका नाहीं.’ लघुनिबंध लिहितांना श्री. खांडेकर काव्यविलासांत रमून जातात, वाहत जातात, त्यांची कल्पना उच्छृंखल होते नि संयमाचीं बंधनें तोडून ती बिजलीप्रमाणें नाचूं लागते.

काव्यविलासाच्या अनिर्बंध आवडीमुळें श्री. खांडेकरांची भाषा ‘अलंकारिक’ झालेली आढळते. या भाषेवर झालेल्या टीकेला त्यांनीं ‘ अलंकारिक भाषा ’ ( वायुल., पा. ६२ ) या निबंधांत उत्तर दिलें आहे. श्री. खांडेकरांचें असें म्हणणें, कीं ‘ स्त्रिया आणि वाणी, जणूं कांहीं सख्या बहिणीच !...दोघींनीं वेषभूषा केली नाहीं तर त्यांच्याकडे ढुंकूनसुद्धां कुणी पाहणार नाहीं; पण त्यांचें नटणेंमुरडणें थोडेंसें अधिक होऊं द्या, झालाच लोकांचा गहजब सुरू. ’

अशी जाणीव असूनहि त्यांच्या हातून अतिरेक झाला. त्यांच्या अतिरिक्त काव्यविलासानें अलंकृत असलेल्या भाषेवर टीकाकारांचें म्हणणें काय आहे तें पाहणें आवश्यक आहे. टीकाकार म्हणतात,

“ अलंकारिक भाषा कृत्रिम असते. असली भाषा म्हणजे नुसती बुद्धीची कसरत आहे. ज्या देशांतील शेंकडा नव्वद लोकांना उपमा शब्दाचा अर्थसुद्धां कळणें शक्य नाहीं, त्यांच्यावर उपमांनीं भरलेल्या वाक्यांचा वर्षाव करणें म्हणजे अपचनानें आजारी असलेल्या मनुष्याला पक्वान्नांचा आग्रह करण्यासारखें आहे......

“ ती रसाचा गळा दाबते, स्वाभाविकपणाचा खून करते, बुद्धीला भटकेपणाची संवय लावते...

“ अलंकारिक भाषा हा कांचनमृग आहे. प्रतिभारूपी सीतेला या सोनेरी हरिणाचा मोह पडतो. विचाररूपी राम त्या हरिणाची शिकार करण्याकरितां आश्रम सोडून गेला कीं रावण सीताहरण करतो. ”

टीकाकारांचें हें म्हणणें श्री. खांडेकरांनीं सजवून मांडलें आहे. ‘ अलंकारिक भाषेची निंदा करतां करतां तिचा आश्रय करणाऱ्यां ’ चें आपणाला हसूं आल्याचें सांगून ते पृच्छा करतात,

‘ सीताहरण करणारा हा रावण कोण ? ’

—तो रावण म्हणजे अनियंत्रित विषयांतर !

श्री. खांडेकरांच्या निबंधांतील काव्याचें व तत्त्वज्ञानाचें विषयांतर हें सुरेख तलम पातळाला लावलेल्या–अंगच्या नसलेल्या–जरीकांठाप्रमाणें जाणवतें, कसेंसेंच वाटतें.

त्यांच्या विषयांतराच्या सर्व स्थळांचा उल्लेख करण्याची जरूरी नाहीं. केवळ प्रस्तुत मुद्द्याच्या विवरणासाठीं कांहीं स्थळें मी सांगतों.

लघुनिबंधाला सुरुवात करतांना श्री. खांडेकर बहुधा कवीची भूमिका स्वीकारतात व त्याचा शेवट करतांना ते तत्त्वज्ञानी, किंबहुना भूतदयेनें चलचित्त झालेला भिक्षु होतात आणि पुष्कळदां जिथें निबंध पूर्ण झाला असें वाटतें, तिथेंच त्यांच्या तत्त्वप्रतिपादनाला खरी सुरुवात होते! उदाहरणार्थ, 'एक तास' हा निबंध पहा, (सायंका., पा. ९). 'एक तासा'चा विषय वास्तविक पा. १३ वर संपतो, पण तेथून पुढें भिकारी, शेतकरी, राजा, कुंती वगैरेंचें आगमन होऊन चार पानें भरलीं आहेत. अशीं उदाहरणें अर्थात् पुष्कळ नाहींत. तत्त्वप्रतिपादनाची त्यांची पद्धत किती अतिरेकाला जाते त्याचें वरील उदाहरण हें उत्तम द्योतक आहे.

त्यांची लेखनाची सुरुवात प्रायः मोठी काव्यमय असते, पण सुरुवातीचें काव्य केव्हां केव्हां इतकें मोठें असतें, कीं चांगलीच सहल केल्यावर वाचकाला प्रतिपाद्य विषयाची भेट होते. 'शिव्या' (चांदण्यां., पा. ४५) या निबंधाचे पहिले तीन परिच्छेद–सव्वादोन पृष्ठें–या म्हणण्याचें उत्तम समर्थन करतात. 'वायुलहरीं'तील 'आरसा' हा निबंधहि या म्हणण्याला अपवाद नाहीं. 'सायंकालां'तील 'विरह' या निबंधांत विरहाचें वर्णन करतांना ते म्हणतात, 'शाकुंतलांतल्या चौथ्या अंकाला रमणीयता आली आहे तिचें कारण तरी दुसरें काय आहे?' आणि त्याच्यापुढील ओळीपासून सतरा-अठरा ओळींचें विषयांतर करतात. 'तात्पर्य' या तत्त्वसुंदर निबंधाला दुसऱ्या व तिसऱ्या परिच्छेदाचा डाग लागला आहे; ते दोन्ही परिच्छेद अनवश्यक आहेत.

पण श्री. खांडेकरांच्या विषयांतरांतील काव्य लोभनीय असतें. (मात्र तें प्रतिपाद्य विषयाला पोषक नसतें!) त्यांच्या विषयांतरामुळें कितीतरी कल्पनांचीं माणिकमोतीं व विचाररत्नें निर्माण झालीं आहेत. 'तात्पर्य' या निबंधांतील ज्या परिच्छेदावर वर आक्षेप घेतला आहे त्यांतील सुंदर काव्यच येथें उतरतों—

'म्हणे सूर्यास्त म्हणजे तीच तीच गोष्ट! विविध रंगांनीं नटलेल्या संध्याकालीन मेघांकडे पाहिलें, कीं वस्त्रहरणाच्या वेळीं द्रौपदीची लाज

राखण्याकरितां कृष्णानें पुरविलेली वस्त्रेंच एकत्र झाल्याचा भास होत नाहीं का ? राजेरजवाड्यांच्या घरीं हरतऱ्हेचे शालू असतील; पण मेघांप्रमाणें क्षणोक्षणीं रंग बदलण्याची शक्ति त्यांच्यांत कुठें असते ? या वस्त्रभांडाराशेजारींच सूर्याचा सुवर्णकलश समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगत असलेला दिसूं लागतो. जणूं कांहीं आकाशांत लवकरच चंद्ररजनीचा विवाह होणार असल्यामुळें त्याची इतकी तयारी चालली आहे.' ( वायुल., पा. १ ).

कल्पनाविलासांत रममाण होऊन श्री. खांडेकर दिखाऊ शब्दांचा खेळ खेळत नाहींत. त्यांच्या काव्यविलासांत कोमल व उदात्त भावनांचा जिवंतपणा दिसतो. निसर्गाचें वर्णन करतांना त्यांच्या शब्दांना हा जिवंतपणा लाभतो. उदाहरणार्थ पुढील काव्य पहा—

'पलीकडे माडाची सुंदर बाग सूर्याच्या किरणांत चमकत होती. न लागणाऱ्या माडाचीं चुडतें, खाऊकरितां लहान मुलांनीं पुढें केलेल्या हातांसारखीं दिसत होतीं उलट मोठ्या माडाचीं चुडतें बालकांना खाऊ देणाऱ्या माउलीच्या हाताप्रमाणें खालीं वाकलेलीं वाटत होतीं.' ( वायुल., पा. ४६ ).

त्यांच्या काव्यांत प्रभावी उदात्तताहि दिसून येते. चारी संग्रहांत याचीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील. एके ठिकाणीं ते लिहितात—

'हिमालयाच्या शुभ्र गगनचुंबी शिखरांपेक्षांहि महात्माजींनीं दीनांच्या परित्राणाकरितां पसरलेले पवित्र बाहु अधिकच भव्य नाहींत असें कोण म्हणेल ? दरींत उडी घेऊन खदखदां हासणाऱ्या धबधब्याचा देखावा अद्भुतरम्य आहे यांत शंका नाहीं. पण हसत हसत देशासाठीं मृत्यूच्या दरींत उडी घेणाऱ्या तरुणांची मूर्ति त्यापेक्षांहि अद्भुतरम्य भासत नाहीं काय ?' ( वायुल., पा. ४४ ).

कवि हा कल्पक असतो. श्री. खांडेकरांना 'शुक्राच्या चांदणीसारखी रमणीय कल्पकता' लाभली आहे. त्यांच्या निबंध-वाङ्मयांतल्या शेंकडों कल्पनांतील सहज हातीं लागलेलीं दोनतीन रत्नें रसिकांना सादर करतों—

'पांढऱ्या शुभ्र मोत्यांच्या राशींनीं भरलेल्या मेघांच्या नौका, आंतील मौल्यवान् माल कुणालाहि दिसूं नये म्हणून काळ्या पडद्यानें आच्छादित आकाशांतून जात आहेत, आपल्या हक्काचें हें ऐश्वर्य आपल्याला मिळणार नाहीं या भीतीनें पृथ्वीच्या तोंडचें पाणी पळालें आहे, इतक्यांत मूर्तिमंत न्यायदेवताच वाटणारी वीज एकदम प्रकट होते आणि त्या नौकांना भराभर भोकें पाडून पृथ्वीवर मोत्यांचा वर्षाव करते.' ( चांदण्यां., पा. २३ )

'लाटांवर हेलकावे खाणारी नौका हा आकाशाला न टांगलेला असा झोलाच नाहीं काय ?' (चांदण्यां., पा. ६८)

'विश्व निर्माण झालें तेव्हां सर्व वस्तूंना चंद्राचा अतिशय मत्सर वाटूं लागला. तेव्हां आपल्या लाडक्या बाळाला दृष्ट लागूं नये म्हणून सृष्टिमातेनें त्याची दृष्ट काढून तीट लावली आहे ही त्याला!' (चांदण्यां., पा. १४३)

श्री. खांडेकरांना 'निसर्ग म्हणजे तर नावीन्याचें निधान, भव्यतेचें भांडार, सौंदर्याचा सागर, रमणीयतेचा रसनिधि!' (चांदण्या., पा. १४१) 'कुठल्याहि वस्तूपेक्षां किंवा दृश्यापेक्षां पाहणाऱ्या मनुष्याच्या दृष्टींत काव्य असतें' असें श्री. खांडेकर म्हणतात तें त्यांच्या बाबतींतहि त्रिवार सत्य आहे.

त्यांच्या काव्यविलासावर 'रामशास्त्र्या'सारख्या उद्बोधक टीकाकारापासून 'मौजे'खातर त्यांच्यावर तुटून पडणाऱ्या पत्रकारांपर्यंत सर्व कलमबहाद्दरांनीं त्यांच्या अलंकारिक भाषेवर झोड उठविली. जगानें आपल्या काव्यदृष्टीचें असें स्वागत केलेलें पाहूनच कीं काय, 'या जगांत काव्याला हां हां म्हणतां व्यवहाराची दृष्ट लागते' अशी श्री. खांडेकर तक्रार करतात व एक उत्कृष्ट दृष्टान्त वाचकांच्या तोंडावर फेंकतात. (चांदण्यां., पा. १५२)

श्री. खांडेकरांच्या मतें मानवी जीवन ही एक सोन्याची खाण आहे. 'सोन्याच्या खाणींतले सुवर्णकण जसे मातींत मिसळलेले असतात, तसे संसारांतले काव्याचे क्षणहि व्यवहारांत गोंधळून गेलेले असतात. ते शोधून काढण्याची दगदग माणसें करीत नाहींत; आणि मग जग दुःखानें भरलें आहे, जीवन संकटांनीं व्यापलें आहे इत्यादि कटु सत्यांची खैरात तीं करूं लागतात.' (अवि., पा. १०६)

ते कवि असले तरी त्यांना वास्तव जगाचा विसर पडलेला नाहीं. 'आपलें जीवित हें मेघदूतासारखें कल्पनेच्या हिंदोळ्यावर बसून झोके घेणारें काव्य नव्हे' (वायुल., पा. १३०) हें ते कबूल करतात. त्यांना संसारांतील सुखाप्रमाणें दुःखाचीहि जाणीव आहे. 'जें दूर आहे, जें दुर्लभ आहे, काल्पनिक आहे,' त्याच्या प्राप्तीच्या इच्छेमुळें मनुष्य दुःखी होतो असें त्यांचें मत आहे. ते म्हणतात, 'सुखी होण्याकरितां मनुष्य सदान्‌कदा दुःखी होत असतो; लहानपणीं पाळण्यावर टांगलेल्या सुंदर चिमण्या सोडून तो चांदोबाचा हट्ट धरील, तरुणपणीं गृहाचें नंदनवन करणाऱ्या पत्नीकडे पाठ फिरवून तो वाऱ्यावरल्या एखाद्या अप्सरेच्या मागें धावेल आणि म्हातारपणीं जगाबरोबर

धावतां येत नाहीं म्हणून वाटेंतल्या दगडावर टांचा घाशीत चमेल...मागूं तीच गोष्ट आपल्याला मिळाली पाहिजे हा अहंकारच मनुष्याच्या सुखाचा सत्यानाश करतो ! त्याला जग हवें, पण तें स्वतःच्या सुखाकरितां ! जगाच्या सुखाचा ओझरता विचारहि त्याच्या मनाला कधा शिवत नाहीं.' (चांदण्या., पा. ११७ ).त्यांच्या मतें माणसानें अहंकाराचा त्याग केला पाहिजे. अहंकारामुळें माणूस बहिरंगाच्या सुखाला हपापलेला असता; त्यामुळें तो दुःखी होतो. 'जगांतल्या सर्व दुःखाचें मूळ अंतरंगापेक्षां बहिरंगाला महत्त्व देण्याच्या प्रवृत्तींत आहे.' (वायुल., पा. ९८ ).

जगांत खरा आनंद मिळविण्यासाठीं माणसानें निसर्गाकडे धाव घेतली पाहिजे, असें त्यांचें मत दिसतें. निदान ते स्वतः निसर्गाच्या सहवासांत व वर्णनांत आनंद पावलेले दिसतात. निसर्गाहून निराळें असें एक आनंदस्थान त्यांनीं वर्णिलें आहे. ते म्हणतात, 'निर्मितीच्या आनंदामुळेंच जगांत अगणित दुःखें असूनहि मनुष्य जीवनावर उत्कट प्रेम करतो! मग ती निर्मितीची शक्ति एखाद्या सुरकुतलेला रबराचा पोकळ तुकडा फुंकून त्यांतून रसरशीत बाळकाप्रमाणें दिसणारा भला मोठा फुगा उत्पन्न करो, लहानशा रोपट्याला खतपाणी घालून त्याच्यावर सुंदर फुलें फुलवो, दिलरुब्याच्या तारांतून भावना उचंबळून टाकणारे सूर काढो, आकाशांत भरारी मारणाऱ्या एखाद्या पांखरावर सुंदर काव्य करो, नऊ महिने पोटांत सांभाळून प्रसूतिवेदनांची पर्वा न करतां गोंडस बालकाला जन्म देवो अथवा अशा बालकाचें तेजस्वी युवकांत रूपांतर करो!' ( सायंका., पा. १११ ).

जगांतील सुखदुःखांच्या विषमतेप्रमाणें सामाजिक वैषम्याचीहि श्री. खांडेकरांना जाणीव आहे. त्यांच्या मतें, 'पुनर्जन्म म्हणजे जगांतल्या विषमतेच्या कारणांचा उलगडा करतांना भांबावून गेलेल्या मानवी मनानें उभारलेलें कल्पनामंदिर!' (चांदण्यां., पा. २० ) जगांत नांदणाऱ्या विषमतेचा विचार मात्र त्यांनीं कवीप्रमाणें केला आहे, शास्त्रवेत्त्याप्रमाणें केलेला नाहीं. जगांतील विषमता कशी निवारण करतां येईल याचें 'सुखस्वप्न' ते पुढीलप्रमाणें रंगवितात—

'ज्याच्या अंतरींचा दिवा मालविला गेला नाहीं अगर काजळीनें मंद झाला नाहीं त्याचेंच जीवन धन्य. दुर्दैवानें आपल्या अंतरींचा दिवा मालविला गेला असेल तर तो आपण दुसऱ्या दिव्यावर पुन्हा लावून घेतला पाहिजे.'

अशा रीतीनें प्रत्येकाच्या अंतःकरणांतला दीप प्रकाशूं लागला तर एकमेकांच्या उरावर बंदुका रोखणारीं राष्ट्रें गाढ आलिंगनांत निमग्न होतील. जातीजातींच्या संबंधांत रक्तपाताऐवजीं आनंदाश्रु दिसूं लागतील आणि लक्ष्मीपुत्रांच्या घरीं कोंडलेली लक्ष्मी गोरगरिबांच्या घरीं पायधूळ झाडील.' (वायुल., पा. ३५).¶

—परमेश्वर, माणुसकी, अंतरींचा दिवा वगैरेसारख्या गोष्टींवर विसंबून राहणाऱ्या कवीलाच हे उद्गार शोभतात! या तत्त्वज्ञानानें या देशांतील सामाजिक विषमतेचे बिकट प्रश्न सोडविणें सुतराम् अशक्य आहे.

स्त्रीपुरुषांच्या प्रेमाकडे पाहतांना मात्र श्री. खांडेकरांची दृष्टि काव्यमय असूनहि अधिक सत्यान्वेषण करते. तरुणतरुणींनीं एकमेकांच्या पसंतीनें केलेल्या लग्नाला ते प्रेमविवाह म्हणायला तयार नाहींत, 'आंब्याचा मोहोर म्हणजे कांहीं रसाळ आम्रफळ नव्हे.' (वायुल., पा. ९८). स्त्रीचें—सुंदर स्त्रीचें—पुरुषाला आकर्षण असतें हें त्यांना मान्य आहे. पण अलीकडे आमच्या समाजांत चाललेले प्रकार पाहून ते उपहासपूर्वक म्हणतात—

'बाळसें असलेल्या हसऱ्या मुलाप्रमाणें सुंदर स्त्रीकडेहि मनुष्याला पहावेंसें वाटणें साहजिक आहे, हें मी कबूल करतों; पण ज्यांच्याकडे पाहिलें असतां मनुष्य मोहून जाण्याऐवजीं मूर्च्छित पडण्याचाच संभव अधिक अशा वीसबावीस वर्षांच्या लठ्ठ किंवा हडकुळया बाहुल्या पाहून बायकोला विसरणारे अनेक प्रौढ विद्वान् लोक आहेत. त्यांचा प्रणय पाहिला, कीं ईश्वराची लीला अगाध आहे याविषयीं दुसरा पुरावा शोधण्याची जरूरी नाहीं अशी मनाची खात्री होते.' (सायंका. पा., १३७).

श्री. खांडेकरांनीं आपले कांहीं कटु अनुभव या निबंधांत गुंफिले आहेत. कांट्यानें कांटा काढावा, औपचारिकता पाळून कोणाचेंहि कल्याण होणार नाहीं, हातउसने दिलेले पैसे कधींहि परत यायचे नाहींत, सुख पाहिजे असेल तर असत्याचा आश्रय करणें भाग पडतें, दूधवाला कितीहि प्रामाणिक असला तरी पहिल्या दिवशींइतकें चांगलें दूध तो कधींहि देणार नाहीं, असे विविध अनुभवांचे बोल त्यांच्या निबंधांत पेरलेले दिसतात.

¶ याविषयीं जेम्स रसेल लोवेल यांचे उद्गार ताडून पाहावेत—

"As one lamp lights another, nor grows less,
So nobleness enkindles nobleness."

—संपादक

चारी संग्रहांत श्री. खांडेकरांचें प्रभावी व्यक्तित्व प्रतिबिंबित झालें आहे. कवि, टीकाकार, विद्वान्, शिक्षक व कुटुंबवत्सल सद्गृहस्थ अशीं त्यांच्या व्यक्तित्वाचीं पांच अंगें आहेत. यांपैकीं त्यांच्या कवीच्या भूमिकेचा विचार वर केला आहे.

त्यांनीं वाङ्मयाचा टीकाकार म्हणून मोठें नांव मिळविलें आहे. त्यांची टीकाकाराची मनोवृत्ति 'वायुलहरीं'त विपुल प्रमाणांत प्रकट झाली आहे. त्यांच्या टीकालेखांनीं लेखक व ग्रंथकार घायाळ झाले व काकदृष्टीचे टीकाकार म्हणून लोक त्यांच्याकडे बोट दाखवूं लागले. ते तेव्हांचे टीकाकार खांडेकर आतां उरलेले नाहींत.

आपल्या लघुनिबंधांत श्री. खांडेकरांनीं टीकाकाराची हजेरी घेतली आहे, ती पाहण्यासारखी आहे. कारण तसें करतांना ते स्वतःला विसरलेले नाहींत. ते म्हणतात—

'बिचारा ग्रंथकार मरमर मरून एखादें पुस्तक लिहितों; पण मेलेल्याला मारूं नये हा नियम माझ्यासारख्या टीकाकाराला कुठें ठाऊक असतो? पुस्तकावर लिहायला बसलें कीं झाली दोषवर्णनाला सुरुवात! वैद्यकीचें पुस्तक वाचून मनुष्याच्या शरीराच्या सौंदर्याची कल्पना एक वेळ येईल, पण कुठलीहि टीका वाचून ग्रंथांतील गुण कळतील ही आशाच करायला नको.' (वायुल., पा. ५५)

त्यांच्या मतें निस्पृह टीकाकार हा आरशाप्रमाणें असतो. (हा आरसा 'चर्चगेट' स्टेशनवरील विकृत रूप दाखविणाऱ्या दर्पणाप्रमाणें नसावा.) पण 'टीकाकारानें दाखविलेले दोष ग्रंथकाराला बहुधा पटतच नाहींत.' (वायुल., पा. ६१) श्री. खांडेकर म्हणतात, कीं कुत्सित टीकाकारापेक्षां अधिक त्रासदायक अशी एक गोष्ट आहे—'सुरवंट अंगावर पडला म्हणजे कुत्सित टीकाकारापेक्षांहि अधिक त्रास होतो खरा.'

श्री. खांडेकरांनीं 'तात्पर्यां'त वाङ्मयांतील बोधवादावर, 'उंबरांतील किडे' यांत कायम ठशाच्या लघुकथेवर, 'संकेत' व 'अशोकाचीं फुलें' यांत कविसंकेतांवर टीका केली आहे. यांशिवाय अनेक स्थळीं त्यांची टीकाशक्ति दिसून येते. 'शास्त्रीय सत्य' व 'काव्यदृष्टि' यांवरील त्यांचें लेखन म्हणजे लघुनिबंधाच्या साच्यांत बसविलेलें उत्कृष्ट तत्त्व-प्रतिपादन होय. या विषयांवर

ते लिहितात, ‘ शास्त्रीय दृष्टि हवी; पण तिनें काव्यदृष्टीची हकालपट्टी मात्र करूं नये, हा माझा अट्टाहास अनेकांना वेडेपणाचा वाटतो.’ (चांदण्या., पा. ७७)

श्री. खांडेकरांच्या लेखनावरून त्यांनीं वाचलेलीं पुस्तकें कळतात. आपण वाचलेल्या ग्रंथांचा लेखनांत उल्लेख करण्याची त्यांना संवय आहे. त्यांचें संस्कृत काव्याचें आणि मराठी व इंग्रजी वाङ्मयाचें अध्ययन किती सखोल व व्यापक आहे तें या लघुनिबंधांच्या वाचकास पहावयास मिळतें. ‘सायंकाल’तील ‘ माझे आवडते लेखक ’ या निबंधावरून त्यांच्या अभ्यासाची कल्पना येते. इसापनीति, ठकसेन राजपुत्राच्या गोष्टी, शनिमाहात्म्य, अलीबाबा आणि चाळीसचोर, हीं पुस्तकें त्यांना मोठेपणींहि आवडतात. देवल, हरिभाऊ आपटे, श्री. कृ. कोल्हटकर, केशवसुत, गडकरी, तांबे, वरेरकर, फडके, अत्रे व माडखोलकर हे त्यांचे आवडते लेखक आहेत. यांपैकीं कांहींच्या कवितांखेरीज श्री. खांडेकरांच्या निबंधाचें पान हालेनासें झालें आहे. इंग्रजी लेखकांपैकीं हार्डी, टर्जीनिव्ह, इब्सेन व गाल्सवर्दी, स्टीफन झ्वाइग हे त्यांचे आवडते लेखक होत. त्यांच्या लेखनांत राम, सीता वगैरे रामायणांतील व धर्म, कुंती वगैरे महाभारतांतील व्यक्ति केव्हां प्रकट होतील त्याचा नेम नाहीं. एकाएकीं अष्टावक्र किंवा गालव वाचकापुढें दत्त म्हणून उभा राहतो व त्याच्या ज्ञानाची परीक्षा घेतो! या व्यक्तींचा उपयोग श्री. खांडेकर करतात तो प्रायः उदात्त व पवित्र भावनांचा परिपोष करण्यासाठींच. आजच्या लेखकांत त्यांच्या इतकी पौराणिक, गतेतिहासांतील वा आजच्या आदर्श स्त्रीपुरुषांची जाणीव वाचकास करून देणारा दुसरा लोकप्रिय लेखक नाहीं.

ते रुचिपालट म्हणून गिब्रानकृत एखादी गोष्ट सांगून निबंध सरस करतात. मराठी व इंग्रजी कविता ते उद्धृत करतात. अलीकडच्या त्यांच्या निबंधांत पूर्वीच्या मानानें काव्यविलास कमी असतो, त्याचा वचपा आतां ते तांबेप्रभृतींच्या कवितांच्या उद्धरणानें काढीत आहेत, असें वाटल्याशिवाय राहत नाहीं.

श्री. खांडेकरांनीं एका सुंदर ग्रंथाचें अध्ययन केलें आहे; किंबहुना त्याचें पानन् पान त्यांनीं आपल्या लेखनांत उतरून काढलें आहे. तो ग्रंथ म्हणजे ‘ शिरोडें ’ गांव. त्यांचे लघुनिबंधहि त्या ग्रंथाचें ऋण लागतात.

श्री. खांडेकरांनीं आपली पत्नी व मुलें यांचा आपल्या निबंधांत उल्लेख केला आहे. ते स्वतः, त्यांच्या पत्नी सौ. उषा व मुलें अविनाश, मंदा व लता

मिळून होणाऱ्या कुटुंबांतील वातावरण या निबंधांत प्रतिबिंबित झालें आहे. पतिपत्नीमध्यें उडालेला एखादा खटका व मुलांचा अवखळपणा यांच्या चित्रणांत श्री. खांडेकरांचा स्वभाव व्यक्त झाला आहे.

श्री. खांडेकरांना मुलें आवडतात व प्रसंगीं ते त्यांच्यांबरोबर खेळण्यांत दंग होतात. 'प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवीचा असे।' ही केशवसुतांनीं अनुवादिलेली वर्डस्वर्थची उक्ति ते प्रत्यक्ष आचरतांना दिसतात.

विशीच्या आंतील तरुण मंडळीहि त्यांना प्रिय आहे, कारण 'हिंवाळ्यांत निष्पर्ण झालेली सृष्टि वसंताच्या आगमनानें जशी पल्लवित होते, तसें तरुण-तरुणींच्या हास्यमुद्रांनीं उदास वातावरण प्रफुल्लित होतें' असा त्यांचा अनुभव आहे.

श्री. खांडेकर चाळीशीच्या पुढें गेलेले पण पन्नाशीची झुळुक न लागलेले गृहस्थ आहेत. त्यांचें चरित्र, चारित्र्य व स्वभाव प्रसंगवशात् या लघुनिबंधांत प्रकट झाला आहे. त्यांच्या एकंदर आयुष्याची उत्कट कल्पना पुढील शब्दांवरून येते—

'अंधाराला न भितां गेलीं तेवीस वर्षें मी हा प्रवास करीत आलों आहें हें खरें! पण या प्रवासांत पायांत कांटे मोडले, पायांच्या बोटांना ठेचा लागून तीं रक्तबंबाळ झालीं आणि दोनतीनदां तर वाट चुकून खड्डयांतहि पडलों.... ' ( सायंका., पा. ९० ).

'डोक्यावर वडिलांच्या ममतेचें छत्र नाहीं, आईच्या मायेची पांखर नाहीं. अशा स्थितींत संसाराच्या वैराण वाळवंटांत जेव्हां मी धावूं लागलों तेव्हां 'ते हि नो दिवसा गताः' हा सबंध संस्कृत वाङ्मयांतला अत्यंत कारुण्यपूर्ण चरण आहे अशी माझी खात्री झाली!' ( चांदण्यां., पा. ९३ ).

'समोर कीर्तीची पताका फडफडत नसती, तिच्याभोंवतीं विजयाच्या तेजाची उज्ज्वल रेषा स्पष्ट दिसत नसती, तर गेल्या दोन तपांत मीं जी धडपड केली ती माझ्या हातून झाली असती का? मुळींच नाहीं! कीर्तीच्या मोहानें का होईना, मनुष्याच्या अंगांतल्या सुप्त गुणांचा विकास होतो हेंच खरें!' ( सायंका., पा. ९१ ).

—हे उतारे त्यांच्या बिकट जीवनाची, उत्कर्षासाठीं केलेल्या धडपडीची कल्पना देण्यास समर्थ आहेत. लग्न झाल्यावर त्यांच्या जीवनांत सुख, आनंद,

संपत्ति, संतति व आजार यांचा एकदम प्रवेश झाला. त्या सर्वांचे पडसाद त्यांच्या लघुनिबंधांत उमटले आहेत. आयुष्यांत आलेले बरे वाईट अनुभव व विविध स्वभावाचीं माणसें यांची त्यांनीं केलेली नोंद उद्बोधक असून तिनें निबंधांत वैचित्र्य व रमणीयता निर्मिली आहे. त्यांनीं शालेय जगाविषयींचें आपलें प्रेम व अनुभव हीं उत्कटतेनें सांगितलीं आहेत.

श्री. खांडेकरांचा विविध अनुभव अनेकदां म्हणी व सुभाषितें यांचें रमणीय रूप पावतो. या लघुनिबंधांत वारंवार असा प्रत्यय येतो. म्हणी बनविण्याची त्यांना हौस आहे. 'लागला तर टोला नाहींतर भोपळा', 'उतावळा शिकारी स्वतःला ठार करी', 'ज्याचा प्यावा चहा, त्याची करावी चहा' अशा अनेक म्हणी त्यांनीं बनविल्या आहेत. पुष्कळदां असलेल्या म्हणींवरून त्यांच्या म्हणी स्फुरलेल्या दिसतात.

सुभाषितांचीहि पैदास ते करतात. तीं त्यांच्या लेखनांत रानफुलांसारखीं उगवलेलीं दिसतात. मीं पन्नासेक गोळा केलीं आहेत, त्यांपैकीं तीन तुमच्यापुढें ठेवतों—

'चाळिशीच्या अलीकडे मनुष्य वीर असतो नि ती उलटतांच तो मुत्सद्दी होऊं लागतो.'

'आभाळांतसुद्धां फुलणारी एक वेल आहे. तिचें नांव कुटाळकी!'

'खरें सुख स्वतःच्या भोगांत नसून इतरांकरितां केलेल्या त्यागांत असतें.'

म्हणी व सुभाषितें याप्रमाणें चांदण्याप्रमाणें चमकणारे चतुर आलाप श्री. खांडेकरांच्या निबंधांत विखुरलेले आढळतात. त्यांना कोट्यधीश म्हणतात, तें सार्थ असल्याची वाचकांची खात्री पटते. साध्या गोष्टींचें वर्णन करतांना सुद्धां ते रमणीय अर्थ निर्मितात. डोळ्यांबद्दल लिहितांना म्हणतात—'मनुष्य-देहांतलें अत्यंत पवित्र स्थळ म्हणजे डोळेच; कारण तिथेंच गंगायमुनांचा संगम झालेला आढळून येतो.' त्यांची कल्पकता किती चतुर आहे हें जाणूं इच्छिणाऱ्यानें त्यांनीं केलेली घड्याळें व बायका यांची तुलना नजरेखालून घालावी. (वायुल., पा. ३९). त्या ठिकाणीं ते म्हणतात, 'माझी काकी होती एक कोंकणांत. अगदीं अस्सल गजराचें घड्याळ! पहांटे उठून ती भूपाळ्या म्हणूं लागली, कीं आमचा सबंध वाडाचा वाडा जागा होई.' कधीं कधीं ते अतिशयोक्तीनें विनोद साधून हसवितात. मोटारी सुटण्याच्या वेळेवर त्यांनीं

उपहासात्मक टीका केली आहे. ते म्हणतात, 'ठरलेल्या वेळीं सुटणारी मोटार ही शिकवणी न करणारा शिक्षक, इंजेक्शन न देणारा डॉक्टर, पुढील तारीख न मागणारा वकील, कादंबरी न वाचणारी कुमारिका, लघुकथा न लिहिणारा कॉलेजचा विद्यार्थी यांच्या मालिकेंतली दुर्मिळ चीज आहे.' शाळाशिक्षणावर त्यांचा तीव्र कटाक्ष आहे. 'पोट नसतें तर शाळा वाढविण्याऐवजीं शाळा बंद करण्याचे ठराव झाले असते!' असें कडक मत आहे त्यांचें. कित्येकदां फार मर्मभेदक उद्गार ते काढतात, जसें—'मोत्यांचीं कुडीं मिळेनाशीं झालीं, तर कानांचीं अग्रें झाकणाऱ्या केशरचनेंत कान सपशेल झांकून टाकण्याच्या फॅशनमध्यें रूपांतर करण्याचा भयंकर प्रसंग रमणीगणावर येईल, हेंहि मी मान्य करतों.' तरुणींचे केस कानांवर येतात ते अशासाठीं, प्रियकराची प्रेमयाचना ऐकूं येऊं नये म्हणून नव्हेत! 'सायंकालां'त एके ठिकाणीं ते म्हणतात, 'डोंगराप्रमाणें स्त्रीहि दुरून साजरी दिसते यांत शंका नाहीं.' क्वचित् आत्मनिरीक्षण करतांना ते उपहास व टीका साधतात. स्वतःबद्दल, पण दुसऱ्यांच्या दोषांना अनुलक्षून, ते लिहितात, 'माझ्या भोंवतालचीं पुस्तकें दुसऱ्याचीं असल्यामुळें मीं त्यांत एकहि खूण केलेली नाहीं.'

श्री. खांडेकरांच्या लघुनिबंधवाङ्मयाचें स्वरूप वरीलप्रमाणें आहे. 'वायुलहरी' ते 'अविनाश' पर्यंतचें त्यांचें लेखन निरखून पाहणाऱ्यास एक गोष्ट स्पष्ट दिसून येते—त्यांचें लेखन अधिकाधिक प्रसन्न होत आलें आहे. त्यांचे निबंध फार आकर्षक आहेत. 'वायुलहरीं'तील तात्पर्य, उपमा, अलंकारिक भाषा, काव्यदृष्टि, 'चांदण्यांत' मधील पुनर्जन्म, एक तप, संकेत, शास्त्रीय सत्य, 'सायंकालां'तील एक अपघात, रबरी फुगे, सुभाषितें, एक कात्रण, बाळपणींचा काळ सुखाचा, प्रेमवेडी बालिका, आणि 'अविनाशां'तलि पुढें पुढें, अकल्पित संदेश, चाळिशीचें घर, सारेच गुलाम, एकवचन, अविनाश हे निबंध मला पुनः पुन्हा वाचण्याची आवड आहे.

तरुणजनांस श्री. खांडेकरांचें वाङ्मय विशेष प्रिय आहे. तरुण, सुंदर व सुसंस्कृत स्त्रीप्रमाणें रसिकांना वेधणारें काव्य, क्वचित् मनाला रिझविणारा विनोद व बुद्धीला उद्बोधक असा उपहास, जीवितविषयक अनुभव व निरीक्षण यांमुळें उत्पन्न झालेला जिव्हाळा, आणि प्रियतम मित्राच्या किंवा मैत्रिणीच्या संलापाप्रमाणें चित्तवेधक असे चतुर आलाप यांमुळें त्यांचे लघुनिबंध

मनोहर झाले आहेत. किंबहुना, त्यांनीं गडकऱ्यांवर टीका करतांना सुबुद्धीनें लिहिलेले शब्द त्यांना स्वतःला येथें लागू पडतात—'कल्पकता व भावनोत्कटता या दोन गुणांमध्यें त्यांची बरोबरी करणारे मराठी लेखक हाताच्या बोटांवर मोजण्याइतके देखील सांपडणार नाहींत. पण कलेला आवश्यक असणारा संयम अंगीं न बाणल्यामुळें या गुणांच्या अतिरेकानेंच त्यांच्या लेखनांतले कित्येक दोष निर्माण केले आहेत....उज्ज्वल कल्पकता व उत्कट भावना यांच्या अंगीं वाचकांना मोहून सोडण्याचा गुण असल्यामुळें त्यांचें लेखन निर्दोष नसलें तरी नेहमींच लोकप्रिय राहील.' (अर्वाचीन म. वा. सेवक, भा. १)

—यशवंत, सेप्टेंबर, १९४१

## श्री. वि. स. खांडेकर

# एक अपघात

वर्तमानपत्रें विकणारा मुलगा दारांत आला मात्र! आम्ही दोघे लगबगीनें पुढें गेलों. खेळण्याच्या दुकानांत शिरल्यावर लहान मूल हाताला येईल ती वस्तु उचलून घ्यायला लागतें. आम्हींहि तशींच त्याच्या हातांतून चार-पांच वर्तमानपत्रें जवळजवळ हिसकावून घेतलीं.

घाईघाईनें एक पेपर उघडून मी महायुद्धाच्या बातम्या वाचूं लागलों. इतक्यांत माझा मित्र उद्गारला, "अरे, ही वर्ध्याची बातमी वाचलीस का?"

मला वाटलें, वर्ध्याला कार्यकारी मंडळानें एखादा जहाल ठराव पास केला असावा!

त्यानें दाखविलेली बातमी वाचूं लागलों. अपघात हा तिच्यांतला मोठा शब्द दिसतांच मी क्षणभर बावरलों. कुणाला अपघात झाला असावा? महात्मा गांधींना? ज्योतिषावर माझा विश्वास नसला तरी करमणुकीखातर मी तें नेहमीं वाचीत असतों. कालच एका आधुनिक भास्कराचार्यानें 'हा महिना महात्मा गांधींच्या प्रकृतीला फार वाईट आहे' म्हणून छापूनहि टाकलें होतें. त्या गृहस्थाची बत्तिशी पुरेपूर वठली कीं काय तें मला कळेना.

जवाहरलाल विमानानें वर्ध्याला येणार होते, ही गोष्टहि मला आठवली. एका क्षणांत मनांत नाहीं नाहीं त्या कल्पना येऊन गेल्या.

पण दुसऱ्याच क्षणीं मनुष्याचें मन किती भित्रें असतें याची खात्री होऊन मला हसूं आलें. वर्ध्याला अपघात झाला होता खरा; पण तो विमानाचा अथवा मोटारीचा नव्हता, फुटबॉलचा होता. फुटबॉल खेळतां खेळतां शंकरराव देव पडले होते आणि त्यांच्या पायाचें हाड थोडेंसें दुखावलें होतें.

मी ती बातमी पुन्हा मोठ्या कौतुकानें वाचूं लागलों तेव्हां माझा मित्र हसून म्हणाला, "युद्धाच्या बातम्यांपेक्षांहि या बाबतींत तूं अधिक रंगून गेलेला दिसतोयस!"

"हूं!" मीं उत्तर दिलें.

"असं आहे काय त्यांत ?" खोःखो हसत तो पुढें म्हणाला, "ही बातमी वाचतांना शंकरराव देवांची मूर्ति माझ्या डोळ्यांपुढं उभी राहिली नि मला अशा गुदगुल्या झाल्या म्हणतोस ! (दाढी आणि लुंगी यांचा फुटबॉलशीं काय संबंध आहे देव जाणे ! 'ब्रह्मचारी' पडद्यावर येण्यापूर्वी जर हा प्रसंग घडला असता तर त्या बोलपटांत औदुंबरादि शिष्यगणासह चंडिराम लगोरी खेळत आहे असं एखादं दृश्य दाखवायला अत्रे चुकले नसते. अरे, सावरकरांच्या विषयीं असली कांहीं बातमी छापून आली असती तर ती मला स्वाभाविक वाटली असती ! तोफेच्या गोळ्यांनीं खेळण्याची खुमखुमी त्यांनीं फुटबॉलनं भागविली असं म्हणतां आलं असतं ! पण शंकरराव देवांसारख्या विरक्त गांधीवाद्याला फुटबॉल खेळण्याची लहर यावी ! छेः ! अहिंसेच्या कट्टर पुरस्कर्त्यानं चेंडूला लाथा मारण्याकरितां एखाद्या पोराप्रमाणं धावत सुटावं ? अब्रह्मण्यम् !"

त्याचें बोलणें आणि नंतरचें हसणें पूर्णपणें थांबेपर्यंत मी गंभीरपणानें गप्प बसलों.

मग मी हळूच म्हणालों, "ही बातमी वाचून फार आनंद झाला मला !"

"आनंद ! शंकरराव देव पडले म्हणून आनंद झाला होय तुला ? अरे, कॉंग्रेसचा भक्त म्हणवतोस नि—"

"तसं नव्हे रे ! देवसुद्धां माणूसच आहेत हें मनांत येऊन आनंद झाला मला !"

तो माझ्याकडे आश्चर्यानें पाहूं लागला. मीं म्हटलें,

"मोठ्या माणसांविषयींच्या आपल्या कल्पना किती विचित्र असतात ! प्रत्येक मोठा मनुष्य हा देवमाणूस असलाच पाहिजे असं आपल्याला वाटतं ! ही अपेक्षा अगदीं चुकीची नाहीं; पण देवमाणसांबद्दल जगाला प्रेम वाटतं याचं कारण त्यांच्यांत देवपण असतं हें नव्हे ! तर देव होऊनहि तीं तुझ्यामाझ्याप्रमाणं हसतात, खेळतात, लहानसहान गोष्टींत रंगून जातात म्हणूनच तीं जगाला आवडतात !"

हा तत्त्वज्ञानाचा घोट फार कडू वाटल्यामुळेंच कीं काय, माझा मित्र मुकाट्यानें वर्तमानपत्रें वाचूं लागला.

माझें मात्र कांहीं केल्या वाचनावर लक्ष लागेना. राहून राहून शंकरराव देव आणि फुटबॉल यांची आठवण होत होती मला. या अपघाताच्या

बातमीवर अनेक वर्तमानपत्रांतल्या पहिल्या पानावर काय काय मल्लीनाथी छापून येईल याची मी कल्पना करूं लागलों!

वर्ध्याला वर्किंग कमिटीचें काम संपवून बाहेर येतांच देवांना फुटबॉल खेळणारीं कांहीं मुलें दिसलीं आणि मुलांच्या त्या खेळांत त्यांनींहि हौसेनें भाग घेतला! या प्रसंगावर कुणी दुष्टाचार्य पोरकट म्हणून शिक्का मारतील, कुणी फुटबॉलला लाथ मारण्याचा प्रयत्न करण्यांत देवांनीं अहिंसाव्रताचा भंग केला व या व्रतभंगाबद्दल हाड दुखावण्याच्या रूपानें त्यांना शिक्षा झाली असें मिस्किलपणें म्हणतील.

हें सारें लक्षांत येऊनहि माझ्या मनांत आलें, फुटबॉल खेळणाऱ्या मुलांत ज्या क्षणीं शंकरराव मिसळले, तो क्षण, त्यांनीं ज्या घटकेला स्वतःला राष्ट्रकार्याला वाहून घेतलें त्या घटकेइतकाच महत्त्वाचा आहे.

मी कांहीं तरीच सांगत नाहीं. सेवावृत्तीइतकीच क्रीडावृत्ति हा जीवनविकासाचा एक आवश्यक भाग आहे; पण हें किती लोकांना कळतें? मनुष्य जेवढा अधिक मोठा तेवढा त्याचा चेहरा अधिक सुतकी असला पाहिजे असें मानणारीं अनेक माणसें आढळतात! जवाहरलाल पत्ते खेळतात अगर सुभाषबाबू लॉरेल-हार्डीचा चित्रपट पाहून खो खो हसतात असें जर कोणीं त्यांना सांगितलें, तर प्रलयकाल जवळ आल्याइतके त्यांचे चेहरे दुःखी होतील! गांभीर्याच्या या कैवाऱ्यांना वाटतें, "जग ही एक शाळा आहे. मोठीं माणसें हीं या शाळेंतील मास्तरमंडळीच! एखाद्या शाळेंत मास्तरच गाऊं लागले, नाचूं लागले, हसूं लागले तर तिथें कसली कपाळाची शिस्त राहणार."

जग ही एक शाळा आहे हें मलाहि मान्य आहे. मोठीं माणसें हे या शाळेंतले शिक्षक आहेत हेंहि मी कबूल करतों; पण जग ही शाळा असली तरी ती तात्यापंतोजींचीच शाळा असली पाहिजे असा हट्ट कां? किंडरगार्टन पद्धतीनें मुलें हसतखेळत किती जलद शिकतात हा अनुभव कांहीं आतां नवीन नाहीं. मग जगाच्या शाळेलाहि हें नवें वळण लागावें असें कुणीं म्हटलें, किंबहुना तसा बदल कुणी घडवून आणूं लागला तर त्यांत काय बिघडलें? नवीन शिक्षणपद्धतींत खेळ हा जसा शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामधला दुवा आहे त्याप्रमाणें मोठीं माणसें आणि छोटीं माणसें यांना जोडणारा जगांत एकच पूल आहे, त्याचें नांव खेळकरपणा...

एका जुन्या क्रमिक इंग्रजी पुस्तकांत, जपानांत म्हातारीं माणसें मोठ्या हौसेनें पतंग उडवीत असतात, असें एक वाक्य आहे. तें मी शिकवीत असतांना वर्गांत जो विलक्षण हशा उसळला होता, तो इतकीं वर्षें झालीं तरी अजूनहि मला आठवतो. वर्गांतल्या प्रत्येक मुलाचें हास्य म्हणत होतें— म्हातारीं माणसें पतंगांनीं खेळतात ? छेः लहान मुलानें आजोबांचा चष्मा लावावा त्यांतलाच प्रकार आहे हा ! उद्यां म्हातारीं म्हाणसें लंगडीनें खेळतील, म्हाताऱ्या बायका फुगड्या घालूं लागतील आणि डोक्याला टक्कल पडलेले किंवा पाठीला पोंक आलेले लोक 'हुतुतूतूतू' करीत एकमेकांना धरण्याचा प्रयत्न करतील ! म्हाताऱ्यांनीं पतंग उडवीत बसायचें ? किती हास्यास्पद आहे हें !

जपान आज जगांतील एक प्रमुख राष्ट्र झालें आहे, याचें कारण तिथें म्हातारीं माणसें पतंगांनीं खेळतात, असें मीं त्या वेळीं बोलून गेलों. वाक्य तोंडांतून निघून गेल्यावर मग मला वाटलें, मुलांच्या हसण्याला उत्तर म्हणून आपण भलतेंच विधान केलें. पण आतां वाटतें, माझें तें विधान सर्वस्वीं बरोबर होतें. कुठल्याहि राष्ट्राची प्रगति तरुणांवरच अवलंबून असते; आणि देशांत तरुण किती आहेत हें शिरोगणतींतल्या वयाच्या आंकड्यांवरून किंवा किती तरुणी आहेत हें बाजारांत खपणाऱ्या केसांच्या आंकड्यांवरून कधींच ठरवितां येत नाहीं. शिंप्यांना डबलब्रेस्टचे कोट आणि पायजमे किंवा १९३९च्या फॅशनचे ब्लाऊज आणि जंपर खूप शिवावे लागले म्हणून हिंदुस्थानांत तरुण-तरुणींची संख्या मोठी आहे असें म्हणायला मी मुळींच तयार नाहीं. तारुण्याची परीक्षा केशभूषा किंवा वेषभूषा यांच्यावरून होत नाहीं; ती मनावरूनच होते. ज्यांचीं मनें तरुण आहेत तींच माणसें कुठल्याहि खेळांत हौसेनें भाग घेतात. शंकरराव देव फुटबॉल खेळणाऱ्या मुलांत मिसळले याचा जो मला आनंद झाला त्याचें कारण एकच होतें—आमचे पुढारी वयानें प्रौढ झाले तरी मनानें तरुण राहूं इच्छितात ही गोष्ट या प्रसंगानें सहजासहजीं सिद्ध झाली.

मला आगरकरांच्या असामान्य कर्तृत्वाची आठवण झाली. त्यांचे लेख वाचल्यावर दम्यासारख्या त्रासदायक विकारानें जन्मभर पछाडलेल्या माणसाच्या लेखणींतून जग जिंकायला निघालेल्या लढवय्याला शोभणारे तेजस्वी विचार अव्याहत कसे निघत असत याचें मला कैक दिवस कोडें

पडलें होतें. पुढें आगरकरांचें चरित्र वाचतांना एका लहानशा प्रसंगानें या रहस्याचा उलगडा झाला. मुलानें पाठीवर बसून घोडा, घोडा म्हणून चाबूक मारला, कीं दम्यानें जर्जर झालेल्या त्यांच्या शरीरांतलें तरुण मन हां-हां म्हणतां त्या खेळांत गुंग होऊन जात असे!

वर्तमानपत्रांतल्या त्या बातमीवर माझी दृष्टि पुन्हा स्थिर झाली. त्या बातमींतलीं ' अपघात ' हीं अक्षरें माझ्या डोळयांत कशीं खुपूं लागलीं! माझ्या मनांत आलें—हे वर्तमानपत्रांचे संपादक मुलखाचे अरसिक असतात! शंकरराव फुटबॉल खेळतांना चुकून पडले असतील, त्यांच्या पायाचें हाड थोडेंसें दुखावलेंहि असेल! म्हणून काय या बातमीचा मथळा ' श्री. शंकरराव देवांना अपघात ' असा छापायचा? या धंदेवाईक संपादकांची सारी भिस्त भयानक रसावर असते. खून, विनयभंग, अपघात हे सारे यांचे जानी दोस्त!

छेः! मी जर या वर्तमानपत्राचा संपादक असतों, तर या बातमीचा मथळा याहूनहि मोठ्या ठशांत छापला असता. पण तो ' श्री. शंकरराव देवांना अपघात ' असा नाहीं; तर ' श्री. शंकरराव देवांचें अभिनंदन ' असा!

—सायंकाल

## श्री. वि. स. खांडेकर

# अकल्पित संदेश

आतां-आतांशीं कुठलीही सभा म्हटली, कीं माझ्या अंगावर कांटाच उभा राहतो. आपल्या भाषणानें शेंकडों श्रोत्यांचें आपण समाधान करूं शकूं कीं नाहीं या शंकेनें नव्हे; तर सभा संपल्यावर स्वाक्षरी घेण्याकरितां वक्त्याभोंवतीं अल्लड तरुण-तरुणींची जी गर्दी होते तिच्या भयानें. तसें पाहिलें तर विशीच्या आंतली तरुण मंडळी मला फार आवडतात. हिंवाळ्यांत निष्पर्ण झालेली सृष्टि वसंताच्या आगमनानें जशी पल्लवित होते, तसें तरुण-तरुणींच्या हास्यमुद्रांनीं उदास वातावरण प्रफुल्लित होतें असा माझा अनुभव आहे. जीवनसागराला भरती येऊं लागल्यावर त्याच्या पहिल्या लाटांचें अवखळ पाणी तरुण-तरुणींच्या कणांकणांतून जणूं कांहीं उसळत असतें. त्यामुळें एखादी प्रणयरम्य कादंबरी वाचीत असतांना गरीब कारकून जसें आपलें संसारसुख विसरून जातो, त्याप्रमाणें तरुण-तरुणींच्या सहवासांत प्रौढ माणसांनाहि हृदयांत सलणाऱ्या अनंत शल्यांचा विसर पडत असतो. मात्र एक गोष्ट अवश्य लक्षांत ठेवली पाहिजे : या तरुण-तरुणींच्या हातांत सुंदर पुठ्ठयांच्या स्वाक्षरी घ्यायच्या छोट्या वह्या असतां कामा नयेत.

स्वतःची सही देण्यांत एवढें भिण्यासारखें काय आहे असा प्रश्न ज्यांच्या सह्या मनीऑर्डर घेऊन आलेल्या पोस्टाच्या शिपायाखेरीज कुणींच मागितल्या नसतील, त्यांच्या मनांत उभा राहणें स्वाभाविक आहे. तसें पाहिलें तर शिक्षकाच्या धंद्यांत शेंकडों मुलांच्या वह्यांचे गठ्ठे तपासून आणि साऱ्या शाळेच्या प्रगतिपुस्तकांवर दर महिन्याला सह्या करून, माझी स्वाक्षरी चांगलीच घटली आहे. पण तरुण-तरुणींच्या या स्वाक्षरी-प्रकरणांत एक मोठी गोम असते. त्यांना नुसती सही नको,—संदेश हवा !

आतां तुम्हीच सांगा. माझ्यासारख्या माणसानें प्रामाणिकपणानें संदेश द्यायचें ठरविलें, तर त्याला स्वाक्षरीच्या साऱ्या वह्या कोऱ्याच ठेवाव्या लागतील कीं नाहीं ? संदेश म्हटला कीं त्यांत कांहीं तरी भव्य, उच्च नि उदात्त असलेंच पाहिजे ! 'आधीं पोटोबा नि मग विठोबा !' हा अनुभव जगांत माझ्याप्रमाणें प्रत्येकाला येत असला, तरी संदेश म्हणून तो लिहिण्याची

छाती कुणाला तरी होईल का ? बरें, आपल्या अनुभवाला आलेलीं असलीं कडु सत्यें लपवून ठेवायचें ठरविलें तर धडधडीत खोटे संदेश द्यायची पाळी येते ! 'कर्मण्येवाऽधिकारस्ते' हा श्रीकृष्णाचा संदेश देण्याकरितां पहिल्या-पहिल्यांदा माझे हात फार खुरखुरत असत. पण कुठल्याहि मासिकानें माझ्या लेखनाचा मोबदला बुडविला म्हणजे माझा जो चडफडाट होत असे तो अशा वेळीं मला आठवे आणि मी मनांत म्हणें, "आपल्याला सोंगें-ढोंगें साधत असतीं तर आपण बुवा होऊन चैनींत लोळत राहिलों असतों. शिक्षकाचा नि लेखकाचा दरिद्री पेशा आपण कशाला पतकरला असता ?"

असल्या अनुभवांमुळें संदेश देणें हें मला मोठें प्राणसंकट वाटतें आणि कुठल्याहि सभेंत भाषणाच्या आरंभीं जरी माझें मन गोंधळून जात असलें तरी भाषण संपल्यावर मात्र मी कावराबावरा होतों. आभाराचें भाषण सुरू असतांनाच अनेक तरुणतरुणी वह्या सरसावून माझ्याकडे पाहूं लागलेल्या दिसतात. गळ्यांत पडलेला हार हातांत घेऊन कुठल्या दरवाजानें पोबारा करावा याचा विचार मी करतों न करतों तोंच, पातळांच्या आणि पायजम्यांच्या पलटणींनीं मला वेढून टाकल्याचें दृश्य दिसूं लागतें. या संकटांतून सहीसलामत सुटण्याचा मार्ग एकच असतो—मुकाट्यानें शत्रूला शरण जाणें.

परवांच्या दिवशीं सभा संपली तेव्हां मीं मुकाट्यानें याच मार्गाचा आश्रय केला. आज स्वाक्षरीसाठीं गडबडीनें व्यासपीठावर येणाऱ्या तरुण मंडळीकडे पाहत 'बाळक्या आला रे आला !' असें मोठ्यानें म्हणायचें आणि सभागृहांतून धूम ठोकायची असें मीं मनाशीं ठरविलें होतें. पण मनांतल्या शंभर गोष्टींपैकीं जनांत आपण पांचच करूं शकतों हा अनुभव इतरांप्रमाणें मलाहि आला.

भोंवतालीं चाललेल्या गडबडीकडे दुर्लक्ष करून मीं एक स्वाक्षरीची वही हातांत घेतली. काय लिहावें हेंच सुचेना. हाताला कांहीं तरी चाळा हवा म्हणून मी त्या वहीचीं मागलीं पानें चाळूं लागलों. एका बड्या साहित्यिकांनीं आपला संदेश दिला होता—'विचार हेंच मनुष्याचें वैभव आहे !' एका प्रांतिक पुढाऱ्यानें लिहिलें होतें—'वीर पुरुषांपेक्षां विचारी पुरुषच खरे जगज्जेते असतात.' एका विदुषींनीं पोपटपंची केली होती—"बुद्ध म्हणतो तेंच खरें आहे. All that we are is the result of what we have thought."

भोंवतालीं गर्दी वाढत होती. कांकणें वाजत होतीं. वह्यांचीं पानें सळसळत होतीं. आतां हातांतल्या वहींत कांहीं तरी लिहिणें मला प्राप्तच होतें. बोलरनें टाकलेला चेंडू दिसला नाहीं तरी खेळाडूला बॅट फिरवावीच लागते. मी लिहून गेलों—'थोडे अविचारी व्हा!'

अवघे तीन शब्द. पण—

हे शब्द हातून लिहून झाले मात्र! आपण कांहीं तरी भलतेंच लिहून गेलों असें मला वाटलें. हा संदेश खोडून 'सत्य सदा बोलावें', 'अहिंसा परमो धर्मः', 'जे का रंजले गांजले—', किंवा 'Throw no stones into the well, whence you have drunk.' यांपैकीं एखादें वाक्य लिहावें असा विचारसुद्धां माझ्या मनांत येऊन गेला. पण त्याचा कांहींच उपयोग नव्हता. बाण हातांतून केव्हांच निघून गेला होता; इतकेंच नव्हे तर अगदीं वर्मीं लागला होता. त्या वहीचा मालक—एक सोळासतरा वर्षांचा विद्यार्थी—माझ्याकडे डोळे फाडून पाहत होता. बाहेर गेल्यावर, माझ्या तोंडाला कसला तरी भयंकर वास येत होता, असें सुद्धां त्यानें आपल्या सोबत्यांना सांगितलें असेल!

या संदेशाचा एका तरुणावर झालेला हा विलक्षण परिणाम पाहून मीं तोच संदेश प्रत्येकाला देण्याचा सपाटा चालविला. माझी सही होतांच जो तो आपआपली वही उचली, दिलेल्या संदेशावरून नजर फिरवी; आणि साप दिसला कीं मनुष्य जसा भयभीत चेहरा करून दूर सरकतो, तसा निघून जाई.

घरीं परत येतांना या सर्व तरुण-तरुणींचे आश्चर्यचकित चेहरे माझ्या डोळ्यांपुढें एकसारखे उभे राहत होते. मीं दिलेला संदेश नेहमींच्या पद्धतीपेक्षां थोडा निराळा होता हें खरें; पण मीं लिहिलेलें तें वाक्य ही केवळ माझ्या मनाची प्रतिक्रिया होती. माझ्या हातांत आलेल्या वहींत ज्यानें त्यानें विचाराचे गोडवे गायले होते. त्या अतिरेकावर कांहीं तरी उतारा हवाच होता. तो मीं दिला एवढेंच. त्यांत भयंकर असें काय घडलें होतें? मीं थट्टेनें कांहीं तरी लिहिलें आहे असें समजून त्या सर्वांनीं हसत हसत जायला हवें होतें. पण—

त्या सर्व तरुण मंडळींचे ते बुजरे चेहरे—त्या विलक्षण नजरा—

मी कांहीं तरी भलतेंच लिहून तर गेलों नाहीं ना?

'थोडे अविचारी व्हा' हे शब्द मोठमोठ्या अक्षरांत माझ्या डोळ्यांपुढें नाचूं लागले. क्षणभर माझें मन गोंधळून गेलें. माझ्यासारख्यानें तरुण-

तरुणींना विचारी व्हायला सांगायचें, कीं अविचारी होण्याचा उपदेश करायचा ?

मी चुकलों तर नाहीं ना ?

पण माझ्या मनाची ही रुखरुख फार वेळ राहिली नाहीं. माझ्या मनःश्चक्षूंपुढें एकामागून एक अशा अनेक मोठ्या माणसांच्या मूर्ति उभ्या राहिल्या. बुद्ध, कोलंबस, महात्मा गांधी—

बुद्धाच्या आयुष्यांतली ती तेजस्वी मध्यरात्र मला आठवली—राजवाड्यांतला शृंगारलेला महाल ! मंचकावर लावण्याची खाण अशी पत्नी झोपलेली ! तिचे केस भुरुभुरु उडत आहेत. जणूं कांहीं यौवन आणि मदन अदृश्य रूपानें त्या सुंदरीच्या उशाशीं बसून तिला वारा घालीत आहेत. पलीकडे रत्नजडित पाळण्यांत एक बाळ निजलें आहे. त्याच्या बोबड्या बोलांतून पाझरणारें अमृत कुणाला नकोसें होईल ? पण पत्नी आणि पुत्र यांचे हे प्रेमपाश तटातट तोडून राजपुत्र गौतम त्या मध्यरात्रीं राजवाड्याबाहेर पडला. त्या वेळीं प्रत्येकाला त्याचें तें कृत्य मोठ्या अविचाराचें वाटलें. पण त्या अविचारानेंच त्याला बुद्धाच्या पदवीला पोंचविलें. गौतम विचार करीत राहिला असता, आपल्या पत्नीचें कसें होईल, पित्याला काय वाटेल, आपल्या पुत्राची काळजी कोण करील इत्यादि गोष्टींचा विचार करण्याचा गौतमानें प्रयत्न केला असता तर—तर इतिहास ज्यांच्याकडे ढुंकून पाहायलासुद्धां तयार नाहीं अशा असंख्य राजांपैकीं तोहि एक झाला असता.

आणि कोलंबस हिंदुस्थान शोधायला निघाला तेव्हां त्यालासुद्धां सर्वांनीं अविचारीच म्हटलें नव्हतें का ? जी सुवर्णभूमि तो शोधायला निघाला होता ती कुठल्या दिशेला आहे तें सुद्धां त्याला पुरें ठाऊक नव्हतें. ध्येय साध्य झालें नाहींतर, समुद्रांत जलसमाधि घेण्याशिवाय आपल्याला दुसरा कुठलाहि मार्ग मोकळा नाहीं, हें काय त्याला कुणीं सांगायला हवें होतें ? पण तो विचार करीत राहिला नाहीं. तो विचार करीत बसला असता तर जन्मभर युरोपच्या किनाऱ्यावरच बसला असता आणि त्याच्या थडग्यावर स्मृतीदाखल काय लिहावयाचें हा त्याच्या मित्रांना मोठा प्रश्न पडला असता. पण आज नेपोलियन आणि शेक्स्पिअर यांच्या रांगेंत इतिहासानें त्याला स्थान दिलें आहे.

अँड्रोक्लीस सिंहाच्या पायांतला कांटा काढण्याकरतां पुढें झाला तो काय पूर्ण विचार करून ? तानाजी विचार करीत बसला नाहीं म्हणूनच मूठभर

मावळ्यांच्या मदतीनें मध्यरात्रीं कोंडाण्यावर हल्ला करण्याचा त्याला हिय्या झाला. बोटींतून समुद्रांत उडी टाकणारे सावरकर, मिठाच्या सत्याग्रहानें एका बलाढ्य साम्राज्यशाहीला सळो का पळो करून सोडणारे गांधीजी, ज्या भुकेच्या पायीं विश्वामित्रासारख्या महर्षीनें सुद्धां चांभाराच्या घरच्या हाडकांची चोरी केली त्या भुकेवर विजय मिळविणारा जतींद्र, यांनीं जीं दिव्यें करून दाखविलीं त्यांचा उगम विचारांच्या पोटीं आहे असें कोण म्हणेल ? विचार कितीहि प्रभावी असला तरी त्याला पंख नसतात ! त्याला नेहमीं जमिनीलाच चिकटून राहावें लागतें. पण अविचार मात्र अस्मानांत भराऱ्या मारायला मोकळा असतो !

म्हणूनचं गडकऱ्यांसारख्या प्रतिभासंपन्न कवीनें विचाराची खालील शब्दांनीं संभावना केली आहे—

"नसत्या आधि
स्वैर शतावधि
निर्मुनि आधी
क्षणोक्षणीं मग वाढविसी
विश्वामित्र दुजा गमसी !"

* * *

"देइन म्हणशी
सुंदर खाशी
'उद्यां' नराशीं
'आज' हातिंची परि हरिसी
मृगजाळिं मनुजा खेळविसी !"

गडकरी नुसती विचारांची निंदा करूनच थांबले ! त्यांच्या जागीं मी असतों तर मी अविचाराची जोराची तरफदारी केल्याशिवाय राहिलों नसतों ! आणि ही तरफदारी सर्वांना पटावी म्हणून सामान्य मनुष्याच्या आयुष्यांतलें एक उदाहरणहि दिलें असतें. मला स्वतःला सायकलवर मुळींच बसतां येत नाहीं; पण पोहतां मात्र चांगलें येतें. असें होण्याचें कारण—पहिलें विचाराचें फळ; दुसरें अविचाराचें !



६१७७

मी चारपांच वर्षांचा असतांना प्लेगांत आम्ही माळावर राहायला गेलों होतों. एके दिवशीं दुपारीं माझा थोरला भाऊ आणि त्याचे कांहीं सोबती यांनीं विहिरीवर पोहायला जायची टूम काढली. गाड्याबरोबर नळ्याला यात्रा घडते तसा मीहि त्या टोळक्याबरोबर गेलों. विहिरींतल्या एका खडकावर कपडे राखण्याच्या कामावर मला बसवून आणि 'जागचा हलूं नकोस हं' असें पुनः पुन्हा बजावून त्या साऱ्या मंडळींनीं विहिरींत उड्या टाकल्या. प्रत्येक उडीबरोबर जें पाणी उसळलें तें मला दिवाळींतील पेटलेल्या बाणासारखें वाटलें. सारीं मुलें पोहूं लागलीं. एक बेडकासारखा पोहत होता, दुसरा उताणा पोहत होता. अंथरुणावर मजेंत लोळत राहावें तसें त्याचें पोहणें चाललें होतें. मला मोठी गंमत वाटली तें पाहून—पाण्याचें अंथरूण व पाण्याचेंच पांघरूण! काय मजा असेल त्या लोळण्यांत! मधेंच दोन-तीन मुलें पाण्यानें निथळत बाहेर आलीं आणि त्यांनीं उड्या मारायला सुरुवात केली. मुटका टाकणारा मुलगा पाहून मला गणपति बुडतात त्याची आठवण झाली. मोटेवरून उडी मारणारा मुलगा तर अगदीं बुद्धाच्यां मूर्तीसारखा दिसत होता. आणि सुरकांडी मारणाऱ्या मुलाला पाहून सुंदर माशाची चपळ हालचालच माझ्या डोळ्यांपुढें उभी राहिली.

या देखाव्यानें माझें भान हरपलें. मी एकदम उठून उभा राहिलों. अंगांत यावें तसें कांहीं तरी झालें होतें मला. 'बाळू, मी आलों' असें मोठ्यानें ओरडत मीं विहिरींत उडी टाकली—

मुळींच पोहायला येत नसतांहि मी त्या दिवशीं बुडलों नाहीं हें सांगितलेंच पाहिजे असें नाहीं. त्या आकस्मिक उडीनें मला थोडेंसें पाणी चारलें हें खरें! पण त्या उडीनेंच माझें पाण्याचें भय नाहींसें केलें. पुढें चारआठ दिवसांतच मला पोहतां येऊं लागलें.

पण सायकलवर बसणें मात्र—

माझ्या लहानपणीं सायकली दुर्मिळ होत्या. आज मोटार ठेवण्याइतकेंच त्या वेळीं सायकल बाळगणें सामान्य मनुष्याला कठीण वाटे. त्यामुळें दहा-बारा वर्षांपर्यंत मला 'हॉपिंग'साठींसुद्धां कुणाची सायकल मिळाली नाहीं. बारा वर्षांचा झाल्यावर मला वाटूं लागलें आपले डोळे अधू आहेत. त्यामुळें सायकल चालवितांना आपल्या हातून अपघात होण्याचा फार संभव आहे.

तेव्हां चाळिशी मिळाल्यावरच आपण सायकलवर बसायला शिकूं. डोळ्यांवर चष्मा येईपर्यंत माझीं पंधरा वर्षे पुरीं झालीं होतीं. पण चष्मा आल्याबरोबर एक नवीनच भीति मनांत उभी राहूं लागली. शिकतां शिकतां आपण सायकलवरून पडलों तर चष्म्याच्या काचा फुटतील, त्यांतला एखादा तुकडा डोळ्यांत जाईल नि मग—"Oh! What is that thing called light?" असें विचारणाऱ्या आंधळया मुलाचें करुण चित्र आठवून मीं सायकलवर बसायला शिकण्याचा बेत त्या वेळीं लांबणीवर टाकला आणि आतां तर तो पुढल्या जन्मावरच गेला आहे.

लहानपणच्या या आठवणी मनांत घोळत असतांनाच मी घरीं आलों. परगांवची एक विद्यार्थिनी माझी स्वाक्षरी घेण्याकरितां घरीं येऊन बसली होती. माझ्या हातांत वही देत ती म्हणाली, "नुसती स्वाक्षरी नको; संदेशहि हवा!" 'अवश्य' असें हसत म्हणून मीं तिच्या वहीवर लिहिलें, "थोड्या अविचारी व्हा!"

—अविनाश

# श्री. रघुनाथ गोविंद सरदेसाई

'कागदी विमानें' ( ३०-१०-१९४० ) हा वैशिष्ट्यपूर्ण लघुनिबंधसंग्रह आहे. यांतील निबंधांचे विषय व त्यांवरील विचार पाहतां गार्डिनरच्या सुप्रसिद्ध उद्गारांची आठवण होते. गार्डिनर म्हणतात, " Any peg will do to hang the hat on; it is the hat that matters." 'कागदी विमानें' वाचून पाहतां ही उक्ति सुतराम् खरी वाटते. " त्या त्या आठवड्यांत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेली एखादी लहानशी बातमी किंवा घटना घेऊन तीवरून सुचलेले विचार" श्री. सरदेसाई यांनीं " बिन्दोः सिन्धुः" या लेखमालेंतील निबंधांत मांडले होते. त्यांनीं निवडलेल्या बातम्या त्यांच्या लेखनाला निमित्तमात्र आहेत; त्यांमुळें त्यांचें कुतूहल जागृत झालें, विचारांना चालना मिळाली व बहुश्रुत स्मृतीचा एकेक कप्पा उघडला जाऊन त्यांच्या प्रसवशील लेखणींतून मनोरंजक लघुनिबंध उतरले.

हीं 'कागदी विमानें' ज्या बातम्यांवर व घटनांवर आधारलीं आहेत, त्या कुतूहलजनक असून पत्रपंडिताच्या बुद्धीशीं संघर्ष (conflict) उत्पन्न करणाऱ्या आहेत. अशा संघर्षामुळें श्री. सरदेसाई यांचे त्या त्या बातमी-घटनेमुळें सुचलेल्या विषयावरील विचार स्फुरले व त्यांच्या व्यक्तित्वाची व बहुश्रुततेची जोड घेऊन निबंधरूपानें व्यक्त झाले. उदाहरणार्थ " वृत्तपत्र नसलेला देश!" हा लघुनिबंध पाहा. ह्याला निमित्तमात्र असलेली बातमी अशी आहे. " जेथें एकही वर्तमानपत्र चालविण्यांत येत नाहीं, असा जगाच्या पाठीवर एकच देश आहे आणि तो म्हणजे तिबेट होय." एवढ्या बातमीच्या आधारें श्री. सरदेसाई यांनीं तब्बल आठ पृष्ठांचा सुंदर लघुनिबंध लिहिला आहे. वर्तमानपत्र हा सुधारलेल्या लोकांच्या जीवनाचा किती महत्त्वाचा घटक आहे, वर्तमानपत्र हें आजच्या जीवनाचें कसें खरेंखुरें प्रतीक आहे, इत्यादि गोष्टींवर त्यांनीं उद्बोधक प्रकाश पाडला आहे. या निबंधाप्रमाणेंच 'अबला कीं प्रबला?' 'शाळामास्तर', 'प्रसिद्धीसाठीं धडपड', 'खोटीं नाणीं', 'शेजारी', 'ओझें आणि हमाली', 'लाल फीत', 'सेफ्टी रेझर' वगैरे निबंध उत्तम साधले आहेत.

या निबंधांचे विषय विविध असून त्यांत जीवनाच्या नाना छटा प्रतिबिंबित झाल्या आहेत. पत्रपंडित, शाळामास्तर, सिनेमानट, प्रसिद्धीसाठीं धडपडणारे

राजकारणी व साहित्यिक, पुरुषी अन्यायाविरुद्ध चळवळ करणाऱ्या स्त्रिया, शारीरिक व बौद्धिक हमाली करणारे, अखिल भारतीय न्हावी-ब्राह्मण महासभा काढणारे नापित वगैरे नाना जनांच्या जगावर या 'कागदी विमानां'नीं प्रवास केला आहे. श्री. सरदेसाई यांनीं हें जग लघुनिबंधकाराच्या भेदक दृष्टीनें पाहून "खोटीं नाणीं" वाचकांच्या नजरेला आणलीं आहेत. असें करतांना, त्यांच्या लेखणीनें भिन्नभिन्न व्यवसायांच्या व वृत्तींच्या माणसांच्या स्वभावाचें ओझरतें दर्शन केलें आहे.

मनोरंजन हा श्री. सरदेसाई यांच्या निबंधांचा मुख्य उद्देश आहे; तो पूर्ण सफल झाला आहे. त्यांची बहुश्रुतता व संग्राहक बुद्धि यांना उपरोध, उपहास व अतिशयोक्ति हीं विनोदाचीं हत्यारें व क्वचित् काव्य यांची जोड मिळाल्यामुळें या 'कागदी विमानां'नीं सार्वजनिक जीवनावर रम्य प्रकाश पाडला आहे. श्री. सरदेसाई यांना विनोदाची चिरसंगति लाभली असली, तरी त्यांनीं प्रसंगीं जीवनाच्या दूषित अंगांवर उपरोध व उपहास यांची तीक्ष्ण धार चालविली आहे. ही धार किती विदारक आहे, तें स्पष्ट करण्यासाठीं कांहीं उदाहरणें देतों. 'वृत्तपत्र नसलेला देश !' या निबंधांत ते म्हणतात, "वर्तमानपत्र नाहीं म्हणजे त्यांत येणारें मूर्खपणानें भरलेलें 'बायकांचें पान' नाहीं, कीं पाश्चात्य वर्तमानपत्रांतील उत्तान शृंगाराचीं चित्रें व लेख यांची उष्टी प्रतिकृति नाहीं." (पा. ६). "राजकारणाची चर्चा खडाजंगीवांचून होऊं शकते यावर माझा विश्वास नाहीं." (पा. १०) असें म्हणून त्यांनीं वाचाळ राजकारणाची हजेरी घेतली आहे. पान ४४ वर "आतांशा शिक्षणपद्धतींत पूर्वीच्या मानानें फार बदल झाला आहे; पण शाळामास्तर मात्र आहे तसाच प्राणी आहे. फरक झालाच असेल, तर पूर्वीचे मास्तर आपापल्या विषयांत बरेचसे मुरब्बी असत व हल्लींचे मास्तर बहुतांशीं नोट्सवर आपला संसार मारून नेतात." असें 'शाळामास्तर' बद्दल लिहितांना लेखकाला त्याच्या दुरवस्थेचा विसर पडलेला नाहीं; तो पुढील पानावर लिहितो, "आजचा शाळामास्तर बिचारा 'राष्ट्राचीं कोडीं' सोडविण्यापेक्षां स्वतःच्या 'पोटाचें कोडें' सोडविण्यांतच मेटाकुटीला आला आहे." 'शेजारी' कसा निंदक व दुष्ट असतो हें वाचकाला अगदीं विश्वासांत घेऊन सांगत असतां श्री. सरदेसाई त्याला हळूच चिमटा घेतात, "आपल्या शेजाऱ्यांसंबंधीं अनेक प्रकारच्या कागाळ्या करतांना तुम्ही स्वतः

एक शेजारीच आहांत याचें कसें अचूक विस्मरण पडतें तुम्हाला!" (पा. ६३) सिनेमासृष्टीवर त्यांनीं टीका केली आहे ती अशी: "सिनेमासृष्टींतील नायकांचा हेवा करण्यासारखा गुण म्हणजे त्यांना कधीं कोठें अपयश येत नाहीं." (पा. ५१). "सिनेमांत पाऊल टाकल्याबरोबर जशी प्रत्येक नटीच्या 'कुलीन'पणाची भडक जाहिरात करण्यांत येते, तद्वत् प्रत्येक नटाच्या शिक्षणसंपन्नतेचीही करण्याची प्रथा आहे" (पा. ९१). 'कागदी विमानां'तील उपरोध व उपहास असा आहे.

आतां त्यांतील विनोदाचा विचार करूं. गंमतीचे चुटके, चुटकेवजा दंतकथा, अतिशयोक्तिपूर्ण असे प्रसंग व वार्ता, विडंबन इत्यादि साधनांच्या समृद्धीमुळें श्री. सरदेसाई यांनीं साधलेल्या या निबंधांतील विनोदाची जोड दुसऱ्या कोणत्याहि मराठी लघुनिबंधसंग्रहाला लाभलेली नाहीं. त्यांनीं अगदीं सामान्य विषयावरील लेखनांत विचारसौंदर्य निर्माण केलें असलें, तरी त्याचें आकर्षक सौंदर्य व गोडी त्यांतलि विनोदामुळेंच उत्पन्न झाली आहे. विनोदाचें वर सांगितलेलें साहित्य संपादन करण्यापेक्षां त्याची समुचित योजना करण्यांतच खरी चतुराई व कौशल्य आहे. तसें कौशल्य व तशी चतुरता श्री. सरदेसाई यांच्या अंगीं असल्याचा भरपूर पुरावा या पुस्तकांत आहे. या गोष्टीबरोबर हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, त्यांनीं केवळ अशा कौशल्यावरच गुजराण केलेली नाहीं. त्यांनीं प्रसंगोपात्त साधलेला विनोद अनेकस्थळीं दिसून येतो. 'कागदी विमानां'तील विनोदी माल नमुन्यादाखल या ठिकाणीं दाखविणें स्थलाभावीं शक्य नाहीं.

श्री. सरदेसाई या निबंधांच्या वाचकांना खूप हसवितात, मधून मधून उपहास-विरोधाचे चिमटे घेतात आणि त्यांना तेजस्वी विचार व कल्पना यांचीं रत्नें बहाल करतात. हीं रत्नें या निबंधांत निखुरलेलीं आहेत तीं अगदीं सहज; तीं कृत्रिम नाहींत. उदाहरणार्थ त्यांतील कांहीं येथें उद्धृत करतों—
"झोंपीं गेलेल्यांनाच काय, पण झोंपेचें सोंग आणणाऱ्यांना देखील वर्तमानपत्र तातडतोब जागें करून हातपाय हालविण्यास भाग पाडतें." (पा. ३)
"मातीच्या चुलीप्रमाणेंच पुरुषी अन्याय व जुलूमजबरदस्ती यांच्यासंबंधींची बायकी ओरड घरोघर ऐकूं येते. फक्त फरक असेल तर हा 'चार्जशीट' पुरुषाच्या तोंडावर फेंकून मारण्याच्या प्रत्येक स्त्रीच्या घरगुती पद्धतींतच असेल." (पा. २४)

"मास्तरविषयींचा समाजांतील आदरहि पण या छडीबरोबर नाहींसा झाला आहे." (पा. ४८). "शेजारी हा प्राणी असा आहे, कीं तो असला तर (पा. ५९) अशीं चेहऱ्याची कळी खुलत नाहीं." (पा. १११). सुंदर वचनें लिहिणारी लेखणी किती सुंदर व उद्बोधक कल्पना प्रसवते तें पहा— "आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टींत, एका सुंदर राजकन्येला एका काचेच्या पेटींत जपून ठेवणाऱ्या राक्षसाप्रमाणें पुरुषाचें चित्र रेखाटण्याची महिलापरिषदेंतील अनेक व्याख्यात्यांची प्रवृत्ति दिसून येते. पण त्यांच्या हें ध्यानीं येत नाहीं, कीं समुद्रांतील अनेक क्रूर व हिंस्र प्राण्यांपासून त्या सुंदर राजकन्येचें संरक्षण होत होतें तें केवळ त्या राक्षसाच्या युक्तीमुळेंच!" (पा.२५)

या पुस्तकाच्या वर वर्णिलेल्या विशेषांइतकेच महत्त्वाचे असे आणखी दोन विशेष आहेत. ते म्हणजे श्री. सरदेसाई यांचें या निबंधांत प्रतिबिंबित झालेलें व्यक्तित्व व जीविततत्त्वज्ञान. या गोष्टींची बरीच कल्पना वर दिलेल्या अनेक अवतरणांवरून वाचकांना आली असेलच. श्री. सरदेसाई स्वतः पत्रपंडित आहेत तरी त्यांनीं 'वृत्तपत्रव्यवसाया'वर विदारक प्रकाश पाडला आहे व एकदोन चुटके देऊन पत्रपंडिताची थट्टा उडविली आहे! बौद्धिक हमाली करणाऱ्यांचा त्यांना मनस्वी तिटकारा आहे. ते स्वतः सिनेमाचे शोकिन असून सिनेमाकलेचे दर्दी टीकाकार आहेत. म्हणूनच "सिनेमाच्या जाहिराती म्हणजे खोट्या मोत्यांच्या दागिन्यांची विद्युद्दीपांच्या झगझगाटांतील वेगडी श्रीमंती होय अशी माझी अनुभवानें खात्री झाली आहे," असें ते निक्षून सांगतात. आपल्या शाळामास्तर मित्रांचें व्याकरण, भूगोल किंवा खगोल त्यांनीं विनोदविषय केला आहे, तरी ते शाळामास्तरच्या 'पोटाच्या कोड्या'ची जाणीव दाखविण्यास विसरत नाहींत. पुरुषी अन्यायाविरुद्ध चळवळ करणाऱ्या स्त्रियांकडे ते कोणत्या दृष्टीनें पाहतात तें 'अबला कीं प्रबला?' या निबंधांत दिसून येतें; त्याची तोंडओळख वर दिलेल्या राजकन्येच्या दाखल्याच्या अवतरणावरून होईल. त्यांचा पंडित जवाहरलालांच्या आंतरराष्ट्रीय राजकारणावर कटाक्ष आहे. "पांढऱ्या मानवाचें ओझें नेहमीं काळ्या मानवाच्या मानगुटीं बसतें" हें ते तिरस्कारपूर्वक सांगतात. फार काय, मॅट्रिकच्या तीन तास मुदतीसाठीं लांबच लांब प्रश्नपत्रिका काढणाऱ्या परीक्षकांना त्याच परीक्षेस बसणें भाग पाडलें तर काय बहार होईल असें त्यांना सहानुभूतीनें वाटतें.

या सर्व उदाहरणांवरून श्री. सरदेसाई यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टि दिसून येते. ती जितकी भेदक आहे, तितकीच ती सहृदय आहे. त्यांच्या दृष्टींत प्रसंगीं ओलावा उत्पन्न होतो. याची साक्ष देणारे पुढील उद्गार पहा— " संसारांत प्रत्येक माणसाला पाठीवर त्याचें स्वतःचेंच एवढें मोठें ओझें वहावें लागतें, कीं दुसऱ्यांच्या ओझ्यांची त्यांत भर घालणें म्हणजे उंटाच्या पाठीवर शेवटची काडी लादण्यापैकींच तो प्रकार व्हायचा. " ( पा. ९० ) " नाना प्रकारच्या चिंता व काळ यांच्या ओझ्याखालीं दडपून गेलेल्या समाजांतील लोकांची अवस्था " ते कळकळीनें निवेदन करतात. " जीवन हे संग्राम " हें त्यांना खरें वाटतें; पण " हा संग्राम रणांगणावरील नसून क्रीडांगणावरील आहे " अशी त्यांची खात्री आहे. त्यांची काव्यदृष्टिहि या निबंधांत दिसून येते. रेक्लेमेशनवर फिरायला जाऊन " समोर पसरलेल्या अफाट सागराच्या विलोल नर्तनांतील काव्यमाधुरी " ( पा. ४३ ) सेवन करण्याची त्यांना संवय आहे.

शेवटीं या " कागदी विमानां "ची रचना पाहून हें लांबलेलें परीक्षण पुरें करतों. श्री. सरदेसाई यांनीं आपले विचार सरळ व सुबोध भाषेंत मांडून हे निबंध रचले आहेत. त्यांच्या निबंधांत क्वचित् संयमाच्या अभावीं पाल्हाळाचा दोष उत्पन्न झालेला दिसतो. त्यांची भाषा एकंदरींत सुरेख आहे. ती मधून मधून किती अर्थवाही व काव्यमय होते तें वर दिलेल्या अवतरणांवरून वाचकांच्या लक्षांत आलें असेलच.

विविधवृत्त, २ मार्च, १९४१

श्री. र. गो. सरदेसाई

# वृत्तपत्र नसलेला देश !

कांहीं दिवसांपूर्वीं मीं वर्तमानपत्रांत एक फार चमत्कारिक बातमी वाचली. तिबेटचे माजी मुख्य प्रधान श्री. सारंगशेप हे आपल्या पत्नीच्या औषधोपचारासाठीं म्हणून कलकत्त्यास एक महिनाभर येऊन राहिले होते. परत स्वदेशीं जातांना त्यांनीं ॲसोसिएटेड प्रेसच्या एका बातमीदाराला सांगितलें कीं, " जेथें एकहि वर्तमानपत्र चालविण्यांत येत नाहीं असा जगाच्या पाठीवरचा एकच देश आहे आणि तो म्हणजे तिबेट होय. "

वर्तमानपत्रांत पुष्कळदां मजेदार व कित्येकदां अविश्वसनीय वाटणाऱ्या बातम्या देखील प्रसिद्ध झालेल्या मीं वाचल्या आहेत. पण वरील बातमी वाचून मला जितकें आश्चर्य वाटलें तितकें आश्चर्य पूर्वीं क्वचितच वाटलें असेल !

आणि आश्चर्य वाटण्यासारखीच ही गोष्ट नाहीं काय ? विसाव्या शतकांत वर्तमानपत्र नसलेला एखादा देश पृथ्वीच्या पाठीवर असूं शकेल या बातमीवरच चटकन् विश्वास बसत नाहीं. सुधारलेल्या जगांत वर्तमानपत्र ही इतकी आवश्यक आणि अपरिहार्य बाब होऊन बसली आहे, कीं श्वासोच्छ्वासा-इतकीच वर्तमानपत्राची माणसाला जरूरी आहे असें गृहीत धरण्यापर्यंत आपल्या मनानें दूरची भरारी नकळतच मारली आहे ! मोठमोठ्या देशांची व राष्ट्रांची गोष्ट तर सोडाच, पण मोठमोठ्या शहरांत वर्तमानपत्र नसेल तर तें शहर आपण शुद्ध रानटी समजूं. देशाच्या राजधानीच्या व औद्योगिक आणि व्यापारी महत्त्वाच्या शहरीं तर वर्तमानपत्रें दिवसांतून कित्येक वेळां प्रसिद्ध होत असतात. सकाळसंध्याकाळचीं वृत्तपत्रें आपल्या अंगवळणीं पडलींच आहेत व वर्तमानपत्रांची आपली संवय आतां इतकी अनावर झालेली आहे, कीं एखादें तरी पत्र वाचावयास न मिळालें, तर दिवस कसा चुकल्याचुकल्यासारखा वाटतो.

शहरोशहरींच काय, पण जिल्ह्याच्या व तालुक्याच्या गांवींहि मोडकें-तोडकें का होईना, पण एखाद-दुसरें वर्तमानपत्र संसार थाटून बसलेलें आढळतें. सौभाग्यवतीला कुंकुमतिलकावांचून चारुता नाहीं तशी गांवाला वर्तमानपत्रावांचून शोभा नाहीं, अशी समजूत होण्याइतकी जगांत वर्तमान-पत्रांची प्रगति झाली असतां, एक गांव नव्हे तर सबंध देशच्या देश असा

आहे, कीं जेथें एकहि वर्तमानपत्र निघत नाहीं, ही केवढी आश्चर्याची गोष्ट! आणि तो देशहि कांहीं लहानसहान नव्हे. चार लक्ष त्रेसष्ट हजार चौरस मैल क्षेत्रफळाचा तिबेटदेश आहे. तीस लाखांवर त्याची लोकसंख्या आहे. एवढ्या मोठ्या विस्तीर्ण देशांत एकहि वर्तमानपत्र नाहीं म्हणे! धन्य त्या तिबेटाची!

आकारमानानेंच पाहिलें तर तिबेट हा देश फ्रान्स, जर्मनी, इटली किंवा इंग्लंड या पाश्चात्य राष्ट्रांहूनहि मोठा आहे. हिंदुस्थानच्या एकचतुर्थांशाहून तिबेट थोडा लहान आहे. एवढ्या अफाट देशांत कसलेंच वृत्तपत्र जगूं नये म्हणजे काय? तेथल्या लोकांचें वर्तमानपत्र वाचल्यावांचून चालतें तरी कसें?

ही बातमी वाचल्यापासून मीं आपलें मनाशीं ठरवून टाकलें आहे, कीं त्या महाभयंकर देशाच्या वाटेला आपण स्वप्नांतसुद्धां जायचें नाहीं! वर्तमानपत्राच्या सहवासावांचून मला एक दिवसहि नाहीं चैन पडायचें! एक दिवस सूर्यनारायण सकाळीं उगवण्याचें विसरून गेला तरी माझें नाहीं तितकेंसें अडणार (उलट रात्र अजून संपलीच नाहीं असें समजून मी खुशाल मऊ मऊ दुलईत डोकें खुपसून मजेंत राहीन), पण सकाळचें वर्तमानपत्र जर माझ्या खोलींत पडलें नाहीं, तर आपलें घोडें अडलेंच दिवसभर! माझ्या आयुष्यांत सकाळीं मला साखरझोंपेंतून उठविण्याचें कार्य सूर्याच्या सहस्रकरांना देखील कधीं साधलेलें मला आठवत नाहीं. लहानपणीं मला जाग्रति येई ती आईचा प्रेमळ हात पाठींत 'प्रसाद'पूर्वक फिरूं लागल्यानें आणि मोठेपणीं मला झोंपेंतून जागें करण्याचें कार्य माझ्या खोलींत पडलेल्या वर्तमानपत्राच्या आवाजानेंच केलें आहे.

मलाच काय पण लोकांनाहि 'जाग्रत' करण्याचें कार्य वर्तमानपत्राइतकें दुसऱ्या कोणास साधत असेल असें मला तरी वाटत नाहीं. निद्रेंतून असो कीं अज्ञानांतून असो, लोकांना जागे करण्यांत वर्तमानपत्रांचा हातखंडा आहे. माझे डोळे कितीहि निद्राजड झालेले असोत, समोर ताजें वर्तमानपत्र दिसलें, कीं उडालीच ती डोळ्यांवरची झापड! चर्मचक्षूंप्रमाणेंच माणसाच्या मनश्चक्षूंनासुद्धां जाग आणण्यांत वर्तमानपत्रें सर्वदा आणि सर्वत्र यशस्वीच ठरलेलीं आहेत. असा देश, प्रांत किंवा गांव क्वचितच दाखवितां येईल, कीं जेथें वर्तमानपत्र निघत असूनहि लोक अज्ञानांत घोरत पडले आहेत. झोंपीं गेलेल्यांनाच काय, पण झोंपेचें सोंग आणणाऱ्यांना देखील वर्तमानपत्र तात्रडतोब जागें करून हातपाय हालविण्यास भाग पाडतें.

तिबेटमधील दलाईलामाच्या प्रजाजनांना कोणत्याच प्रकारच्या जागृतीचीं किरणें दिसत नसलीं, तर त्यांत नवल वाटायला नको. वर्तमानपत्रच ज्या देशांत नाहीं तेथें कसलें जीवन आणि कसली जागृति! वर्तमानपत्र हेंच सर्व चळवळींचें व चैतन्याचें अधिष्ठान आहे. वर्तमानपत्रांच्या आजच्या प्रभावी जमान्यांत श्रीसमर्थ रामदासस्वामी झाले असते, तर त्यांनीं आपल्या "सज्जनगड-समाचार" पत्रांत लिहिलें असतें, कीं

**'सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें॥**
**परंतु तेथें वर्तमानपत्राचें। अधिष्ठान पाहिजे॥'**

भगवंताची जागा विसाव्या शतकांत वर्तमानपत्रानें घेतली आहे. 'स्थिरचल व्यापुनि दशांगुळें' उरणाऱ्या भगवंताचें तें 'रेकॉर्ड' वर्तमानपत्रांनीं कधींच मोडलें आहे! उलट जेथें भगवंतसुद्धां जाऊं शकणार नाहीं अशा ठिकाणींहि प्रवेश करण्यास वर्तमानपत्रांना दिक्कत वाटत नाहीं. सर्व व्यक्तींच्या पापपुण्याचा जमाखर्च लिहिणाऱ्या चित्रगुप्ताच्या कार्याचें महत्त्व व त्यांतील अचाट अद्भुतरम्यता वर्तमानपत्रें निघाल्यापासून पार नाहींशी झालेली आहे. भगवंताचें विश्वव्यापित्व आणि चित्रगुप्ताचें सर्वदर्शित्व यांच्या जोडीला वर्तमानपत्रांच्या अंगीं नारदाचा कळलावेपणाचा गुणहि दिसून येतो. मनुष्य हा माकडापासून उत्क्रांत झाला असल्यामुळें केव्हां केव्हां तो मर्कटचेष्टा करून आपला पूर्वजांचा लागाबांधा जपून ठेवण्याचा प्रयत्न करतांना दिसतो. तद्वत् पुराणकाळच्या नारद या संस्थेचेंच सर्वसंचारी उत्क्रांत स्वरूप म्हणजे आजचीं वर्तमानपत्रें होत असा शोध कांहीं विद्वानांना 'झालेला' आहे, त्याचा खरेपणा पटविण्यापुरतेंच वर्तमानपत्रांनीं नारदाच्या कळलावेपणाशीं नातें जोडलेलें असावें असा माझा तर्क आहे.

वर्तमानपत्राचें वाचन हें एक न सुटणारें व्यसन आहे. चहा, विडी, दारू हीं व्यसनें करूनहि माणूस थोड्याफार मनोनिग्रहानें त्यांचा त्याग करूं शकेल; पण वर्तमानपत्र वाचण्याचें व्यसन एकदां माणसाला जडलें, कीं त्या वेडापासून त्याची सुटका नाहीं. आणि गंमत ही, कीं सुटका व्हावी अशी कोणाहि 'शहाण्या'ची कधींहि इच्छा नसते! या व्यसनाची अशी गंमत आहे, कीं उपभोगानें त्याची तहान वाढतच जाते, इतर व्यसनांप्रमाणें वीट येत नाहीं. अधाशासारखें मिळेल तें वर्तमानपत्र वाचणारे लोक मीं पाहिले आहेत.

नित्य नवा नखरा हा वर्तमानपत्रांचा प्राण असतो व त्यामुळेंच त्यांना अवीटपणा प्राप्त झाला आहे. नवा खेळ, नवा पोषक, नवी सीनसीनरी नाटक-कंपन्या वर्षसहमाहिन्यांनीं बाहेर काढतात. वर्तमानपत्रें रोजच नव्या बातम्या, नवे 'चूषविषय', ('शीघ्रसाहित्यादर्श 'कर्ते श्री. भावे यांनीं Feature Article याला हा मराठी प्रतिशब्द सुचविला आहे, हें येथें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें अवश्य आहे), नवीन चित्रें यांची सजावट करीत असतात. कांहीं वर्तमानपत्रें तर इतकीं नावीन्याच्या आहारीं गेलेलीं असतात, कीं स्त्रियांच्या शृंगाराप्रमाणें मतांचा रोज नवा थेर करणें, म्हणजेच नवमतवादाचा बेंडबाजा वाजविणें, भूषणास्पद होय अशी त्यांची कल्पना दिसते!

वर्तमानपत्रें हीं एका दृष्टीनें पाहिलें तर घरचें खाऊन लष्करच्या भाकऱ्या भाजणारीं वाटतात. जगांत कोठें कांहीं घडो, त्यावर आपली यांची मल्लीनाथी आहेच! जगांतल्या कोठल्या कोनाकोपऱ्यांत घडलेल्या गोष्टीशीं तसें पाहिलें, तर माझा काय संबंध पोंचतो? पण या वर्तमानपत्रांनीं सर्व जगांतल्या घडामोडी छापून वाचकवर्गांत एक प्रकारचें विश्वबंधुत्वाचें नवें नातें निर्माण केलें आहे. आपल्या शेजारच्या घरांत कोण राहतो, तो काय करतो, या प्रश्नांबाबत पूर्ण उदासीन राहणारा वर्तमानपत्रांचा वाचक पेटसामो, व्हिपुरी आणि होलिगोलँड येथील परिस्थितीनें विव्हळ होतो; मि. सम्नर वेल्स यांच्या दौऱ्याच्या फलश्रुतीबद्दल तो उत्सुकता दाखवितो; सिंध मंत्रिमंडळाच्या भवितव्याबद्दल चिंता बाळगतो; याचें सकृद्दर्शनीं नवल वाटतें. हजारों मैल दूर असलेले देश ज्याप्रमाणें नकाशा समोर ठेवला म्हणजे एकमेकांच्या जवळ आल्याचा डोळ्यांना भास होतो, तद्वत् वर्तमानपत्र समोर धरलें, कीं वाचक आपलें व्यक्तित्व विसरून जातो व क्षणकाल विश्वबंधुत्वाच्या वरच्या पायरीवर जाऊन सर्व घडामोडींचा आत्मौपम्यबुद्धीनें विचार करूं लागतो.

माणसाच्या आयुष्याला गोडी व लज्जत आणण्याचें काम वर्तमानपत्राइतकें दुसऱ्या कोणास साधत असेल कीं काय, याची मला शंका आहे. तिबेटमधील लोकांचें जीवन या दृष्टीनें खरोखरीच कींव करण्यासारखें वाटतें मला तरी. जागतिक घडामोडींशीं या लोकांचा बातम्या वाचण्यापुरता देखील संबंध येत नसेल तेथें त्याबाबत स्वतःचें मत व्यक्त करणें तर दूरच! किती अभागी लोक तिबेटचे! वर्तमानपत्र नसल्यानें तेथील पुढाऱ्यांचे फोटो आणि मुलाखती कोण छापत असेल? कुठल्याहि लहानमोठ्या घडामोडींवर सकाळसंध्याकाळ

क 'पत्रकें' प्रसिद्ध करण्याचें भाग्य तिबेटच्या एकाहि पुढाऱ्याच्या ावें, ही केवढी खेदाची गोष्ट आहे! पत्रकें काढण्याचा दुर्धर रोग वीर नरिमन किंवा पं. नेहरूंसारखे कोणीच पुढारी तिबेटमध्यें ाय? व्याख्यानबाजी करून वर्तमानपत्रांचे रकाने भरण्यास बहुमोल करणाऱ्या सत्यमूर्तींचीहि तिबेटमध्यें लागवड होत नसेल!

ानपत्र नसलेला देश म्हणजे चैतन्यहीन कुडी. वर्तमानपत्रें नसतील ंत चळवळी नाहींत, पुढारी नाहींत, 'प्रामाणिक' मतभेद नाहींत व ीरवाण्या बुरख्याआडून चालणारें गालिप्रदानहि नाहीं! वर्तमानपत्रें म्हणजे 'सत्या'चे अभिनव प्रयोग नाहींत, बुवाबाजीच्या जाहिराती अब्रुनुकसानीचे खटले नाहींत! वर्तमानपत्र नाहीं म्हणजे त्यांत येणारें ानें भरलेलें 'बायकांचें पान' नाहीं, कीं पाश्चात्य वर्तमानपत्रांतील उत्तान ार्चीं चित्रें व लेख यांची उष्टी प्रतिकृति नाहीं. वर्तमानपत्र नाहीं म्हणजे ांत राम नाहीं. विस्तीर्ण व स्वतंत्र देश असूनहि तिबेट हा हिंदुस्थानांतील ्या संस्थानापेक्षांहि मागासलेला देश आहे. याचें कारण तेथें वर्तमानपत्राचा व आहे हेंच असलें पाहिजे.

ेमानपत्र नसल्यामुळें तिबेटी लोक करमणुकीच्या एका अव्वल दर्जाच्या ास मुकले आहेत यांत मला तरी संशय वाटत नाहीं. मार्क ट्वेन या ात अमेरिकन विनोदी लेखकाची एक गोष्ट कुठें तरी वाचल्याचें मला ते. मार्क ट्वेन हा प्रसिद्ध पुरुष झाल्यावर त्याच्या 'हालचाली' नपत्रांत छापून येऊं लागल्या व ठिकठिकाणीं त्याच्या मुलाखती ाठीं स्थानिक वार्ताहरांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. आपण ्या' आणि 'छापून आलेल्या' मुलाखतींत पडणारें विलक्षण अंतर मार्क ट्वेन इतका कंटाळून गेला, कीं पुढें कोणालाच मुलाखत न देण्याचें रविलें.

ंतर एकदां तो स्वतःच्या जन्मगांवीं गेला असतां तेथील पत्राचा एक सकाळींच त्याच्या मुलाखतीसाठीं आला, मार्क ट्वेन त्या वेळीं ांत लोळत पडला होता. त्यानें प्रथम नकारच दिला; परंतु जन्मगांवच्या निराशा न करण्याबद्दल त्या वार्ताहरानें विनाविल्यावरून ब्याद साठीं मार्क ट्वेननें त्याला 'विचार काय हवं तें' असें सांगितलें. ने विचारलें, 'तुमच्या आयुष्यांतील सर्वांत आनंददायक प्रसंग कोणता?'

" अब्राहाम लिंकनची स्मशानयात्रा!" मार्क ट्वेननें पूर्ण श्रेनें उत्तर केलें.

त्यावर तो वार्ताहर चकित होऊन म्हणाला—

" पण तेव्हां तर तुमचा जन्मसुद्धां झाला नव्हता कीं!"

हें ऐकतांच मार्क ट्वेननें चटकन् अंथरुणांतून उडी मारून त्या वार्ताहरीं हस्तांदोलन करून म्हटलें, " शाबास, मजकूर वर्तमानपत्रांत छापून येण्याव त्यांतील चूक शोधून काढणारा तूं पहिलाच वार्ताहर मला भिळालास!"

अशीच आणखी एक मनोरंजक गोष्ट देऊन हा लांबलेला लेख पुरा करतों. मार्च महिन्याच्या आरंभीं ही गोष्ट मि. पेटरब्रूम यांनीं कशी रेडिओ स्टेशनवरील एका व्याख्यानांत सांगितली—

"जागतिक वार्ताहर-परिषद संपवून कांहीं वार्ताहर स्वदेशीं परत होते. बोटीनें दोन दिवस प्रवास केल्यावर त्या वार्ताहरांपैकीं एक जण वा मृत्यु पावला. बोटीवर प्रेत असणें हें खलाशी लोक अशुभ मानतात प्रसिद्धच आहे. म्हणून बोटीच्या कप्तानानें बोटीवरील सुताराला सांगितलें, रात्रीं ४७ नंबरच्या केबिनमध्यें जा व तेथलें प्रेत शिडाच्या कापडांत गुंडाळ समुद्रांत सोड."

"दुसरे दिवशीं सकाळीं सुतारानें कप्तानाला वर्दी दिली कीं, सांगितल प्रमाणें ५७ नंबरच्या केबिनमध्यें जाऊन प्रेताची बिल्हेवाट लावली. हें ऐ कप्तान स्तंभितच झाला व म्हणाला, ' मीं तुला ४७ नंबरची केबिन सांगित असतां तूं भलत्याच केबिनमध्यें जाऊन काय घोटाळा केलास हा?' ते सुतारानें उत्तर केलें, 'मोठाच चमत्कार म्हणायचा! तो प्राणी सार ओरडत होता, कीं आपण जिवंत आहोंत म्हणून! पण साहेब, हीं वर्तमा पत्रांतलीं माणसं, यांच्या बोलण्यांतील एका अक्षरावर देखील कुणीं विश्व ठेवूं नये!' "

दा. क्र. ६११९

—कागदी विमानं

REFBK-0006141